१८५३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ८५५

# आर्थिक प्रश्न
# व
# अर्थरचना

लेखक :

प्रा. गंगाधर गाडगीळ

RFFBK-0007906

किंमत १ रुपया

१८५१२
अनुक्रम
तिथि
क्र.
सं.

साहित्य सहकार प्रकाशन : २

# आर्थिक प्रश्न व अर्थरचना

अनुक्रम १५७७
REFBK-0007906

लेखक :
गंगाधर गाडगीळ

ग्रा. क्र. ५६०६

किंमत १ रुपया

प्रकाशक :

वासुदेव विष्णु भट
कार्यवाह
साहित्य सहकार संघ
लिमिटेड
खाडिलकर रस्ता, मुंबई ४

●

आवृत्ति १ : १९५३

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

●

मुद्रक :

वासुदेव विष्णु भट
केमस प्रिंटर्स
१२ त्रिभुवन रोड
मुंबई ४

# प्रास्ताविक

सध्यां बिकट व आर्थिक परिस्थतीची झळ जनतेला जाणवत आहे. आणि त्यामुळें आर्थिक प्रश्नाकडे सामान्य माणसाचें लक्ष वेधलें आहे. त्याचें स्वरूप समजून घेण्याचा तो प्रयत्न करीत आहे. शिवाय आतां आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यामुळें, देशाचें आर्थिक धोरण ठरविणें ही मतदारांची जबाबदारी झाली आहे. ही जबाबदारी पार पाडण्याकरितां देखील आर्थिक प्रश्नाविषयींची प्राथमिक माहिती करून घेणें सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीनें आवश्यक झालें आहे.

आर्थिक प्रश्न व अर्थरचना ह्यांच्या विषयीं ही प्राथमिक माहिती पुरविण्याच्या उद्देशानें हें पुस्तक लिहिलेलें आहे. त्यामुळें अर्थशास्त्रावरच्या सर्वसामान्य पुस्तकांहून ह्याची रचना निराळी केलेली आहे. प्रा. पिगू ह्यांच्या 'Income' ह्या पुस्तकांत व प्रा. डिक्स् ह्यांच्या 'Social Framework' ह्या पुस्तकांत जी विषयाच्या मांडणीची पद्धत वापरलेली आहे, त्याच स्वरूपाची पद्धत ह्या पुस्तकांतही वापरलेली आहे. त्याचप्रमाणें पुस्तकांत तांत्रिक भाषा न वापरतां शक्यतों रोजच्या व्यवहारांतले शब्द वापरण्याचा यत्न केला आहे. पुस्तकांतील विवेचनाचें स्वरूप अर्थातच स्थूल आहे, आणि तें अगदी कांटेकोरपणानें केलेलें नसून सहज समजावें अशा प्रकारें केलेलें आहे. ह्या प्रयत्नामुळें पुस्तक सोपें व उपयुक्त झालें असावें अशी मी आशा बाळगतों.

पुस्तक घाईंत लिहिलें गेलें व त्याची छपाइ चालू असतांना मला त्याकडे लक्ष पुरविणें शक्य झालें नाहीं. त्यामुळें त्यांत कांहीं चुका व कच्चेपणा राहिलेला आहे ह्याची मला जाणीव आहे. वाचक त्याबद्दल मला उदार मनानें क्षमा करतील अशी आशा आहे.

१८-७-'४३
मुंबई

— गंगाधर गाडगीळ

# राष्ट्राचें उत्पन्न

एखाद्या माणसाचें उत्पन्न कमी असलें म्हणजे आपण त्याची आर्थिक स्थिती वाईट आहे असें म्हणतों. आणि उत्पन्न मोठें असणें हें सधनतेचें कारण व लक्षण समजलें जातें. अशा रीतीनें आर्थिक प्रश्न उत्पन्नाशी निगडित आहे असें आपण समजतों. आणि तें बरोबरच आहे. आजकाल बहुसंख्य माणसांना त्यांचें उत्पन्न पैशाच्या रूपानें मिळतें परंतु ह्या पैशाच्या उत्पन्नामागें उपयुक्त वस्तूंचें उत्पादन असतें. हें उत्पादन म्हणजेच खरें उत्पन्न. पैशानें ह्या उपयुक्त वस्तू विकत घेतां येतात म्हणूनच त्याला महत्व असतें. एरवीं त्या कागदाच्या कपट्यांची अगर सोन्या चांदीच्या तुकड्यांची मातब्बरी ती काय? सहारा वाळवंटांत तहानेनें व्याकूळ झालेल्या प्रवाशाला सांपडलेल्या सुवर्णमुद्रांचा त्याला जितका उपयोग होईल, तितकाच उपयोग खरेदीला निरुपयोगी असलेल्या पैशाचा आपल्याला होईल. तेव्हां पैसा हें एक साधन. थर्मामिटरनें ताप मोजतां आला तरी थर्मामिटरला कांहीं ताप येत नाहीं. त्याचप्रमाणें पैशानें उत्पन्न मोजतां आणि वेचतां आलें, तरी पैसा म्हणजे कांहीं उत्पन्न नव्हे. मात्र पैसा हें साधन असलें तरी तें केवळ साधन नव्हे. पैसा आणि उत्पन्न ह्यांचें संबंध अधिक गुंतागुंतीचें आहेत. ते कसे तें आपण पुढें पाहूंच.

जी गोष्ट व्यक्तीची तीच राष्ट्राची. राष्ट्राचा आर्थिक प्रश्न हा देखील राष्ट्राच्या उत्पन्नाचाच प्रश्न असतो. आणि हें उत्पन्न म्हणजे राष्ट्रांत होणारें उपयुक्त वस्तूंचें वा सोयींचें उत्पादन. मात्र राष्ट्राचा आर्थिक प्रश्न म्हणजे केवळ अनेक

व्यक्तींच्या आर्थिक प्रश्नांची बेरीज नव्हे. राष्ट्राच्या आर्थिक प्रश्नाकडे एका निराळ्या भूमिकेवरून पहावें लागतें. व्यक्तींच्या आर्थिक प्रश्नावर विचार करतांना ज्या समस्या उद्भवत नाहींत, अशा अनेक समस्या राष्ट्राच्या आर्थिक प्रश्नाचा विचार करतांना उद्भवतात. नुसती राष्ट्राच्या उत्पन्नाची गणती करावयाची म्हटलें तरी किती अडचणी येतात ! हें उत्पन्न निर्माण करण्याचें एखाद्या राष्ट्राचें सामर्थ्य कोणत्या गोष्टींवर अवलंबून असतें हा एक निराळाच प्रश्न आहे. ह्या उत्पन्नांचे घटक कोणते व त्यांचें उत्पादन कमी जास्त कां होतें ह्याचा देखील विचार करणें आवश्यक ठरतें. निराळ्या शब्दांत सांगायचें म्हणजे एखाद्या राष्ट्रांत अमकीं इतकीं घरें कां बांधलीं जातात अगर अमकें इतकें धान्य कां पिकवलें जातें ह्याचा खुलासा करावा लागतो. ह्या उत्पन्नाची विभागणी कमी अधिक प्रमाणांत विषम असूं शकते. ही विषमता कां निर्माण होते हा देखील एक प्रश्न आहे. वर्षोवर्षी ह्या उत्पन्नांत फेरबदल होत असतात. ह्या फेरबदलांचा अभ्यास इतका महत्वाचा आहे कीं त्याकरितां अर्थशास्त्राची एक स्वतंत्र शाखा निर्माण झाली आहे. विशेषतः अलीकडे सरकार देशाच्या आर्थिक जीवनांत अधिकाधिक हस्तक्षेप करतें आणि कांहीं देशांत तर साऱ्या आर्थिक जीवनाचें नियंत्रण सरकारच करतें. म्हणजेच त्या देशांत समाजवादी अर्थरचना असते. तेव्हां सरकार आणि आर्थिक जीवन ह्यांचें संबंध गुंतागुंतीचे व विविध प्रकारचे असतात. त्यांच्या अभ्यासाचा देखील अर्थशास्त्रांत अंतर्भाव होतो.

अर्थशास्त्राचा विस्तार हा एवढा आहे. त्याच्या कक्षा इतर अनेक शास्त्रांशीं भिडतात. विशेषतः राज्यनीतिशास्त्र (Politics) आणि समाजशास्त्र (Sociology) ह्यांच्याशीं अर्थशास्त्राचा निकटचा संबंध आहे. आणि पुष्कळदां एखाद्या प्रश्नाच्या राजकीय आणि आर्थिक बाजू वेगळाल्या करणें कठीण जातें. पण स्थूलपणानें एवढेंच लक्षांत ठेवायचें कीं आर्थिक प्रश्न हा उत्पन्नाचा प्रश्न आहे.

ह्या उत्पन्नाची मोजणी करावयाची म्हणजे अनेक गोष्टी स्पष्ट करून घ्याव्या लागतात. असें स्पष्टीकरण करून घेणें व त्याच्या आधारें उत्पन्नाची मोजणी करणें ही आर्थिक प्रश्नाच्या अभ्यासाची प्राथमिक पायरीच समजली पाहिजे. उत्पन्न हें अखेर वस्तू व सोयी ह्यांचीच गोळा बेरीज असते. तेव्हां उत्पन्नाची मोजणी

म्हणजे देशांत होणाऱ्या उपयुक्त वस्तूंच्या व सोयींच्या उत्पादनाची मोजदाद. हा उत्पादनाचा प्रवाह सतत चालू असतो. तेव्हां उत्पन्नाची मोजणी करायची म्हणजे कांहीं एक काल निश्चित करावा लागतो. साधारणपणें एक वर्ष हा काल सोयीचा समजला जातो. त्याचें एक कारण असें आहे कीं त्यामुळें ऋतुमानाप्रमाणें उत्पन्नांत होणारे बदल झांकले जातात.

उत्पन्नाची मोजदाद करतांना एका गोष्टीची फार काळजी घ्यावी लागते. कुठच्याही वस्तूची अगर सोयीची दोनदां गणती होत नाहीं इकडे लक्ष पुरवावें लागतें. देशांतलें कापसाचें उत्पादन व कापडाचें उत्पादन ह्या दोहोंची मोजणी केली तर तें चुकीचें ठरेल. कारण कापडांत कापसाचा अंतर्भाव हा झालाच. ( आतां सर्व अगर कांहीं कापसाचें कापड होत नसेल तर गोष्ट निराळी. ) तीच गोष्ट कोळशाची. कोळशावर चालणाऱ्या गिरण्यांतून उत्पन्न होणारा माल उत्पन्न म्हणून जमेस धरला म्हणजे कोळशाची निराळी मोजमाप करण्याचें कारण नाहीं. म्हशीचें दूध मोजलें कीं त्यांत तिनें खाल्लेला चारा आलाच.

मात्र ह्या बाबतींत एक महत्वाचा अपवाद आहे. माणसांना देखील उत्पादनाच्या कार्यांत भाग घ्यायचा असेल तर अन्नपाणी लागतेंच. तेव्हां म्हशीला लागणारा चारा जर वजा करायचा तर माणसाला लागणारें अन्नवस्त्र देखील उत्पादनांतून बाद करावें लागेल. तसें करणें हें तर्क दृष्ट्या क्रमप्राप्तच आहे. ( असें केलें तर भारताचें उत्पन्न जवळ जवळ शून्यच ठरेल. कारण सर्वांना पुरेसें अन्नवस्त्र मिळेल इतकें देखील उत्पादन आपल्या देशांत होत नाहीं. ) पण तसें करण्याची पद्धत मात्र नाहीं. 'असें कां' असें जर कोणी विचारलें तर त्याला उत्तर इतकेंच कीं उत्पादन करतां यावें म्हणून माणूस अन्नवस्त्राचा उपयोग करीत नाहीं, तर अन्नवस्त्र मिळावें म्हणून उत्पादन केलें जातें. हें उत्तर पूर्णपणें समाधानकारक नाहीं हें खरें. पण ह्याहून दुसरें उत्तर ह्या शंकेला नाहीं हें देखील तितकेंच खरें.

उत्पन्नांत सर्व वस्तूंच्या व सोयींच्या उत्पादनाचा समावेश होतो असें मीं वर म्हटलें खरें. पण उत्पन्नाची मोजणी करतांना कांहीं प्रकारच्या उत्पादनाचा त्यांत समावेश करायचा नाहीं अशी एक रूढी पडून गेली आहे. उदाहरणार्थ, एखाद्याची

स्वतःच्या मालकीची मोटर असली तर तिच्यामुळें त्याची जी सोय होते, तो खरोखर उत्पन्नाचाच एक भाग आहे. एखादी बाई स्वतःच्या घरांतलें जें काम करते, तें सुद्धां उत्पन्नांत जमा होतें. पण अशा गोष्टींची उत्पन्नाची मोजणी करतांना दाद घेण्यांत येत नाहीं. कुटुंबाकरितां झटणाऱ्या पतिव्रतांवर हा मोठा अन्याय होत आहे ह्यांत शंका नाहीं. पण चित्रगुप्ताच्या वहींत त्यांच्या पुण्यकृत्यांची नोंद होत असते एवढ्यावरच त्यांना समाधान मानावें लागेल. वर निर्देशिलेल्या गोष्टींची दाद न घेण्याचें कारण इतकेंच कीं त्यांची मोजणी करणें फार कठीण आहे. शिवाय देवघेव वगैरे आर्थिक व्यवहारांत ह्या सोयींचा समावेश होत नाहीं. आणि अर्थशास्त्राच्या नियमांनुसार त्यांची मागणी आणि पुरवठा ठरत नाहीं. ह्यामुळें ह्या सोयी जरी उत्पन्नाचाच भाग असल्या, तरी उत्पन्न म्हणून त्यांना गणतां येत नाहीं. मात्र मोटर स्वतःकरितां वापरण्याऐवजीं ती भाड्यानें चालवली तर ती उत्पन्नाची बाब समजली जाते. आणि एखादी स्त्री नोकर म्हणून कोणाकडे घरकाम करूं लागली तर त्याचाही उत्पन्नांत समावेश होतो.

उत्पादन म्हटलें म्हणजे त्याकरितां कच्चा माल वगैरे वापरावा लागतो. त्याची मोजणी केली तर दुहेरी मोजणीचा गुन्हा आपल्याकडून होतो हें आपण वर पाहिलेंच. त्याचप्रमाणें उत्पादनाच्या क्रियेंत यंत्रसामुग्री, इमारती वगैरेंची झीज आणि तूटफूट होत असते. ही झीज आणि तूटफूट भरून काढण्याकरितां दरवर्षींच्या उत्पन्नाचा कांहीं भाग कामीं येतो. उत्पन्नाचा हा भाग आजच्या गरजा भागवीत नाहीं अगर उत्पादनाची वाढ करण्याचें साधन म्हणूनही त्याचा उपयोग होत नाहीं. त्यामुळें उत्पन्नाचा हा भाग वजा केल्यानंतर मग जें शिल्लक राहतें तेंच देशाचें निव्वळ उत्पन्न.

हीच गोष्ट निराळ्या शब्दांत सांगायची म्हणजे उत्पादनाचें साधन म्हणून वापरण्यांत येणारें, भांडवल शाबूत रहावें (maintaining capital intact) म्हणून जें उत्पन्न खर्ची पडतें त्याचा समावेश एकंदर (gross) उत्पन्नांत जरी होत असला तरी निव्वळ (net) उत्पन्नांत त्याला स्थान देतां येणार नाहीं.

झीज आणि तूटफट ह्याहून एका निराळ्या कारणामुळें भांडवल कमी येतें. आजकाल उत्पादनच्या पध्दतींत व त्याकरितां लागणाऱ्या यंत्रसामुग्रींत सारखी सुधारणा होत असते. म्हणजेच जुनी यंत्रसामुग्री टाकाऊ ठरते. असें झालें कीं

मग त्या यंत्रसामुग्रीच्या ऐवजीं नवी यंत्रसामुग्री वापरावी लागते. जुन्याच्या बदलीं ही जी नवी यंत्रसामुग्री वापरली जाते, तिच्या निर्मितीकरितां उत्पन्नांचा कांहीं भाग कामीं येतो. ह्या भागाचा देखील निव्वळ उत्पन्नांत समावेश होत नाहीं. आज जुन्या यंत्रसामुग्रीच्या इतकीच उत्पादनशक्ती असलेली नवी यंत्रसामुग्री अशा रीतीनें उत्पन्नांतून बाद करावी लागते. देशाच्या उत्पादनशक्तीची वाढ करणारी यंत्रसामुग्री ही देशाच्या निव्वळ उत्पन्नाचा भागच होय.

युध्दकाळांत, अगर आग, भूकंप वगैरे नैसर्गिक संकटांमुळें जी यंत्रसामुग्री नष्ट होते, ती उत्पन्नांतून वजा करण्यांत येत नाहीं. ती नष्ट झाल्यामुळें देशाची उत्पादनशक्ती घटते हें खरें पण उत्पादनाच्या क्रियेमुळें कांहीं ती यंत्र सामुग्री नष्ट होत नाहीं. ती नष्ट होते अन्य कारणांमुळें आणि म्हणून ही झीज वा तूटफूट वजा करण्यांत येत नाहीं.

वरील विवेचनावरून एक गोष्ट सूचित होते. कुठच्याही देशाच्या उत्पन्नाचे दोन मूलभूत भाग पडतात. एका भागांत चालू उपयोगाच्या वस्तूंचा समावेश होतो. उदाहरणार्थ तांदूळ, गहूं, साबण, चित्रपटाचा खेळ, कापडचोपड वगैरे वस्तु ह्या भागांत येतात. अशा वस्तूंचें ज्याप्रमाणें उत्पादन होत असतें त्याचप्रमाणें उत्पादनाच्या साधनांची देखील निर्मिती चालू असते. यंत्रसामुग्री, इमारती, जहाजें, वहातुकीचे मार्ग ही सगळीं उत्पन्नाचीं मनुष्यनिर्मित साधनें होत. हीं दीर्घकालपर्यंत उत्पादनाचें कार्य करीत असतात. हीं साधनें म्हणजे त्या देशाचें भांडवल! त्याचप्रमाणें उत्पादनांत उपयोगी पडणारा कापूस वगैरे कच्चा माल ह्याचा देखील भांडवलांत समावेश होतो. कांहीं कांहीं अर्थशास्त्रज्ञ तर सांठवून ठेवलेल्या सार्‍याच उत्पादनाला भांडवल समजतात. मात्र ह्या बाबतींत मतभेदाला जागा आहे हें आपण लक्षांत ठेविलें पहिजे.

उत्पन्नाचे हे जसे दोन भाग पडतात तसे इतरही भाग पाडतां येतील. शेतीचें उत्पादन व उद्योगांचें उत्पादन असेही उत्पन्नाचे दोन भाग पाडतां येतील आणि ते देखील आपल्या परीनें महत्वाचे आहेत. पण वर निर्देश केलेली, चालू उत्पादनाच्या वस्तू व भांडवल ही वर्गवारी अधिक महत्वाची आहे. कारण भांडवल

व चालू उपयोगाच्या वस्तू ( ह्यांना आपण ह्यापुढें चालू वस्तू असें म्हणूं) ह्यांच्या परस्पर प्रमाणावर देशाची आर्थिक प्रगती अवलंबून असते. उत्पादनाचीं साधनें मर्यादित असल्याकारणानें जितकें चालू वस्तूंचें उत्पादन अधिक तितकें भांडवलाचें उत्पादन कमी. आणि भांडवलाचें उत्पादन कमी असलें कीं देशाच्या आर्थिक प्रगतीची गती देखील मंदच रहाते. आज आपल्या देशांत हीच परिस्थिती आहे. आपल्या देशांत भांडवलाची वाढ होऊन कारखान्यांची उभारणी वगैरे गोष्टी झाल्या पाहिजेत. तरच आजच्या विकट आर्थिक परिस्थितींतून आपण निभावूं. पण भांडवलाची वाढ करायची तर चालू वस्तूंचें उत्पादन कांहीं प्रमाणांत तरी कमी केलें पाहिजे. आणि तें उत्पादन आजच इतकें कमी आहे कीं तें ह्याहून कमी करणें फार कठीण आहे. ह्या परिस्थितींतूनहि मार्ग आहे. परदेशांतून भांडवलाची आयात केली अगर बेकार साधनांचा उत्पादनाकरितां उपयोग केला कीं चालू वस्तूंचें उत्पादन फारसें कमी न करतांही आर्थिक प्रगती साधतां येते. पण ह्या गोष्टींची विस्तारानें चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. भांडवल व चालू वस्तू ही जी आपण वर्गवारी केली तिचें महत्व फक्त आपल्याला इथें ध्यानांत घ्यायचें आहे. ह्या महत्वाच्या मागें इतरही कारणें आहेत. भांडवल व चालू वस्तू ह्यांच्या मागण्यांचे परस्पर संबंध असे कांहीं गुंतागुंतीचे आहेत कीं त्यामुळें उत्पादनावर फारच विचित्र परिणाम होत असतात. उदाहरणार्थ वरील विवेचनावरून असें वाटेल कीं चालू वस्तूंची मागणी घटली म्हणजे भांडवलाचें उत्पादन वाढेल. कारण अधिक साधनें त्या उत्पादनाकडे वळवितां येतील. पण पुष्कळदां असें होतें कीं चालू वस्तूंची मागणी घटली कीं, त्याच वस्तू अधिक प्रमाणांत निर्माण करणारे कारखाने उभारायची उत्सुकता साहजिकच कमी होते. व त्यामुळें त्या भांडवलाचेंही उत्पादन होत नाहीं. अशा स्थितींत साधनें बेकार रहातात आणि एकंदर उत्पन्नच घटतें. ही वर्गवारी अशी अनेक प्रकारें महत्वाची आहे.

देशाचें उत्पन्न म्हणजे उत्पादन केलेल्या वस्तू हें आपण पाहिलें. पण खरोखर माणसांच्या हातांत जें उत्पन्न येतें तें पैशाच्या रूपानें येतें आणि मग त्या पैशाचा उपयोग आवश्यक वस्तू विकत घेण्याकरितां करण्यांत येतो. अगर तो पैसा भांडवल म्हणून गुंतविण्यांत येतो. तेव्हां कुठच्याही राष्ट्रांत उत्पन्नाचे दोन प्रवाह असतात. एक पैशाचा प्रवाह व दुसरा वस्तूंचा प्रवाह. ह्या दोन प्रवाहांचा निकटचा

संबंध आहे हें तर निश्चितच. कारण माणूस स्वत: उत्पादनाकरितां खपतो अगर स्वत:ची मालमत्ता त्याकरितां वापरतो. म्हणजेच तो उत्पन्नाचा प्रवाह निर्माण करीत असतो. आणि त्याचा मोबदला म्हणून त्याला पैसा मिळत असतो. म्हणजे वस्तूंच्या प्रवाहामुळेंच हा पैशाचा प्रवाह निर्माण होतो आणि ज्या प्रमाणांत वस्तूंचें उत्पादन होतें त्या प्रमाणांत पैसा मिळत असतो. पण वस्तूंचा प्रवाह कां निर्माण होतो; तर ह्या वस्तूंना पैशाच्या रूपानें मागणी असते म्हणून. वस्तूकरितां लोक पैसा द्यायला तयार असतात म्हणून. म्हणजेच पैशाचा प्रवाहच वस्तूंच्या प्रवाहाला गति देतो. आणि ज्याप्रमाणांत पैसा देऊं केला जातो, त्याच प्रमाणांत वस्तूंचें उत्पादन होतें. तेव्हां पैशाचा प्रवाह आणि वस्तूंचा प्रवाह हे असे परस्परावलंबी आहेत. आणि त्यामुळें पैशाच्या उत्पन्नांतील फरक हे कांहीं अंशीं वस्तूंच्या उत्पन्नांतील फरकांचे निदर्शक असतात. पण पैशाचें उत्पन्न हें वस्तूंच्या उत्पन्नाचें पूर्णपणें निदर्शक मात्र ठरत नाहीं. कारण पुष्कळदां वस्तूंचें उत्पादन होतें पण त्याचें पैशाच्या उत्पन्नांत रूपांतर होत नाहीं. भारतांतला शेतकरी जेव्हा स्वत: पिकवलेलें धान्य स्वतःच खातो तेव्हां असेंच होत असतें. अशा परिस्थितींत अर्थातच पैशाचें उत्पन्न वस्तूंच्या उत्पादनाच्या ह्या भागाचें निदर्शक ठरत नाहीं. त्याचप्रमाणें पुष्कळदां पैशाचें उत्पन्न हें वस्तूचें उत्पादन न होतांच मिळत असतें. पेन्शनर लोकांना मिळणारें पेन्शन, बेकार कामगारांना सरकारकडून मिळणारी पैशाची मदत, ह्यांचा पैशाच्या उत्पन्नांत समावेश होतो. पण त्यामागें वस्तूचें उत्पादन मात्र नसतें. पुष्कळदां सरकारी कर्जाचा उत्पादनार्थ उपयोग होत नाहीं. अशा कर्जावर दिलेलें व्याज हें देखील निव्वळ पैशाचेंच उत्पन्न होय. तेव्हां पैशाच्या उत्पन्नावरून अगर त्यांत होणाऱ्या फरकांवरून वस्तूंच्या अगर खऱ्या उत्पन्नाची आकारणी करणें शक्य होणार नाहीं.

शिवाय असा जर प्रयत्न केला तर आणखी एक अडचण लक्षांत घ्यावी लागेल. एखाद्या देशाचें खरें उत्पन्न किती अगर त्यांत किती वाढ किंवा घट झाली आहे तें नुसत्या पैशाच्या उत्पन्नाच्या आधारानें मुळींच समजूं शकेणार नाहीं. त्याच्या जोडीला जर किंमतींच्या चढउतारांची माहिती असेल तरच खरें उत्पन्न वाढलें का घटलें तें समजूं शकेल. उदाहरणार्थ, आपल्या देशाचें १९२९ सालचें पैशाचें उत्पन्न

व आजचें पैशाचें उत्पन्न ह्यांची तुलना केली तर आजचें उत्पन्न १९३९ सालच्या उत्पन्नाच्या तिप्पट ते चौप्पट भरेल. पण म्हणून खऱ्या उत्पन्नाची वाढ तितक्याच प्रमाणांत झाली असें म्हणणं वेडेपणाचें ठरेल. कारण १९३९ सालापासून जसें पैशाचें उत्पन्न वाढलें आहे तशाच किंमतीही वाढल्या आहेत. १९३९ सालीं १०० असलेला किंमतींचा दर्शक अंक आतां ४०० च्या आसपास घुटमळत आहे. म्हणजे पैशाचें उत्पन्न व किंमती ह्यांच्यांत सारखीच वाढ झाली असल्याकारणानें खरें उत्पन्न १९३९ सालीं होतें तेवढेंच बहुधा आतां असावें.

देशाच्या उत्पन्नांत कुठच्या कुठच्या गोष्टींचा अंतर्भाव होतो तें पाहिल्यावर तें उत्पन्न मोजण्याच्या प्रश्नाचा विचार करणें अवश्य आहे. एखाद्या देशाचें कुठच्याही वर्षांतील उत्पन्न मोजायचें म्हणजे त्या वर्षांतील सर्व प्रकारच्या वस्तूंच्या उत्पादनाची मोजणी केली पाहिजे. अशा मोजणीमुळें देशाच्या उत्पादनाची बेरीज करून उत्पन्नाचा एक आंकडा सांगणें मात्र शक्य होणार नाहीं. कारण निरनिराळ्या प्रकारच्या उत्पन्नाची बेरीज कशी करणार? बुटांच्या जोड्या आणि कापसाचे गठ्ठे ह्यांना एकत्र कसें आणणार?

हा प्रश्न दर्शक अंकाच्या सहाय्यानें सोडवितां येईल. समजा एखाद्या देशांत 'अ' आणि 'ब' अशा दोनच वस्तूंचें उत्पादन होतें. आणि अचें उत्पादन ५० असून बचें ६० आहे. अशा स्थितींत प्रत्येक वस्तूचें उत्पादन १०० ह्या अंकानें दर्शवितां येईल. मग दोन्हीं वस्तूंच्या दर्शक अंकांची बेरीज करून आलेल्या संख्येला ( १००+१०० = २०० ) दोहोनें भागलें म्हणजे येईल ती संख्या (२००÷२ = १००) साधारण दर्शक अंक ठरेल. ज्या वर्षापासून असा दर्शक अंक काढण्यांत येतो, त्याला सुरवातीचें वर्ष म्हणतात. सुरवातीच्या वर्षी उत्पादन कितीही असलें तरी त्याचा दर्शक अंक शंभरच असतो. तेव्हां सर्व वस्तूंचा (सरासरीचा) दर्शक अंक देखील ह्या वर्षी शंभरच असतो. आतां समजा कीं वरील उदाहरणांत, पुढील वर्षी अ चें अत्पादन ७५ झालें व ब चें ९० झालें तर त्या वर्षीचा साधारण दर्शक अंक १५० होईल. म्हणजे देशाचें उत्पन्न ५० टक्क्यानीं वाढलें असें म्हणतां येईल.

दोन वस्तूंच्या उत्पादनाची बेरीज करण्याबाबतची अडचण अशा प्रकारें दूर करतां येईल. दोन वस्तूंचें उत्पादन भिन्न असल्यामुळें त्यांची बेरीज करतां येत

नसली, तरी त्या उत्पादनाचें निदर्शन करणाऱ्या दर्शक अंकांची बेरीज करणें मात्र शक्य आहे. कारण हे दर्शक अंक एकाच जातीचे व म्हणूनच बेरीज करण्यालायक असतात. आणि म्हणून देशाचें अनेक वस्तूंचें उत्पादन एका आंकड्यानें दर्शवितां येतें. अर्थातच दर्शक अंक नें उत्पन्न मोजलें जात नाहीं. तें दर्शविलें जातें. पण दर्शक अंकाच्या सहाय्यानें दोन निरानिराळ्या वर्षांतील उत्पन्नाची तुलना करतां येईल व एका वर्षाच्या उत्पन्नाहून दुसऱ्या वर्षींचें उत्पन्न किती प्रमाणांत कमी आहे अगर जास्त आहे तें सांगतां येईल. म्हणजेच वर्षोवर्षीं देशाची आर्थिक प्रगती होत आहे कां परागती होत आहे आणि ती किती प्रमाणांत होत आहे हें समजण्याचें दर्शक अंक, हें एक उत्तम साधनच मानलें पाहिजे.

वर जें दर्शक अंकांनीं साधलें तें इतर मार्गांनीही साधतां येईल. प्रत्येक वस्तूच्या उत्पादनाला जर त्याच्या किंमतीनें गुणलें आणि येणाऱ्या संख्यांची जर बेरीज केली तर खरें उत्पन्न पैशाच्या रूपानें व्यक्त करतां येईल. मात्र खरें उत्पन्न पैशाच्या रूपानें दाखविणारी संख्या व लोकांना मिळणारें पैशाचें उत्पन्न ह्यांची गल्लत करतां उपयोगी नाहीं. पैशाच्या उत्पन्नाच्या कांहीं भागाचा त्या संख्येंत समावेश होणार नाहीं व पैशाचें उत्पन्न ज्यांतून निर्माण होत नाहीं अशा उत्पादनाचा देखील पैशाच्या रूपानें तींत समावेश होईल. दोन वर्षांच्या उत्पन्नाची जर तुलना करायची असेल तर मात्र दोन्हीं वर्षींतील वस्तूंच्या उत्पादनाला त्याच किंमतींनीं गुणलें पाहिजे. मग खरोखरच त्या दोन्ही वर्षांत वस्तूंच्या किंमती एकच असोत वा नसोत. असें जर केलें नाहीं तर तुलना शक्य होणार नाहीं. दर्शक अंकांच्या उपयोगामागें जी युक्ती आहे, तीच उत्पन्नांची तुलना करण्याच्या ह्या पद्धतीच्याही मागें आहे.

पण दुर्दैवानें उत्पन्नाची तुलना करण्याच्या ह्या पद्धती वापरणें, वर दर्शविल्या-इतकें सोपें नाहीं. त्यांत कांहीं अडचणी आहेत. त्या समजून घेणें अवश्य आहे. आपण वापरलेल्या दर्शक अंकाचें उदाहरण आपण घेऊं. त्यांत आपण अचें व बचेंही सुरवातीच्या वर्षाचें उत्पादन १०० ह्या आंकड्यानें दर्शविलें आहे व मग त्या दोन्हीं आंकड्यांची बेरीज करून आलेल्या संख्येला दोहोंनी भागून साधारण दर्शक अंक काढला आहे. ह्याचा अर्थ असा कीं अचें ५० हें उत्पादन व बचें साठ उत्पादन ह्यांना आपण सारखेंच महत्व दिलें आहे. ५० अ = ६० ब असें

समीकरण आपण गृहीत धरलें आहे. हें समीकरण गृहीत धरूनच आपण दुसऱ्या वर्षाच्या उत्पादनाचा दर्शक अंक काढला आहे. ह्याचा अर्थ असा कीं आपण केलेली दोन वर्षांच्या उत्पन्नाची तुलना ह्या समीकरणावर आधारलेली आहे. आणि तीच जर निराळ्या समीकरणावर आधारली तर उत्तर निराळें येईल. दुसऱ्या वर्षाचें उत्पन्न पन्नास टक्क्यांनीं जास्त आहे असें न ठरतां चाळीस टक्क्यांनीं जास्त आहे असें ठरेल अगर २०० टक्क्यानीं अधिक आहे असेंही ठरेल.

आतां अशीं अनेक समीकरणें वापरून जर अनेक उत्तरें काढतां येत असतील तर मग तुलना करण्याच्या ह्या पद्धतींत कांहीं अर्थच नाहीं असें समजायचें कीं काय? कीं जें वापरणें योग्य ठरेल असें एखादें समीकरण शोधून काढतां येईल? आपल्या उदाहरणांत आपण जें समीकरण गृहीत धरलें तें केवळ आपातत: निर्माण झालेलें आहे. सुरवातीच्या वर्षी अचें उत्पादन ५० होतें व बचें ६० होतें म्हणूनच तें समीकरण तयार झालें. पण अ आणि ब ह्यांचें समाजाला वाटणारें मोल लक्षांत घेऊन एखादें समीकरण बनवलें तर त्याचा उपयोग करणें विशेष योग्य आहे असें म्हणतां येईल. आणि ह्या समीकरणाच्या आधारानें केलेली तुलनाही यथायोग्य ठरेल. पण असें करूनही सर्व अडचणी दूर होत नाहींत. हें आपल्याला एका उदाहरणानें सिद्ध करतां येईल. समजा एखाद्या देशांत पन्नास मण गहूं आणि पन्नास तागे कापड तयार होतें. आतां कापड आणि अन्न ह्या दोन्हीं गोष्टी आवश्यक असल्याकारणानें त्या देशांतल्या लोकांना एक मण गहूं आणि कापडाचा एक तागा ह्यांचें मोल सारखेंच वाटेल असें गृहीत धरलें तर तें चूक ठरणार नाहीं. ह्या सुरवातीच्या वर्षाचा दर्शक अंक अशा रीतीनें शंभरच ठरेल. आतां समजा कीं पुढील वर्षी त्या देशांत कापडाच्या १०० ताग्यांचें उत्पादन झालें आणि गव्हाचें उत्पादन मात्र मुळींच झालें नाहीं तर ( एक मण गहूं आणि एक तागा कापड ह्यांचे मोल सारखेंच असल्यामुळें ) उत्पन्नाचा दर्शक अंक १०० च राहील म्हणजे उत्पन्न तितकेंच आहे असें दर्शक अंकावरून वाटेल. पण त्या देशांतील लोकांची मात्र अन्नान्नदशा होईल. पहिल्या वर्षाच्या उत्पन्नाहून दुसऱ्या वर्षाचें उत्पन्न पुष्कळच कमी आहे असा त्यांचा ग्रह होईल आणि तो योग्यच म्हटला पाहिजे. तात्पर्य काय कीं हें जें समीकरण गृहीत

१७०५७ रा. नि.

धरायचें त्यांत उत्पन्नांत होणाऱ्या फेरबदलाप्रमाणें सारखा फेरबदल होत रहातो. आणि त्यामुळें निरनिराळ्या वर्षांच्या उत्पन्नाची तुलना करणें कठीण जातें.

आपण आतांपर्यंत असें गृहीत धरलें कीं एका देशांत दोनच वस्तूंचें उत्पादन होतें. पण खरोखर कुठच्याही देशांत अनेक वस्तूंचें उत्पादन होतें. तेव्हां एक सोडून अनेक समीकरणें गृहीत धरलीं पाहिजेत आणि त्या प्रमाणांत त्या समीकरणांत बदल होण्याची शक्यताही वाढते. शिवाय पुष्कळदां नवीन वस्तूंचें उत्पादन सुरू होतें अगर जुन्या वस्तूंच्या स्वरूपांत पालट होतो. त्याचप्रमाणें उत्पादनांत फरक न होतां सुद्धां आवडीनिवडींत फरक होत असतो. म्हणजेच माणसांच्या मनांतील दोन वस्तूंच्या मोलाचें जें समीकरण असतें तें बदलत असतें. त्यामुळें उत्पादन तितकेंच राहिलें तरी उत्पन्न वाढणें अगर कमी होणें शक्य असतें.

आतांपर्यंत मी जो अडचणींचा पाढा वाचला त्यावरून असें वाटण्याचा संभव आहे कीं, उत्पन्नाची मोजणी करणें अशक्यच आहे. आणि शिवाय अशीही शंका येईल कीं अर्थशास्त्राच्या सुरवातीलाच जर इतक्या अडचणी उद्भवतात, तर पुढची वाट विकटच असली पाहिजे. कोणाच्या मनांत असेंही येईल कीं ह्या अडचणी ज्याअर्थीं दूर करतां येत नाहींत त्याअर्थीं अर्थशास्त्रांत शास्त्रीयतेचा भाग बराच कमी असणार व तें शास्त्र म्हणजे एकंदर टोकताळ्यांचाच मामला असणार. ह्या शंकांना उत्तर असें कीं वरील अडचणी दूर करणें कांहीं अंशीं शक्य आहे. आणि जरी त्या पूर्णपणें दूर करतां आल्या नाहीं तरी कांहीं गोष्टी गृहीत धरून स्थूल स्वरूपाच्या तुलना करणें शक्य आहे. शिवाय जरी आर्थिक जीवनांतील घटकांचे संबंध अर्थशास्त्राला संख्यावाचक ( quantitative ) स्वरूपांत शोधून काढतां आले नाहींत तरी गुणवाचक (qualitative) स्वरूपांत शोधून काढतां येतील. एखाद्या औद्योगिक शोधामुळें उत्पन्न किती वाढलें हें कदाचित् सांगतां येणार नाहीं. पण उत्पन्न वाढलें अगर उत्पन्नावर अमुक एक प्रकारचा परिणाम झाला एवढें मात्र नक्की म्हणतां येईल.

आणि अखेर कितीही अडचणी असल्या तरी देशाच्या उत्पन्नाची मोजणी होणें अत्यंत महत्वाचें असतें हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. आपापल्या देशांतील उत्पन्नाची मोजणी व्हावी म्हणून अनेक देशांतील सरकारें, पुष्कळ प्रकारची माहिती गोळा करीत असतात, अमूक एका स्वरूपांत अमूक एक माहिती पुरवलीच पाहिजे

अशी नागरिकांवर बंधनें घालतात व ह्या माहितीचें वर्गीकरण व संकलन करून ती प्रसिद्ध करतात. ही माहिती गोळा करण्याकरितां पुष्कळच पैसा खर्च होत असतो. पण त्या माहितीचा उपयोगही तसाच असल्या कारणानें इतका खर्च करणें कोणाला गैर वाटत नाहीं. देशाचें उत्पन्न किती ह्याबद्दलचीच माहिती कांहीं फक्त गोळा करून भागत नाहीं, तर देशाचें उत्पन्न व देशांतील लोकसंख्या ह्यांची सांगड घालणें अवश्य असतें. भारताचें एकंदर उत्पन्न बेल्जमच्या उत्पन्नाहून अधिक भरेल. पण भारताची प्रचंड लोकसंख्या ध्यानांत घेतली कीं भारताचें दरडोई उत्पन्न बेल्जम-हून पुष्कळच कमी आहे, हें ध्यानांत येतें. आणि दरडोई उत्पन्न हेंच खरोखर महत्वाचें असतें. पुष्कळदां उत्पन्नांत वाढ होत असते, पण त्याबरोबरच जर लोक-संख्या सम प्रमाणांत वाढत असली, तर दरडोई उत्पन्न मात्र वाढत नाहीं. त्याच-प्रमाणें एखाद्या देशाचें उत्पन्न अमक्या एका वर्षीं किती आहे, ह्या गोष्टीपेक्षां त्या उत्पन्नाची वाढ वर्षोवर्षीं किती प्रमाणांत होत आहे हें समजणें अधिक महत्वाचें असतें. कारण आज अमकें एक उत्पन्न आहे, ह्यावर कांहीं इलाज करतां येत नाहीं. पण तें कमी अगर अधिक वेगानें वाढवणें मात्र शक्य असतें. ही उत्पन्नाची वाढ अनेक गोष्टींवर अवलंबून असते. मुख्यत: ती भांडवलाच्या वाढीनुसार ठरत असते. शिवाय कुठच्याही देशांतील सर्वच उत्पादनशक्तीचा नेहमीं उपयोग होत नसतो. कांहीं वेळां उत्पादनाचीं साधनें कांहीं प्रमाणांत बेकार असतात. किंबहुना ठराविक काळानंतर ही साधनांची बेकारी पुन: पुनः उद्भवते असा अनुभव आहे. ही नियतकालिक बेकारी आणि भांडवलाचें उत्पादन व विनियोग ह्यांचा फार घनिष्ट संबंध असतो. तेव्हां ह्या दृष्टीनें उत्पन्नाची भांडवल व नित्योपयोगी वस्तू ह्यांत कशी विभागणी होते तें पहाणें महत्वाचें असतें. देशांतील बेकारी व उत्पन्न ह्यांचा परस्परसंबंधाचा अभ्यास देखील असाच उद्बोधक ठरतो. तीच गोष्ट पैशाचा प्रवाह व उत्पन्नाचा प्रवाह ह्यांच्या संबंधीची. देशाचें उत्पन्न किती आहे हें समजणें जसें महत्वाचें त्याचप्रमाणें त्याची निरनिराळ्या व्यक्तींत आणि सामाजिक वर्गांत कशी विभागणी होते तें समजणेंही महत्वाचें असतें. संपत्तीची विभागणी विषम असूं नये अशी आजची विचारसरणी आहे. त्या दृष्टीनें ह्या विषमतेच्या अभ्यासाचें महत्व आहे. शिवाय उत्पन्नाच्या आकाराचा व विभागणींतील विषमतेचा संबंध आहेच.

उत्पन्नाविषयीं कोणती माहिती गोळा केली जाते व तिचा उपयोग काय हें वर थोडक्यांत सांगितलें. त्या बाबतींत पुढें विवेचन होईलच. पण आतां लक्षांत घ्यावयाची गोष्ट अशी कीं आपल्या भारत देशाच्या उत्पन्नाविषयीं ही सर्व माहिती मात्र सध्यां उपलब्ध नाहीं. परकीय सरकारला अर्थातच अशी माहिती गोळा करण्याची निकड भासली नाहीं. शिवाय त्याकरितां होणारा खर्चही आपल्या गरीब देशाच्या आवांक्याबाहेरचा होता. त्यामुळें हें काम तसेंच राहिलें. मात्र आपल्या देशांतील अर्थशास्त्रज्ञांनीं वेळोवेळीं उत्पन्नाची स्थूलपणें मोजणी करण्याचे प्रयत्न केले आहेत. दादाभाई नवरोजी ह्यांनीं पहिला प्रयत्न १८७७ सालीं केला आणि तेव्हांच्या किमतीनुसार दरडोई (दर कामकरी माणसाचें नव्हे) वार्षिक उत्पन्न रु. २० आहे असा निष्कर्ष त्यांनीं काढला. ह्यानंतर अनेक प्रयत्न झाले. वाडिया आणि जोशी ह्यांनीं १९१३-१४ सालीं केलेल्या हिशोबाप्रमाणें हें उत्पन्न अदमासें रु. ४४ होतें. राव ह्यांनीं १९३१-३२ सालीं केलेल्या हिशोबाप्रमाणें तें रु. ६० ते ६५ इतकें भरलें. अलीकडेही अशा प्रकारचे एकदोन प्रयत्न करण्यांत आले आहेत पण ते जुन्या हिशोबांवर आधारलेले असल्यामुळें तितकेसे महत्वाचे नाहींत.

वर दिलेल्या हिशोबावरून भारताचें दरडोई उत्पन्न वाढतें आहे असा निष्कर्ष काढणें धोक्याचें आहे. कारण एक तर किंमतींत झालेला बदल ध्यानांत घेतला पाहिजे. शिवाय हिशोब करतांना निरनिराळ्या माणसांनीं निरनिराळ्या पद्धती वापरल्या आहेत. त्यामुळें त्यांच्या हिशोबांची (estimates) तुलना करणें योग्य होणार नाहीं. मात्र एक सर्वसामान्य निष्कर्ष काढतां येतो. आपला देश अतिशय दरिद्री आहे, हाच तो निष्कर्ष.

माहिती उपलब्ध नसल्यामुळें व देशाचें आणि सरकारचें पाठबळ नसल्या-कारणानें हे सारेच हिशोब बऱ्याच अंशीं अंदाजावर आधारलेले आहेत. म्हणजे ते चुकले असण्याचा पुष्कळच संभव आहे. शिवाय ह्या हिशोबांच्याद्वारें फार अपुरी माहिती मिळते. उत्पन्नाविषयीं ज्या प्रकारची इतर माहिती मिळाली पाहिजे असें मी म्हटलें तशी माहिती त्यांपासून मिळत नाहीं. म्हणून आतां आपल्या सरकारनें राष्ट्रीय उत्पन्नाची मोजणी करण्याकरितां एक समिति नेमली आहे. ह्या समितीतर्फे नमुन्याच्या पहाण्या ( Sample Surveys ) सध्यां चालू आहेत. त्यांच्या आधारें राष्ट्रीय

उत्पन्नाचा हिशोब करण्यांत येईल आणि मग बरीच उपयुक्त माहिती उपलब्ध होईल.

असो. ह्या उत्पन्नाचा अनेक बाजूनीं अभ्यास करणें हें अर्थशास्त्राचें कार्य आहे. हा अभ्यास शास्त्रीय पातळीवर केला जातो. म्हणजे कसें असावें ह्या दृष्टीनें तो अभ्यास होत नाहीं. तर कसें आहे, कसें असतें व कसें असेल हें हुडकण्याच्या भूमिकेवरून तो अभ्यास केला जातो. शास्त्राची भूमिका सत्यान्वेषणाची असते हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

# उत्पादन व देवघेव

देशाच्या उत्पन्नांत समाविष्ट झालेल्या वस्तू व सोयी कांहीं निव्वळ ईशकृपेनें प्राप्त होत नाहींत अगर अशी एखादी जादूची कांडीहि नाहीं कीं, जिच्या इषाऱ्या-सरशी साऱ्या इष्ट सुखसोयी उपलब्ध व्हाव्या. हें उत्पन्न मिळावें म्हणून उत्पादनाचें कार्य सतत चाललेलें असतें. आजची आपली अत्यंत गुंतागुंतीची अर्थरचना हें उत्पादनाचें कार्य शक्य व सुलभ व्हावें म्हणूनच मुख्यतः उभारण्यांत आलेली आहे.

उत्पादन म्हणजे उपयुक्त वस्तूंची व सोयींची निर्मिती अशी अर्थशास्त्रांतील व्याख्या आहे. गिरणीतून निघणारें कापड हें उत्पादन. तें वहातुकीच्या साधनांनीं दूरच्या ठिकाणीं पोंचवणें हेंहि उत्पादन, आणि भांडी घासणें, मोटार चालवणें व सिनेमांत काम करणें हें देखील उत्पादनच. लोक जर पैसे देऊन दारू प्यायला तयार असतील तर दारू गाळणें हें देखील उत्पादनच. मग तें जनतेच्या फाय-द्याचें असो वा नसो. उत्पादनाची ही व्याख्या व्यापक आहे. आणि रोजच्या बोल-ण्यांत ज्याला आपण उत्पादन म्हणणार नाहीं अशा गोष्टींचाही ह्या अर्थानें उत्पा-दनांत अंतर्भाव होतो.

हें उत्पादन होतें कसें हा पुढचा प्रश्न. मात्र ह्या प्रश्नाचें उत्तर म्हणून, कापडाच्या गिरणींत कोणती यंत्रें असतात, त्या यंत्रांची रचना कशी असते, अशा स्वरूपाची तांत्रिक माहिती आपल्याला गोळा करायची नाहीं. तर उत्पादनाच्या तांत्रिक व इतर अंगाविषयीं कांहीं मूलभूत व स्थूल तत्वें शोधून काढायचीं आहेत.

आतां सर्वसामान्यपणें असें म्हणतां येईल कीं कांहीं साधनांचा उपयोग करून उत्पादन होत असतें. कापूस व यंत्रसामुग्री व माणसांची मेहनत ह्यांचा उपयोग करून कापडाचें उत्पादन होतें. हीं उत्पादनाचीं साधनें अनेक प्रकारचीं असतात. पण सर्वसाधारणपणें त्यांचें तीन वर्ग पाडण्यांत येतात. आर्थिक विवेचनांत हें वर्गीकरण फार सोयीचें पडतें.

पहिल्या वर्गांत नैसर्गिक संपत्तीचा समावेश होतो. शेतीची जमीन, चराऊ जमीन, अरण्यें, वहातुकीला व पाणी पुरवठ्याला उपयोगी पडणाऱ्या नद्या, विजेच्या उत्पादनाला उपयोगी पडणारे धबधबे, पाऊस व हवामान, बंदरें, खनीज धातू वगैरे सर्व गोष्टी पहिल्या वर्गांत पडतात. निसर्गाचा कोणताही घटक उत्पादनाला उपयुक्त असला व त्याचा पुरवठा मागणीच्या मानानें मर्यादित असला म्हणजे तो नैसर्गिक संपत्तींत जमा होतो. हवा ही उपयुक्त खरी पण ती विपुल असल्यामुळें तिचा नैसर्गिक संपत्तींत अंतर्भाव होत नाहीं. ह्या उलट समुद्रकिनाऱ्यावरचे गोटे हे एखाद्या देशांत विपुल नसतील कदाचित्, पण त्यांचा उपयोग कांहींच नसल्या कारणानें त्यांनाही नैसर्गिक संपत्तींत स्थान मिळत नाहीं. निरनिराळ्या देशांना निरनिराळ्या प्रकारच्या नैसर्गिक संपत्तीची देणगी मिळालेली असते. कांहीं देशांत ही संपत्ती विपुल प्रमाणांत असते. तर इतर देशांत ती थोडकी असते. दुसरी एक ध्यानांत ठेवायची गोष्ट अशी कीं एकाद्या गोष्टीचा एके काळीं नैसर्गिक संपत्तींत समावेश होत नसेल. पण एखाद्या नव्या शोधामुळें ती गोष्ट एकदम नैसर्गिक संपत्तीचा भाग ठरणें शक्य आहे.

नैसर्गिक संपत्ती हा साधनांचा एक वर्ग झाला. माणसाची मेहनत हें देखील उत्पादनाचें महत्वाचें साधन आहे. आणि त्याचे कांहीं निराळे गुणविशेष आहेत. म्हणून त्याकरितां एक निराळा वर्ग कल्पिण्यांत आला आहे. एखाद्या देशांत ह्या साधनाचा पुरवठा किती आहे तें त्या देशांतील लोकसंख्येवर अवलंबून असतें. पण सगळेच लोक कांहीं काम करीत नाहींत. साधारणतः १६ ते ६० वर्षांच्या दरम्यान असलेलीं माणसें काम करीत असतात अगर करण्यास समर्थ असतात. ह्या वयोमर्यादेंत देशांतील किती लोकसंख्या पडते, त्यावरही ह्या साधनाचा पुरवठा अवलंबून असतो. शिवाय हा मेहनतीचा पुरवठा काम करणाऱ्या माणसांच्या

ताकदीवर व कौशल्यावरही अवलंबून असतो. ह्या मेहनतीच्या पुरवठ्याचा आणखी एक विशेष असा कीं, तो सांठवून ठेवतां येत नाहीं. एखाद्या मजूराला आज काम नाहीं मिळालें, तर आपली आजची काम करण्याची शक्ती वांचवून उद्यां वापरतां येत नाहीं. त्यापुढें कामगार बेकार राहिला कीं त्याचे कामाचे तितके दिवस वाया जातात. त्याचप्रमाणें एखाद्या देशांतील कामगारांचा पुरवठा वाढला तर त्याची उत्पादन-शक्ती वाढते हें खरें. पण त्याबरोबरच देशाची लोकसंख्या वाढून त्या प्रमाणांत गरजाही वाढतात. कामगार हा नुसता उत्पादनाचें साधन नव्हे. तर ज्याच्या गरजा पुरविण्याकरितां उत्पादन केलें जातें असा तो मनुष्यप्राणीहि आहे. भारतांत इतर साधनांच्या मानानें कामगारांचा पुरवठा आधींच रेलचेल असल्यामुळें, कामगारांची संख्या वाढल्यानें दरडोई उत्पन्नांत वाढ होण्याचा संभव फारसा नाहीं.

वर निर्देश केलेलीं साधनें महत्त्वाचीं असलीं आणि त्यांच्यावांचून उत्पादन करणें अशक्य असलें, तरी उत्पादनाच्या साधनांच्या तिसऱ्या वर्गाचें एक निराळेंच महत्त्व आहे. कारखाने, रेल्वे, जहाजें, इमारती वगैरे साधनांचा ह्या वर्गांत समावेश होतो. ह्या सर्व साधनांना भांडवल म्हणतात. हें भांडवल आणि पैशाचें भांडवल ह्यांची गल्लत करतां कामा नये. कारण पैशाचें भांडवल हें खरें भांडवल उभें करायला उपयोगी असलें तरी खुद्द उत्पादनांत त्याचा उपयोग होत नाहीं. हें खरें भांडवल नैसर्गिक संपत्ती व मेहनत ह्यांच्या संयोगांतून निर्माण होतें. लोखंड ह्या नैसर्गिक संपत्तीच्या घटकावर मनुष्याच्या मेहनतीचे संस्कार झाले म्हणजे यंत्रसामुग्रीच्या रूपानें भांडवल निर्माण होतें. आज जगांत थक्क करून सोडणारी आर्थिक प्रगती झाली आहे त्याचें मुख्य कारण म्हणजे मोठ्या प्रमाणांत जमा झालेलें भांडवल. निव्वळ नैसर्गिक संपत्ती आणि मेहनत ह्यांच्या जोरावर इतकी आर्थिक प्रगती होणें केव्हांही शक्य झालें नसतें.

हें भांडवल म्हणजे निर्माण केलेलें उत्पादनाचें साधन असतें. ह्याचा अर्थ असा कीं भांडवलाच्या सहाय्यानें उत्पादन करायचें म्हणजे तें आडवळणानें करावें लागतें. आधीं नैसर्गिक संपत्ती व मेहनत ह्यांच्या सहाय्यानें भांडवल निर्माण करावें लागतें. आणि मग तें भांडवल व इतर दोन प्रकारचीं साधनें ह्यांच्या सहाय्यानें अवश्य त्या वस्तूंचें उत्पादन होतें. म्हणजेच उत्पादनाला अधिक वेळ लागतो. उत्पादन एका टप्प्यांत न

होतां त्याचे दोन अगर अधिक टप्पे होतात. काहीं नैसर्गिक संपत्ती व मेहनत ह्यांचा उत्पादनाकडे सरळ उपयोग न होतां आडवळणानें उपयोग होतो. ह्याचाच अर्थ असा कीं भांडवल वापरायचें म्हणजे उत्पादन हातीं पडण्याकरितां थांबावें लागतें. भांडवलामुळें उत्पादन वाढतें हें खरें पण त्याकरितां भांडवल निर्माण होईपर्यंत कमी उत्पन्नावर भागवावें लागतें. त्यामुळेंच भांडवलाच्या निर्मितीला मर्यादा पडतात. अशी घस सोसावी लागली नसती तर भांडवलाची वाढ अमर्याद झाली असती आणि मग सर्वत्र आर्थिक समृद्धी झाली असती.

भांडवलाचे दोन वर्ग पडतात. खेळतें भांडवल व टिकाऊ भांडवल (fixed capital). उत्पादनाच्या एकाच क्रियेंत जें खर्चीं पडतें तें खेळतें भांडवल. उदाहरणार्थ कापूस. कापसाचें उत्पादन झालें म्हणजे कापूस खर्चीं पडतो. अधिक कापड काढायचें म्हणजे अधिक कापूस लागतो. ह्या उलट एकाच मागावर कापड पुन्हापुन्हां काढतां येतें. म्हणून माग हें टिकाऊ भांडवल. ह्या दोन प्रकारच्या भांडवलांचे गुणधर्म भिन्न असतात. आणि म्हणून हें वर्गीकरण आर्थिक विवेचनांत उपयोगी पडतें.

भांडवल व पैसा ह्यांचा फार निकटचा संबंध आहे. प्रत्येक व्यक्तीला कारखाने बांधून अगर अन्य प्रकारें भांडवल जमा करणें शक्य नसतें. तेव्हां हें कार्य प्रत्येक व्यक्ती निराळ्या प्रकारें करीत असते. आपल्याला मिळणाऱ्या पैशाच्या उत्पन्नांतील कांहीं भागाची बचत ती करीत असते. ही निरनिराळ्या व्यक्तींची बचत बँका व भांडवल बाजार ह्यांच्या द्वारें खरें भांडवल निर्माण करण्याच्या कामीं खर्च होते. भांडवलाला जर विजेची उपमा दिली, तर पैशाला विजेच्या तारेची उपमा द्यावी लागेल. पैशाच्या द्वारें भांडवलाचा प्रवाह वहात असतो. उत्पादनाच्या कामी लागत असतो. मात्र कधींकधीं पैशाच्या तारेंतून भांडवलाचा प्रवाह वहात नाहीं, म्हणजेच बचतीचें खऱ्या भांडवलांत रूपांतर होत नाहीं. बचत वांझोटी ठरते. ह्या उलट कधींकधीं पैसा नुसते तारेचेंच काम करीत नाहीं. तर डायनॅमोचें कामही करतो. खरें भांडवल स्वतंत्रपणें ( बचतीच्या द्वारें नव्हे ) तो निर्माण करतो. हें कसें काय तें आपण पुढें पाहूं.

ज्या तीन साधनांच्या संयोगांतून वस्तूंचें वा सोयींचें उत्पादन होतें, तीं उत्पादनाकरितां एकत्र आणणें हें एक स्वतंत्र आणि महत्वाचें कार्य आहे. हें कार्य झालें नाहीं तर उत्पादन अडून राहील. ह्याला आपण योजनेचें (organization) कार्य म्हणूं. तें कार्य करणारा तो योजक हें ओघानें आलेंच. हें योजनेचें काम माणसंच करीत असलीं, तरी मजूरांच्या कामाहून हें अगदीं भिन्न स्वरूपाचें आहे. हें योजनेचें कार्य म्हणजे उत्पादनाचें एक स्वतंत्र साधन आहे असें पुष्कळांचें मत आहे. कुठच्या मालाला मागणी आहे व ती किती आहे ह्याचा आडाखा योजकाला पहिल्यानें बांधावा लागतो. मग तो माल जास्तींत जास्त कार्यक्षमतेनें कसा काढतां येईल तें ठरवावें लागतें आणि अखेर त्यानुसार साधनें कामाला लावून उत्पादन करून तें गिऱ्हाईकाच्या पदरांत बांधावें लागते. हे सर्व आडाखे व हिशोब बरोबर करणें हें त्याचें काम. ते चुकले तर ती त्याची जबाबदारी.

उत्पादनाचीं हीं सगळीं साधनें महत्वाचीं खरीं पण उत्पादनाचें आणखीही एक अदृश्य पण प्रभावी साधन आहे. हें साधन म्हणजे माणसाचें ज्ञान! ह्या ज्ञानाच्या जोरावरच आपण एवढी क्रांतिकारक आर्थिक प्रगती केली आहे. जेम्स वॅटला जर वाफेच्या शक्तीचें व तिच्या उपयोगाचें ज्ञान झालें नसतें, तर अठराव्या शतकाच्या अखेरीला जी औद्योगिक क्रांती झाली ती झाली नसती. मनुष्याजवळ असलेलें सगळें भांडवल जर आज नष्ट झालें तर त्याची पुन्हां निर्मिती करणें फारसें कठीण जाणार नाहीं. पण मनुष्याजवळचा ज्ञानाचा अमोल सांठा जर हरवला तर मात्र त्याचें आजचें सगळें ऐश्वर्य कोसळून पडेल आणि त्याला हजारों वर्षें अंधारांत चांचपडत रहावें लागेल. पण हें ज्ञान अदृश्य आहे व त्याची मोजदाद करतां येत नाहीं. आणि शिवाय तो आपला सर्वांचाच वारसा आहे. त्यामुळें त्याची अर्थशास्त्रांत प्रत्यक्षपणें दखल घेतली जात नाहीं. मात्र अप्रत्यक्षपणें त्याची दखल घ्यावी लागतेच. आणि अर्थशास्त्र हा देखील ज्ञानाचा एक भागच नाहीं काय ?

ह्या निरनिराळ्या साधनांचा कसा उपयोग होतो तें आतां आपण पहायचें. सर्वसामान्यपणें कुठच्याही साधनाचा या अगर त्या अशा (alternatively) अनेक

वस्तूंच्या व सोयींच्या उत्पादनाकरितां उपयोग करतां येतो. जमिनीचा उपयोग निरनिराळीं पिकें काढण्याकडे करतां येतो. भांडवल निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनाकरितां योजतां येतें. तीच-गोष्ट कामगारांची. असें जर नसतें तर आर्थिक प्रश्न आजच्या स्वरूपांत उद्भवलाच नसता. एका साधनाचा जर एकच उपयोग असता तर तें साधन त्या कार्याला लावायचें एवढेंच आर्थिक प्रश्नाचें स्वरूप मर्यादित राहिलें असतें. पण साधनांचे निरनिराळे उपयोग असल्यामुळें आणि साधनांचा पुरवठा मर्यादित असल्यामुळें, साधनांची निरनिराळ्या वस्तूंच्या उत्पादनाकरितां विभागणी करणें हा आर्थिक प्रश्न निर्माण झाला आहे. ही विभागणी कोणत्या तत्वांवर होते ती शोधून काढणें हें अर्थशास्त्राचें महत्वाचें कार्य आहे.

साधनांचा पुरवठा मर्यादित आहे असें जें वर म्हटलें, तें संख्यावाचक अर्थानें म्हटलेलें नाहीं. हजारों एकर जमीन जरी एखाद्या देशांत असली, तरी त्या देशांतील माणसांच्या सर्व गरजा पुरविण्यास ती पुरेशी नसली तर तिचा पुरवठा मर्यादित आहे असेंच म्हटलें पाहिजे. माणसाच्या गरजा अमर्याद असल्याकारणानें साधनांचा पुरवठा हा नेहमींच मर्यादित ठरणार. असो.

साधनांचे अनेक उपयोग असतात हें आपण वर पाहिलें. पण सर्वच उपयोगांच्या बाबतींत साधनें सारखींच कार्यक्षम नसतात. एखाद्या जमिनीच्या तुकड्यांत गहूं अगर कापूस ह्यांची लागवड होणें शक्य असलें, तरी ती जमीन गहूं व कापूस ह्यांच्या उत्पादनाला सारखीच उपयुक्त असणार नाहीं जमिनीच्या बाबतींत जें खरें तेंच माणसांच्या आणि भांडवलाच्या बाबतींतही खरें आहे. माणसांपैकीं कोणी सुतारकाम चांगलें करूं शकतो तर कोणाला आंकडेमोड विशेष जमते. एखादी बोट मालाची ने आण करण्यास अधिक योग्य असते तर एखादी उतारूंच्या वाहतुकीस सोईची पडते. ह्या गोष्टीचा उत्पादनावर एक फार महत्वाचा परिणाम होतो. ह्यामुळें श्रमविभागणीचें अगर कार्यविभागणीचें तत्व अमलांत आणलें जातें. कारण ह्या तत्वानुसार उत्पादन केल्यास तें अधिक भरतें. समजा रामा व गोविंद ह्यांची अ व ब वस्तूंचें उत्पादन करण्याची शक्ती खालीलप्रमाणें आहे:—

राम एक दिवसांत ६ अ अगर १० ब निर्माण करतो.

गोविंद एक दिवसांत १० अ अगर ६ ब निर्माण करतो.

ह्याचा अर्थ असा कीं ब च्या निर्मितींत राम अधिक कार्यक्षम आहे व अ च्या निर्मितींत गोविंदाची कार्यक्षमता जास्त आहे. आतां राम व गोविंद प्रत्येकीं अर्धा दिवस अ च्या उत्पादनांत व अर्धा दिवस ब च्या उत्पादनांत घालवूं लागले तर दोघे मिळून ८ अ व ८ ब निर्माण करतील. पण रामानें जर फक्त बचेंच उत्पादन केलें व गोविंदनें फक्त अचेंच केलें तर दोघे मिळून १० अ व १० ब इतकें उत्पादन करूं शकतील. श्रमविभागणी केली म्हणजे अशा प्रकारें उत्पादनांत वाढ होते. श्रमविभागणीमुळें उत्पादनांत वाढ होण्याकरितां कुठच्या तरी एका वस्तूच्या उत्पादनांत राम हा गोविंदापेक्षां अधिक कार्यक्षम असला पाहिजे असेंच कांहीं नाहीं. राम जरी गोविंदापेक्षां अ व ब ह्या दोहोंच्या उत्पादनांत अधिक कार्यक्षम असला तरी देखील श्रमविभागणी फायदेशीरपणें करतां येते. मात्र त्याकरितां अ आणि ब यांच्या उत्पादनाचें प्रमाण राम व गोविंद ह्यांच्या बाबतींत भिन्न असलें पाहिजे.

आणि समजा जरी राम व गोविंदा दोघे सर्व बाबतींत सारखेच कार्यक्षम असले, तरी देखील श्रमविभागणीमुळें उत्पादनांत वाढ होईल. राम ज्या उत्पादन कार्याला स्वतःला वाहून घेईल त्यांत तो अधिक तरबेज होईल. गोविंदची तीच गोष्ट होईल. अशा रीतीनें दोघेही आपापल्या क्षेत्रांत अधिक कार्यक्षम होऊन त्यामुळें एकदर उत्पादनांत वाढ होईल. शिवाय अनेक वस्तूंच्या उत्पादनांत भाग घ्यायचा म्हणजे एक काम संपवून दुसरें हातांत घेतांना वेळाचा व्यय होतो. श्रमविभागणीमुळें त्या वेळाची बचत होते व कार्यक्षमता वाढते.

निरनिराळया माणसांनीं निरनिराळ्या वस्तूंचें उत्पादन करायचें एवढ्यावरच श्रमविभागणी थांबत नाहीं. एकाच वस्तूच्या उत्पादनाच्या कार्याचे अनेक भाग पाडतां येतात. आणि ह्यांतले निरनिराळे भाग निरनिराळ्या माणसांकडे सोंपवले कीं श्रमविभागणी अधिक प्रमाणांत करतां येते व कार्यक्षमतेंत वाढ होते. साध्या टांचण्या बनविण्याच्या क्रियेचे अनेक भाग कसे पाडले जातात व त्यांची निरनिराळ्या माणसांत विभागणी केल्यामुळें उत्पादन कसें वाढतें ह्याचें ॲडम स्मिथ ह्या अर्थशास्त्राच्या पित्यानें मोठें सुरस वर्णन केलें आहे. त्यानें हें जें श्रमविभागणीचें तत्व सांगितलें आहे, त्याचा कितीतरी मोठ्या प्रमाणावर आज उपयोग केला जात आहे. आणि त्यामुळें उत्पादनही खूप वाढलें आहे. मात्र श्रमविभागणीमुळें एक तोटा

होतो तो ध्यानांत घेतला पाहिजे. अतिसूक्ष्म श्रमविभागणी केली म्हणजे काम कंटाळवाणें वाटूं लागतें. त्यांत यांत्रिकपणा फार येतो. एखादी सबंध वस्तू निर्माण केल्याचा जो एक विशेष आनंद असतो त्याला त्याला मनुष्य मुकतो आणि मग त्यामुळें कार्यक्षमताही घटते.

श्रमविभागणीचें तत्व माणसांनाच नव्हे तर नैसर्गिक संपत्तीच्या व भांडवलाच्या बाबतींतही लागू पडतें हें आपण वर पाहिलेंच. इथें विशेष म्हणून एक गोष्ट सांगायची. हें श्रमविभागणीचें तत्व माणसांपेक्षांही यंत्रांना पुष्कळच अधिक प्रमाणांत लागू करण्यांत आलेलें आहे. उत्पादनाच्या क्रियेचे छोटे छोटे, साधे तुकडे पाडायचे आणि दर तुकड्याकरितां एक स्वतंत्र यंत्र बनवायचें, ही आजची उत्पादनाची रीत आहे. अशा निरनिराळ्या अनेक यंत्रांच्या उपयोगामुळें उत्पादनांत अपरिमित वाढ झालेली आहे.

श्रमविभागणीच्या तत्वाबाबत आणखी एक दोन गोष्टी ध्यानांत घेतल्या पाहिजेत. एखादा कारखाना उभारणें अगर इमारत बांधणें हें काम इतकें अजस्त्र व गुंतागुंतीचें असतें कीं श्रमविभागणी जर केली नाहीं तर तें पार पडणेंच अशक्य असतें. दुसरें असें कीं एकच मनुष्य अनेक वस्तूंचें उत्पादन करूं लागला तर त्याला उत्पादनाच्या इतर साधनांचा पूर्ण उपयोग करून घेतां येणार नाहीं. तो सूत कातीत असेल, तेव्हां त्याचा माग मोकळा राहील व तो मागावर बसेल तेव्हां त्याचा चरखा मोकळा राहील. ह्या साधनांचा असा पुरेपूर उपयोग न करणें हा एक अपव्ययच आहे. श्रमविभागणीनें हा अपव्यय टाळतां येतो. मग एक मनुष्य दिवसभर चरखा फिरवीत राहील आणि दुसरा दिवसभर मागावर बसेल.

असो. ही श्रमविभागणी शक्य व्हायची म्हणजे माणसांनीं परस्परांशीं सहकार्य करायला आणि शिस्त पाळायला तयार झालें पाहिजे. सगळींच माणसें जर एकांड्या व तुसड्या वृत्तीचीं असलीं, सहकार्याच्या भावनेचाच जर अभाव असेल तर मग अर्थात् श्रमविभागणी होणें शक्य नाहीं. हें सहकार्य नुसतें उत्पादनाच्या बाबतींत असून चालत नाहीं, तर त्या उत्पादनाच्या उपयोगाच्या बाबतींतही असावें लागतें. एक मनुष्यानें आपला सारा वेळ एकच वस्तूच्या उत्पादनांत घालवायचें ठरवलें म्हणजे तो परावलंबी होतो. कारण त्या वस्तूचें तो

जेवढें उत्पादन करील तेवढें त्याला स्वत:करितां लागण्याची शक्यता नसते. आणि तेवढ्याच वस्तूनें त्याच्या गरजा भागतील अशी अपेक्षा करणें अर्थातच वेडेपणाचें ठरेल. अशा स्थितींत स्वत: निर्माण केलेली वस्तू अगर त्या-वस्तूचा भाग इतरांना देऊं करून त्या ऐवजीं आपल्याला आवश्यक असलेल्या वस्तू त्यांच्याकडून मिळवणें हाच मार्ग शिल्लक रहातो. ह्याचाच अर्थ असा कीं श्रमविभागणी केल्यानंतर देवघेव करणें अपरिहार्यच ठरतें. देवघेव करणें जर शक्य नसेल तर श्रमविभागणी होऊं शकणार नाहीं. निर्जन बेटावर रहाणाऱ्या रॉबिन्सन् क्रूसोला जरी श्रमविभागणीचें महत्व पटलें तरी तिचा प्रत्यक्ष उपयोग करणें शक्य नाहीं.

अशा रीतीनें परस्पर सहकार्य आणि देवघेव ह्या दोन गोष्टींची श्रमविभागणीवर आधारलेल्या उत्पादनाकरितां आवश्यकता असते. ह्या गोष्टी संघटीत व सुस्थिर अशा समाजांतच असूं शकतात. ज्या समाजांत शांतता व सुव्यवस्था आहे आणि जेथें कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थितपणें होऊं शकते, तेथेंच श्रमविभागणी सर्रास व मोठ्या प्रमाणावर होऊं शकते. शिवाय देवघेव म्हटली म्हणजे गुंतागुंतीचे हिशेब करणें अवश्य ठरतें. आणि सहकार्य म्हटलें म्हणजे गुंतागुंतीचे परस्पर सबंध आलेच. या गुंतागुंती समजण्याइतकें ज्ञान वा बुद्धी समाजांत नसेल तर देखील श्रमविभागणी शक्य होणार नाहीं.

एवढ्या गोष्टी असतील तर कांहीं एक मर्यादित प्रमाणांत देवघेव होऊं शकेल आणि तितक्याच मर्यादित प्रमाणांत श्रमविभागणी देखील साधेल. कारण देवघेवींच्या शक्यतेनुसार श्रमविभागणीला मर्यादा पडतात. एखाद्या देशांतील हजारों एकर जमीन कापसाच्या लागवडीला फार योग्य असेल. पण जर त्या जमिनीवर होणारें जादा उत्पादन इतर लोक घेण्यास तयार नसतील, अगर तें त्यांस देण्याच्या बाबतींत कांहीं तांत्रिक अडचणी येत असतील तर त्या सगळ्या जमिनींत कापूस पिकविणें फायद्याचें होणार नाहीं. कारण त्या जादा उत्पादनाच्या बदली इतर आवश्यक गोष्टी जास्त प्रमाणांत मिळूं शकल्या तरच सारी जमीन कापसाखालीं घालण्यांत अर्थ आहे.

अशा रीतीने देवघेव म्हणजेच व्यापार जितक्या मोठ्या प्रमाणावर होऊं शकतो तितक्या प्रमाणांत श्रमविभागणी देखील करतां येते. आणि जितकी श्रमविभागणी अधिक करतां येते त्या प्रमाणांत उत्पादनांत देखील वाढ होते. शांतता व सुव्यवस्था असली म्हणजे देवघेव शक्य होते. पण आज जो प्रचंड प्रमाणावर व्यापार चालतो व त्याची जी गुंतागुंतीची उलाढाल होते, तो शक्य होण्यास आणखी दोन गोष्टींची आवश्यकता असते. त्या गोष्टी म्हणजे वाहतुकींची साधनें व पैसा.

वाहतुकीची साधनें नसतील तर गांवातल्या गावांत आणि फारतर आस-पासच्या पंचक्रोशींत देवघेव करणें शक्य होईल. ह्याचाच अर्थ असा कीं त्या मर्यादित विभागाला आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचें उत्पादन तेथेंच करावें लागेल आणि त्या प्रमाणांत श्रमविभागणीला मर्यादा पडतील. आपल्या देशांत व युरोपमध्येंही रेल्वे व रस्ते बांधले जाण्यापूर्वीं अशीच परिस्थिति होती. प्रत्येक गांवाला बहुतांशी स्वावलंबी होणें भाग पडत असे. कारण एखाद्या भागांत कांहीं वस्तूंचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून त्या इतरत्र विकणें शक्य नव्हतें. त्या वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणें मुळीं शक्यच नव्हतें आणि समजा शक्य असलें तरीं नेण्याआणण्याचा खर्च एवढा मोठा होता कीं त्यापायीं श्रमविभागणीपासून होणारा सारा फायदा धुऊन जावा, आणि नुकसानच पदरी यावें. पण नवीं वाहतुकींची साधनें उपलब्ध झाल्यामुळें निरनिराळ्या प्रकारचा माल मोठ्या प्रमाणावर इकडून तिकडे नेणें शक्य झालें. फार वेळ न टिकणाऱ्या वस्तू देखील दूरच्या बाजारांत नेऊन विकता येऊं लागल्या; उदाहरणार्थ मच्छी, फळें, भाज्या वगैरे. आणि वहातुकीचा खर्च देखील फार कमी झाला.

वहातुकीच्या साधनांच्या वाढीबरोबर व्यापाराच्या इतर सोयींची देखील वाढ झाली. निरनिराळ्या बाजारपेठांत कुठच्या वस्तूंना मागणी आहे व त्यांचें मूल्य काय आहे तें कळण्याची व्यवस्था झाली. मोठ्या प्रमाणावर इकडून तिकडे जाणारा माल सांठवून ठेवण्याकरितां मोठमोठी गुदामें बांधलीं गेलीं. मालाचा विमा उत-रण्याची सोय झाली. व्यापाराची तांत्रिक माहिती असलेले लोक दलाल

म्हणून व्यापारांत मदत करूं लागले. ह्या इतर सोयींची व्यापाराला फार आवश्यकता असते. वहातुकीच्या साधनांत व ह्या सोयींत आतां इतकी वाढ झाली आहे कीं, प्रत्येक देश म्हणजे एकच बाजारपेठ झाली आहे. त्या देशांत कुठूनही कुठेंही माल सुलभपणें जाऊं शकतो. इतकेंच नव्हे तर आंतरराष्ट्रीय व्यापारदेखील आतां फार मोठ्या प्रमाणावर चालू असतो. असें असल्यामुळें श्रमविभागणीला आतां बाजारपेठेच्या मर्यादा राहिलेल्या नाहींत. श्रमविभागणीच्या तत्वानुसार एका माणसानें अगर एका गांवानें एकाच किंवा वस्तूच्या एकाच भागाचें कितीही जरी उत्पादन केलें तरी जगाच्या ह्या अवाढव्य बाजारपेठेंत तें विकण्याची अडचण पडत नाहीं. त्यामुळें उत्पादनांत अतोनात वाढ झाली आहे. आर्थिक सम्रृद्धी झाली आहे.

श्रमविभागणीला जरी आतां बाजारपेठेच्या मर्यादा राहिल्या नसल्या, तरी तिला तांत्रिक मर्यादा असतात. एका विशिष्ट मर्यादेपलीकडे श्रमविभागणी केली तर त्यापासून उत्पादनांत वाढ होत नाहीं. श्रमविभागणीचें असें एक उत्तम ( optimum ) प्रमाण आहे. त्यापलीकडे श्रमविभागणी करणें फायद्याचें ठरत नाहीं.

देवघेव सुलभ होण्यास दुसऱ्या एका गोष्टीची आवश्यकता असते. ती गोष्ट म्हणजे पैसा. वाहतुकीच्या साधनांची आणि व्यापाराच्या इतर सोयींची कितीही वाढ झाली असली, तरी जर पैसा नसेल तर आजची प्रचंड व गुंतागुंतीची व्यापारी उलाढाल केवळ अशक्य होईल. पैसा इतका आवश्यक आहे कीं त्याशिवाय व्यापार चालूं शकेल अशी कल्पनाही करणें अशक्य आहे.

आपण नेहमीं पैसा वापरत असल्याकारणानें आपली वस्तूंच्या मूल्यांची मोजदाद करण्याच्या बाबतींत मोठीच सोय होते. साऱ्या वस्तूंचीं मूल्यें किंमतींच्या रूपानें ( म्हणजे पैशाच्या द्वारें ) आपण मोजीत असतों. अशा प्रकारें ती एकाच स्वरूपांत मोजल्यामुळें, निरनिराळ्या वस्तूंच्या मूल्यांची तुलना करणें आपल्याला सोपें जातें. सर्व वस्तूंच्या किंमती लक्षांत ठेवणेंही सोपें जातें आणि त्यामुळें देवघेव सोपी होतें. समजा, तुम्हीं अ ही वस्तू देऊन ब ही वस्तू घेतलीत, तर किती अ म्हणजे किती ब असें स्वतंत्र कोष्टक पैशाच्या अस्तित्वामुळें दरवेळेला बसवावें लागत नाहीं. त्या दोहोंच्या किंमतीवरून ते कोष्टक चटकन सांपडतें.

आणि त्याच वेळेला किती अ म्हणजे किती क असें आणखीही कोष्टक अवश्य तर काढतां येतें. शिवाय त्यावरून अ, ब च्या बदली देणें इष्ट कीं क च्या बदली देणें अधिक फायद्याचें तें देखील सुलभपणें ठरवतां येतें. पण समजा पैसा नसलाच तर ? अशा स्थितींत एक गुळाची ढेप दिल्यास किती साखर मिळेल किती कापड मिळेल अगर किती औषधें मिळतील, अशीं अनेक कोष्टकें आपल्याला लक्षांत ठेवावीं लागतील. आणि असें प्रत्येक वस्तूच्या बाबतींत करावें लागणें हें फार त्रासदायक व अडचणीचें ठरेल.

पैशावांचून देवघेव करायची म्हणजे गरजांची दुहेरी जुळणी ( double coincidence of wants ) व्हावी लागते. गहूं विकून तांदूळ घेऊं इच्छिणाऱ्या माणसाला नुसता गहूं विकत घ्यायला तयार असलेला मनुष्य भेटून चालत नाहीं. अगर नुसता तांदूळ विकायला तयार असलेला मनुष्यही भेटून चालत नाहीं. तर गहूं विकत घेऊन त्याबदली तांदूळ देणारा मनुष्य भेटावा लागतो. दोघांच्या गरजांची नुसती एकेरी नव्हे तर दुहेरी जुळणी व्हावी लागते. अशी जुळणी होणें किती कठीण आहे हें एक साध्या उदाहरणावरून कळून येईल. एखाद्या टायपिस्ट मनुष्याला जर सिनेमा पहायचा असेल तर सिनेमाच्या मालकाला टायपिस्टची कधीं गरज लागणार आहे त्याची वाट पहात त्याला थांबावें लागेल. आणि समजा त्याला समजलें कीं सिनेमा मालकाला बिस्किटें हवीं आहेत, तर ज्याला टायपिस्ट हवा आहे अशा बिस्किटवाल्याला त्याला हुडकून काढावें लागेल. आणि बिस्किटवाल्याला जर पीठ हवें असेल, तर कोणी पीठ विकणारा आपल्याकडून टायपिंग करून घ्यायला तयार आहे का, ह्याची चौकशी करीत तो बापडा हिंडेल. असा पीठ विकणारा जर सांपडला तर त्याचें काम करून तो पीठ घेईल. पीठ देऊन बिस्किटें घेईल आणि बिस्किटें देऊन मग त्याला सिनेमा पहातां येईल. आणि तें देखील सिनेमा मालकाची बिस्किटें खाण्याची लहर तेवढ्यांत फिरली नाहीं तर. एक साध्या देवघेवीची जर ही अवस्था तर पैशावांचून आजचा अवाढव्य व गुंतागुंतीचा व्यापार करणें कसें अगदीं अशक्य होईल तें मुद्दाम रंगवून सांगितलें पाहिजे अशांतला भाग नाहीं.

पैसा नसला तर दुसरी एक फारच मोठी अडचण निर्माण होईल. पण पैसा घेऊन बाजारांत गेलें कीं सौदा पटणें फार सोपें जातें. विक्रेत्याजवळ तुम्हांला हवी असलेली वस्तू असली ( आणि किंमतीबाबत एकमत झालें ) म्हणजे सौदा पटतो. तुम्ही देऊं करीत असलेली गोष्ट त्याला हवी आहे कीं नको हा प्रश्नच उद्भवत नाहीं. कारण पैसा सगळ्यांनाच हवा असतो. पैसा विकायला काढला म्हणजे कोणीहि त्याचें गिऱ्हाईक व्हायला तयार असतो. ह्यामुळें देवघेव फार सोयीची होते. ज्याला जी गोष्ट हवी असते ती तो पैसा देऊन घेऊं शकतो. पैसा असला कीं देवघेवीची दोन शकलें पडतात. आपल्याजवळची वस्तू देऊन आपण पैसा घेतों. आणि पैसा देऊन हवी ती वस्तू घेऊं शकतों. देवघेव अशी आडवळणानें झाली कीं अधिक सोईची पडते. कारण ज्याच्याजवळ आपल्याला हवी असलेली वस्तू आहे, त्यालाच आपल्या जवळची वस्तू विकण्याचें बंधन आपल्यावर पडत नाहीं. आपल्याजवळची वस्तू एका माणसाला विकायची व हवी असलेली वस्तू दुसऱ्याकडून घ्यायची असें करतां येतें.

पैसा असला म्हणजे गरजांची दुहेरी जुळणी न होता कसें भागतें ? पैसा प्रत्येकाला नेहमींच हवा असतो म्हणून. आणि पैसा नेहमींच प्रत्येकाला कां हवा असतो ? पैसा हा इतर सर्वांना नेहमींच हवा असतो असें प्रत्येकाला वाटत असतें म्हणून. पैसा देऊन हवी ती गोष्ट घेतां येणार नाहीं, ( म्हणजे पैसा इतरांना नको असण्याचा संभव आहे ) असें जर कळलें तर माझ्या कामाचा मोबदला म्हणून मी पैसा घेणार नाहीं. आणि मग मला कामावर ठेवणाराही इतरांकडून पैसा घेणार नाहीं. तेव्हां पैशाचा उपयोग हा एक मोठ्या गमतीदार फसवणुकीवर आधारलेला असतो. आणि ती फसवणूक आर्थिक जीवनांत अत्यंत उपयोगी पडते.

पैसा ही अशा प्रकारें मूल्यमापनाची फूटपट्टी आहे व देवघेवीचें साधन आहे. त्यामुळें लोक पैसा घेतात तो पुन्हां खर्च करण्याकरितां. बचत देखील भांडवलांत गुंतवली जाते. अशा रीतीनें पैशाचा प्रवाह सतत वहात असतो व व्यापार चालू असतो. पण कधीं कधीं काय होतें कीं लोक पैसा हातांत आला म्हणजे खर्च करण्याऐवजी तो खिशांत ठेवून देतात. पैसा पुढें खर्च करूं असा

त्यांचा विचार असतो. असें झालें म्हणजे पैशाचा प्रवाह मंदावतो. त्यामुळें व्यापारही मंदावतो. उत्पादन घटतें आणि बेकारी माजते. ह्या उलट पैसा खर्च करायची लोक घाई करूं लागले, अगर अधिक पैसा सरकारनें चलनांत आणला, तर मागणी वाढते. व्यापाराला तेजी येते. उत्पादन वाढतें व बेकारीला आळा बसतो. ह्यावरुन असें ध्यानांत येईल कीं पैसा ही केवळ एक फूटपट्टी नव्हे आणि नुसतें देवघेवीचें साधनही नव्हे. आर्थिक जीवनांतील ती एक स्वतंत्र शक्ती आहे. व्यापारांत तेजी अगर मंदी आणण्याचें सामर्थ्य पैशांत आहे.

पैसा म्हणजे निव्वळ नाणीं अगर नोटा नव्हेत. बँकांतल्या चालू ठेवी म्हणजे देखील पैसाच. बँका, भांडवलबाजार, वगैरे संस्थांच्याद्वारें पैशाचा विनियोग होतो. बचत, भांडवलाची निर्मिती, व्याजाचे दर वगैरे गोष्टींशी पैशाचे फार महत्वाचे व गुंतागुंतीचे संबंध आहेत. पण त्यांचा येथें केवळ निर्देश करणेंच शक्य आहे.

असो, अशा रितीनें पैसा व वहातुकीचीं साधनें ह्यांच्या सहाय्यानें अवाढव्य व गुंतागुंतीचा व्यापार चालूं शकतो व श्रमविभागणीचा फायदा आपल्या पदरांत पडूं शकतो.

व्यापाराचें अंतर्गत व आंतरराष्ट्रीय असे दोन भाग पडतात. यांच्या स्वरूपांत एक महत्वाचा फरक आहे. एका देशांत उत्पादनाचीं साधनं देखील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं शकतात. पण बहुधा फक्त तयार मालच एका देशांतून दुसऱ्या देशांत जातो. उत्तर प्रदेशांतला अगर मद्रासचा माणूस नोकरीला म्हणून मुंबईला येतो. पण तितक्याच सहजपणें तो लंडनला अगर कॅनबेराला जात नाहीं. शिवाय देशाच्या अंतर्गत व्यापारांत जकाती वगैरेंचे अडथळे सहसा नसतात. पण बहुतेक देश आपल्या भोवतीं जकातीच्या भिंती उभारून व्यापाराला अडथळा निर्माण करीत असतात. आणि तिसरी गोष्ट म्हणजे अंतर्गत व्यापारांत एकच चलन वापरलें जातें पण आंतरराष्ट्रीय व्यापार अनेक चलनांच्या द्वारा होतो. रुपये देऊन लंडनला माल घेतां येत नाहीं. ही अडचण परराष्ट्रीय चलनांच्या बाजारांत पौंड विकत घेऊन दूर करतां येते. पण तरं

त्यामुळें व्यापाराच्या स्वरूपांत बदल होतो. अशा रीतीनें आंतर्राष्ट्रीय व्यापाराचें स्वरूप देशांतील अंतर्गत व्यापारापेक्षां पुष्कळच भिन्न असतें.

श्रमविभागणी हें जसें उत्पादनाचें वैशिष्ट्य आहे त्याचप्रमाणें साधनांचा संयुक्त उपयोग हें देखील एक वैशिष्ट्य आहे. कुठच्याही वस्तूचें अगर सोयीचें उत्पादन कुठल्याही एका साधनाच्या सहाय्यानें होत नाहीं. बहुधा त्याकरितां तीनही साधनांचा संयुक्त उपयोग करावा लागतो. शेती करायची म्हटली म्हणजे जमीन, माणसाची मेहनत व नांगर म्हणजे भांडवल या साधनांचें सहाय्य घ्यावें लागतें. तीच गोष्ट कुठल्याही उद्योगांची. गाणाऱ्यालाही साथीला वाद्यें लागतात. कांहीं कांहीं वेळां, निरनिराळया साधनांचा किती प्रमाणांत उपयोग करायचा तेंही ठरलेलें असतें. उदाहरणार्थ एक यंत्र चालवायला एक माणूस असें प्रमाण ठरलेलें असतें पण नेहेमीच मात्र असें नसतें. निरनिराळ्या साधनांचा निरनिराळ्या प्रमाणांत उपयोग करणें शक्य असतें. उदाहरणार्थ एकच एकर जमिनींत जास्त खत घालून व जास्त मेहनत करून कांहीं विशिष्ट उत्पादन करतां येईल किंवा खत न वापरतां व मेहनत थोडी करून तेवढेंच उत्पादन जास्त जमिनींत करतां येईल. असें असल्यामुळें निरनिराळ्या साधनांचा किती प्रमाणांत उपयोग करायचा याबद्दल महत्वाचा निर्णय उत्पादनाच्या योजकाला घ्यावा लागतो.

ह्या साधनांचा कोठच्या प्रमाणांत उपयोग केल्यास त्याचा उत्पादनावर काय परिणाम होतो ह्याबद्दल कांहीं सर्वसामान्य नियम आहेत. एक नियम असा कीं एका साधनाच्या ठराविक एककांबरोबर (units) वापरायची दुसऱ्या साधनांची एककें हलुहळू वाढवीत नेलीं तर उत्पादनांत एका मर्यादेपर्यंत प्रमाणाधिक वाढ होते. ती मर्यादा गाठल्यानंतर उत्पादनाची वाढ प्रमाणबद्ध होत राहते आणि त्यापुढेंहि अशी एक पायरी येते कीं तेव्हां दुसऱ्या साधनाचा अधिक प्रमणांत उपयोग केल्यास उत्पादनांत प्रमाणाहून कमीच वाढ होते. ह्या तीन अवस्थांत उत्पादनाला अशा प्रकारें तीन निराळे नियम लागू असतात. पहिला नियम चढत्या उत्पादनाचा. दुसरा नियम प्रमाणशीर उत्पादनाचा व तिसरा उतरत्या उत्पादनाचा. हे नियम कसे लागू पडतात तें एका उदाहरणानें दाखवितां येईल. एक एकर जमिनींत जर एकच मनुष्य राबला तर उत्पादन फार कमी होईल. त्याच जमिनींत जर दोन

माणसें राबलीं तर उत्पादन दुपटीहून अधिक होईल. तेंच प्रकार तीन माणसें राबलीं तर होईल. त्यानंतर अशी एक पायरी येईल कीं त्यावेळी राबणाऱ्या माणसांची संख्या ज्या प्रमाणांत वाढेल त्याच प्रमाणांत उत्पादनही वाढेल. आणि नंतर मात्र राबणाऱ्या माणसांची संख्या ज्या प्रमाणांत वाढेल त्याहून कमी प्रमाणांत उत्पादन वाढेल.

हे नियम लक्षांत घेऊनच साधनांचा उपयोग करावा लागतो. त्याचप्राणें जितकी श्रमविभागणी अधिक, म्हणजेच उत्पादन जितकें मोठ्या प्रमाणावर, तितकें दर साधनाच्या एकेका मागें उत्पादन अधिक, हाही नियम लक्षांत घ्यावा लागतो. शिवाय मोठ्या प्रमाणावर उत्पादन केलें, म्हणजे अविभाज्य साधनांचा पूर्ण उपयोग करतां येतो, आणि म्हणूनही उत्पादनांत प्रमाणाधिक वाढ होते. रेल्वेचे रूळ हें अविभाज्य साधन. एक गाडीकरितां रूळ कमी व दोन गाड्यांकरितां जास्त अशी विभागणी करतां येत नाहीं. अशा अविभाज्य रूळावरुन जितक्या गाड्या अधिक न्याव्या तितका त्यांचा पूर्ण उपयोग होतो. म्हणजेच रूळांवरचा खर्च न वाढतां उत्पादन वाढतें. अशा रीतीनें मोठ्या प्रमाणावर उत्पादन केलें कीं उत्पादनाकरितां होणाऱ्या साधनांच्या व्ययाचें प्रमाण कमी होतें. मात्र मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचा हा फायदा ठराविक मर्यादेपर्यंतच मिळूं शकतो.

असो. हे सर्व नियम लक्षांत घेऊन दर कारखान्यांत होणाऱ्या उत्पादनाचें एक उत्तम मान ( oplinium scale ) ठरवितां येतें. ह्या प्रमाणावर उत्पादन केलें कीं त्या त्या दर एककामागें साधनांचा कमींत कमी व्यय होतो. कुठच्याही अर्थपद्धतींत उत्पादनाचें हें उत्तम मान गाठण्याची धडपड नेहेमीं चालू असते आणि तशी ती असणें अवश्य आहे.

# उद्योग स्वातंत्र्यावर आधारलेली अर्थरचना

उत्पादनाचे जे तांत्रिक प्रश्न आहेत त्यांचें स्वरूप सर्व प्रकारच्या अर्थरचनांत सारखेंच असणार आणि ते सोडविण्याचे मार्ग देखील भिन्न असण्याचें खास असें कारण नाहीं. वाहतुकीचा प्रश्न सोव्हिएट रशियांत ज्या स्वरूपाचा आहे त्याच स्वरूपाचा तो अमेरिकेंत देखील आहे. आणि अमेरिकेंत आगगाड्यांचीं चाकें वाटोळीं असलीं तर रशियांत तीं चौकोनी असण्याचें कांहींच कारण नाहीं.

पण उत्पादनाचा प्रश्न सामाजिक पातळीवर मात्र निरनिराळ्या प्रकारें सोडविण्यांत आलेला आहे. आणि आज जगांतल्या राष्ट्रांचे जे दोन गट पडले आहेत, ते सामान्यतः त्यांच्या भिन्न उत्पादन पद्धतींवरून पडलेले आहेत. याचाच अर्थ असा कीं, आज जगांत सामान्यत: दोन प्रकारच्या अर्थरचना अस्तित्वांत आहेत. (जगांतल्या अर्थरचनांतील इतर सूक्ष्म अगर कमी महत्वाचे भेद लक्षांत घेण्याचें हें स्थान नव्हे.) त्यापैकीं एकीला भांडवलशाही अर्थरचना म्हणतात आणि दुसरीला समाजवादी अर्थरचना म्हणतात. यांतली भांडवलशाही अर्थरचना ही अधिक जुनी आहे, आणि आज आपल्या देशांत ती अस्तित्वांत आहे म्हणून तिचा आपण आधीं व अधिक विस्तारानें विचार करूं. त्या मानानें समाजवादी अर्थरचनेकडे आपल्याला ओझरती नजरच टाकावी लागेल.

भांडवलशाही व समाजवादी अर्थरचना असे शब्दप्रयोग आपण केले खरे— आणि सामान्यत: हेच शब्दप्रयोग करण्यांत येतात—पण ते तितकेसे अन्वर्थक नाहींत. भांडवलशाही अर्थरचना ही देखील समाजाच्या चौकटींतच कार्य करते आणि कमी अधिक प्रमाणांत समाजाचें हित साधीत असते. आणि समाजवादी अर्थरचनेंत देखील भांडवलाच्या उपयोगाचा प्रश्न हाताळावा लागतोच. शिवाय समाजवादी अर्थरचनेंत कुठची तरी 'शाही' निर्माण होण्याचा संभव नसतो असें म्हणणें आजच्या अनुभवावरून तरी वेडेपणाचें ठरेल. तेव्हां भांडवलशाही व समाजवादी अर्थरचना असे शब्द न वापरतां स्वतंत्र अर्थरचना व नियोजित अर्थ-रचना असे शब्दप्रयोग करणेंच अधिक योग्य ठरेल. हे शब्द कसे अन्वर्थक आहेत तें ओघाओघानें स्पष्ट होईलच. पण त्या शब्दांशीं राजकीय आवेश वा पक्षनिष्ठा निगडित झालेल्या नाहींत ही देखील कांहीं कमी फायद्याची गोष्ट नव्हे.

उद्योग स्वातंत्र्य हा स्वतंत्र अर्थरचनेचा पाया आहे. आपापल्या मालकीच्या अगर ताब्यांत असलेल्या साधनांचा वाटेल त्या वस्तूंच्या उत्पादनाकरितां उपयोग करण्याची प्रत्येक व्यक्तीला ह्या अर्थरचनेंत मुभा असते. कुठच्या वस्तूचें उत्पादन करायचें, त्याकरितां कुठच्या साधनांचा उपयोग करायचा ह्याबद्दल सरकार अगर इतर कुठची संस्था नियम घालून देत नाहीं. उत्पादनाचे नियमन या अर्थव्यवस्थेंत कुठेंहि एके ठिकाणी केंद्रित झालेलें नसतें. प्रत्येक व्यक्ती, पेढी अगर कारखाना हें उत्पादनाचें केंद्र होऊं शकतें. उत्पादनाचीं अशीं अनेक केंद्रें असतात.

हें उद्योग स्वातंत्र्य अमर्याद नसतें. खून, मारामाऱ्या, मालमत्तेचा अपहार वगैरे उद्योग करण्याचें स्वातंत्र्य अर्थातच स्वतंत्र अर्थरचनेंत नसतें. त्याप्रमाणें दुसऱ्याच्या उद्योग स्वातंत्र्यावर घाला घालण्याचें स्वातंत्र्यही तेथें असूं शकणार नाहीं. सर्वांनाच उद्योग स्वातंत्र्य हवें असेल तर सर्वांनींच कांहीं बंधनें मान्य केलीं पाहिजेत. अन्य कारणांनीं देखील उद्योग स्वातंत्र्याला मर्यादा पडतात, मुरड घातली जाते. पण त्याचा विचार पुढील प्रकरणांत करावयाचा आहे.

उद्योग स्वातंत्र्य म्हटलें म्हणजे त्याच्या अनुषंगानें इतर अनेक गोष्टी आल्याच. प्रत्येक व्यक्तीला जसें उत्पादनाचें स्वातंत्र्य असतें त्याप्रमाणेंच सेवनाचेंही (consumption) स्वातंत्र्य असलें पाहिजे. व्यक्तीनें कशाचें सेवन करायचें

त्याच्यावर बंधन पडलें कीं उत्पादन स्वातंत्र्यावर आपोआप बंधन पडणारच. त्याच प्रमाणें ही दोन्हीं प्रकारचीं स्वातंत्र्यें उत्पादनाच्या साधनांची व एकंदर मालमत्तेची खाजगी मालकी असल्याशिवाय अनुभवतां येणें शक्य नाहीं. स्वतःच्या मालकीचीं अशीं जर साधनेंच नसतील तर मग स्वतंत्रपणें उद्योग करणार तरी कसा ? आणि सर्वांनाच उद्योगस्वातंत्र्य असलें म्हणजे मग स्पर्धा आलीच. बाजारांत जो माल मिळत असेल तो घेण्याकरितां ग्राहक स्पर्धा करणारच. आणि ग्राहकांना जो माल हवा असेल तो पुरविण्याकरितां योजक देखील स्पर्धा केल्याशिवाय कसे राहतील. एकाच वस्तूचे अनेक ग्राहक अन् अनेक उत्पादक असें अपरिहार्यपणें होणारच आणि ते ग्राहक आणि उत्पादक किती असावे ह्यावर मर्यादा असणार नाहीं. कारण प्रत्येकालाच उद्योगस्वातंत्र्य असणार. कसलें उत्पादन आणि सेवन करावयाचें तें ज्याचें तोच ठरविणार. कोणीही असें करावें अगर तसें करावें असें म्हणणें उद्योगस्वातंत्र्याच्या तत्वाविरुद्ध आहे.

वरील वर्णन वाचून कोणालाही असें वाटेल कीं स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत एकच गोंधळ माजत असला पाहिजे. कोणाचा पायपोस कोणाच्याच पायांत नाहीं असा प्रकार होत असेल. मागणी आणि पुरवठा ह्यांचा कांहींच मेळ बसत नसेल. कारण एकंदर मागणी किती हें योजकांना समजणें कठीण. आणि समजा हें समजलें तरी जो तो ती मागणी पुरवण्याकरितां उत्पादन करील. आणि त्यामुळें एकंदर उत्पादन मागणीच्या मानानें कमी अगर जास्तही भरूं शकेल. शिवाय उत्पादकांवर साधनांचा कार्यक्षम उपयोग करण्याचें बंधन कोणीच घालूं शकणार नाहीं. आणि मग साधनांचा अपव्यय होईल. कदाचित् साधनें बेकारही राहतील. अशा शंका मनांत येणें अगदीं साहाजिकच आहे. आणि त्या सर्व अयोग्य आहेत असेंही नव्हे. पण स्वतंत्र अर्थरचनेंत असें एक आपोआप चालणारें ( स्वयंचलित ) यंत्र आहे कीं तें ह्या अनिर्बंध विकेंद्रित आर्थिक जीवनाचें योग्य प्रकारें नियमन करतें, मागणी व पुरवठा ह्यांची सांगड घालतें, साधनांना कामाला लावतें व कार्यक्षमतेची पातळी उंच ठेवतें. ह्या यंत्रांत दोष नाहींत असें नाहीं; पण त्याचें कार्य विस्मयकारक आहे आणि कांहीं अर्थशास्त्रज्ञांचें तर असें मत आहे कीं त्या यंत्राकडून जसें कार्य घडतें तसें अन्य प्रकारें घडवून आणणें केवळ अशक्य आहे.

ह्या यंत्राचें नांव किंमत यंत्र ( Price mechanism ). बाजार पेठांतून मागणी आणि पुरवठा ह्या दोन शक्तींची जी रस्सीखेंच चाललेली असते तिचा किंमतीच्याद्वारा हे यंत्र समाधानकारकपणें निकाल लावतें. ह्या यंत्रामुळें त्या रस्सीखेचींत दोन्ही पक्ष जिंकतात! दोन्ही पक्षांचा फायदा होतो. ह्या यंत्राचें कार्य समजण्याकरितां मागणी आणि पुरवठा ह्या दोन शक्ती बाजारांत कशा प्रकट होत असतात तें आपण पाहिलें पाहिजे.

पैशाच्या सहाय्यानें श्रमविभागणीच्या तत्वानुसार चालणाऱ्या आर्थिक जीवनांत प्रत्येक माणसाच्या हातांत त्याचें उत्पन्न पैशाच्या द्वारा येतें. प्रत्येक मनुष्याच्या हातांत कांहीं एक रक्कम असते आणि ती रक्कम आपल्या गरजा पुरवण्याकरिता तो वापरीत असतो. आतां माणसाच्या गरजा ह्या सर्वसामान्यपणें त्याच्या उत्पन्नाच्या मानानें असंख्य असतात. प्रत्येक वस्तू कितीही घेतली तरी त्याची गरज भागत नाहीं. आणि भागली तरी ती तात्पुरती भागते. परमेश्वरानें मनुष्याला पांच इंद्रियें दिलीं आहेत व कल्पनाशक्तीही दिलेली आहे. त्याचाच हा परिणाम. पण ह्या गरजा पुरवायच्या म्हणजे पैसा खर्च करावा लागतो. (म्हणजे पर्यायानें उत्पादन करावें लागतें.) ग्राहक म्हणून बाजारांत जावें लागतें. आणि वस्तूंचा जो मर्यादित पुरवठा बाजारांत असतो त्यांतला आपल्याला हवा तितका भाग मिळविण्याकरितां इतर असंख्य ग्राहकांशीं स्पर्धा करावी लागते. अर्थात ही स्पर्धा करायची म्हणजे धक्काबुक्की अगर ओढाताण करायची नव्हे तर जादा किंमत देण्याची तयारी दाखवायची ( जेव्हां किंमत नियंत्रित असते तेव्हां दुकानासमोर धक्काबुक्की करावी लागते ह्याचा वाचकांना अनुभव असेलच ). अखेर जे इतरांहून जास्त किंमत द्यायला तयार असतात त्यांना ती वस्तू मिळते व इतरांना हात हालवीत परत जावें लागतें.

गरजांच्या मानानें उत्पन्न मर्यादित असल्यामुळें प्रत्येक ग्राहकाच्या सगळ्या गरजा भागणें शक्यच नसतें. स्पर्धेत ठरेल ती किंमत देऊन वस्तू घ्यायच्या म्हणजे प्रत्येक ग्राहकाच्या कांहीं गरजा आणि त्या देखील कांहीं प्रमाणांतच भागणें शक्य असतें. अर्थात् जो गरीब असेल त्याच्या गरजा कमी प्रमाणांत भागतील आणि श्रीमंत असतील त्यांच्या जास्त भागतील. पण कोणाच्याच गरजा संपूर्णपणें भागणें शक्य

नसतें. असें असल्यामुळें कुठच्या गरजा किती प्रमाणांत भागवायच्या त्याची निवड करावी लागते. अधिक निकडीच्या आणि कमी निकडीच्या असा गरजांत भेद करावा लागतो. निकडीनुसार गरजांची प्रतवारी लावावी लागते. त्यांतल्या कमी निकडीच्या असतात त्या मनुष्य भागवीतच नाहीं. आणि उरलेल्यापैकीं अधिक निकडीच्या जास्त प्रमाणांत व इतर कमी प्रमाणांत भागवतो. मनुष्य ज्यामुळें आपल्याला जास्तच जास्त समाधान लागेल अशाप्रकारें आपल्या गरजांवर आपलें उत्पन्न खर्च करीत असतो. जोपर्यंत त्याला असें वाटत असतें कीं एक वस्तू कमी घेऊन दुसरी जास्त घेतल्यास आपल्यास जास्त समाधान मिळेल, तोपर्यंत त्याच्या खर्चाच्या विभागणींत फायदेशीर फेरफार करायला जागा असते. पण कुठच्याही वस्तूवर एक आणा अगर रुपया कमी अगर जास्त खर्च करावेसे जेव्हां त्याला वाटेनासें होतें तेव्हां समाधानाची पराकोटी तो गाठतो. अशी समाधानाची पराकोटी गाठावी असा प्रत्येक ग्राहकाचा प्रयत्न असतो.

ह्या खर्चाच्या विभागणीबद्दल एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. एखादी वस्तू जशजशी जास्त प्रमाणांत विकत घ्यावी तसतसें तिचें एक जास्त एकक घेतल्यापासून मिळणारें समाधान कमी होत जातें. कपडे नसले म्हणजे त्यांची फार गरज भासते; पण जसजसें जास्त कपडे शिवावे, तसतशी आणखी एक शर्ट शिवावा अशी इच्छा कमी प्रमाणांत होऊं लागते. त्यापेक्षां एखादें पुस्तक घ्यावें अगर ग्रामोफोनच्या तबकड्या घ्याव्या असें वाटूं लागतें. असें नसतें तर खर्चाच्या विभागणीचा प्रश्न निघालाच नसता. आपली जी सर्वांत जास्त निकडीची गरज तिच्यावर प्रत्येकानें आपले सर्व पैसे खर्च करून टाकले असते. कारण त्यांतच त्याला पराकोटीचें समाधान झालें असतें. पण खरोखर तसें होत नाहीं. मनुष्य अगोदर सर्वांत अधिक निकडीच्या गरजेवर पैसा खर्च करतो. मग तिची निकड, दुसऱ्या कुठच्या गरजेच्या निकडीहून कमी झाली कीं तो दुसऱ्या गरजेवर खर्च करतो. खर्चाच्या विभागणीमागचें तत्व हें असें असतें.

एखादी गरज किती प्रमाणांत भागवायची, हें जसें तिच्या निकडीवर अवलंबून असतें, तसेंच ती गरज पुरवणाऱ्या वस्तूच्या किंमतीवर अवलंबून असतें

एखाद्या वस्तूची गरज फार निकडीची असेल पण तिची किंमत जर शंभर रुपये असेल, आणि तेच शंभर रुपये इतर गरजांवर खर्च करून जर जास्त समाधान मिळणें शक्य असेल तर मनुष्य ती महाग वस्तू विकत घेणार नाहीं. अशा रीतीनें वस्तूच्या मागणीवर तिची किंमत अवलंबून असते आणि किंमतींवर मागणी अवलंबून असते. मागणी व किंमत ह्या अशा परस्परावलंबी गोष्टी आहेत. आर्थिक जीवनाची इतर अनेक अंगेंही अशींच परस्परावलंबी असतात.

असो. अशा रीतीनें काय घ्यायचें, किती घ्यायचें आणि किती किंमतीला घ्यायचें तें ठरवून ( पुष्कळदां तो तें मुद्दाम ठरवीत नाहीं; तें आपोआपच ठरतें ) प्रत्येक ग्राहक बाजारांत जातो. म्हणजेच तो निरनिराळ्या वस्तूंची मागणी करतो. मागणी म्हणजे पैशांचें पाठबळ असलेली गरज. जितकी किंमत कमी तितकी मागणी अधिक पण अशी किंमत कमी असली तर बाजारांतल्या मालापेक्षां कदाचित् मागणी जास्त ठरेल. असें झालें म्हणजे ग्राहकांत स्पर्धा होईल. ज्यांची त्या वस्तूंची गरज अधिक निकडीची असेल ते जास्त किंमत देऊं करतील आणि ह्यामुळें ग्राहकांपैकीं कांहीं गळून पडतील, कांहीं कमी खरेदी करतील आणि अखेर अशी एक किंमत ठरेल की त्या किंमतीला बाजारांतला विकायचा माल आणि मागणी ह्यांची बरोबरी होईल. सर्व वस्तूंच्या किंमती अशा रीतीनें ठरल्या जातील. आणि किंमतीची एक उतरंड तयार होईल. ही किंमतीची उतरंड दर एक वस्तूची मागणी व बाजारांत असलेला पुरवठा ह्यांची बरोबरी करील. प्रत्येक मनुष्य ह्या किंमतींच्या आधारानें आपल्या खर्चाची अशी विभागणी करील कीं त्याला पराकोटीचें समाधान लाभेल आणि बाजारांतल्या मालाची मागणीच्या जोरानुसार निरनिराळ्या ग्राहकांत विभागणी होईल. किंमत यंत्राची एक बाजू अशा प्रकारें हें सगळें आपोआप घडवून आणील. वेगवेगळ्या गरजांची आणि खर्चाविषयींच्या बेतांची बाजारांतल्या असलेल्या मालाशीं अशाप्रकारें व्यवस्थित सांगड घातली जाते. सर्वसाधारण नियम असा कीं जशी मागणी जास्त ( कमी ) होते तशी किंमत वाढते ( कमी होते ). त्याचप्रमाणें किंमत जास्त ( कमी ) असली कीं मागणी कमी होते ( वाढते ).

मागणी जास्त नसली कीं किंमतही जास्त असते असें आपण म्हटलें तें एकंदर मागणीबाबत खरें असलें तरी कुठच्याही व्यक्तीच्या मागणीबावत मात्र तें खरें नाहीं. ह्याचें कारण असें कीं कुठच्याही एका ग्राहकाची मागणी ही एकंदर मागणीपेक्षां फारच कमी असते. कारण ग्राहक असंख्य असतात. त्यामुळें एका ग्राहकानें मागणी कमी जास्त केली तरी किंमतींत फरक पडत नाहीं. तेव्हां कुठच्याही एका ग्राहकाच्या दृष्टीनें किंमत ही त्याच्या मागणीवर अवलंबून नसते. ती अन्यप्रकारें ठरलेली असते. आणि त्या किंमतीनुसार पराकोटीचें समाधान मिळविण्याच्या हेतूनें आपली मागणी कमीजास्त करणें एवढेंच सामान्यपणें ग्राहकाच्या हातीं असतें. एखादी वस्तू जसजशी जास्त विकत घ्यावी तसतसें तिच्यापासून मिळणारें समाधान कमी होत असलें तरी तिच्या निरनिराळ्या एककांना आपण निरनिराळी किंमत मात्र देत नाहीं. पहिल्या एककाची किंमत फार जास्त आणि शेवटच्या एककाची किंमत फार कमी असा प्रकार घडत नाहीं. ह्याचें कारण असें कीं निरनिराळ्या एककांपासून मिळणारें समाधान भिन्न असलें तरी तीं एककें एकसारखींच असतात. त्यातलें अमकें पहिलें आणि अमके शेवटले असा कांहीं क्रम लागलेला नसतो. त्यामुळें निरनिराळ्या एककांना निरनिराळी किंमत असा प्रकार करतां येत नाहीं. आणि शेवटच्या एककाची किंमत तीच साऱ्यांची किंमत ठरते. त्याहून किंमत जास्त असली तर शेवटलें एकक घेणें फायद्याचें ठरणार नाहीं. म्हणून पहिल्या अगर मधल्या एककाची ( ग्राहकाच्या मनांतली ) किंमत ही साऱ्यांची किंमत होऊं शकत नाहीं.

आतांपर्यंत आपण असें गृहित धरलें कीं कांहीं एक निश्चित माल बाजारांत येऊन पडलेला आहे आणि तो विकण्याचाच काय तो प्रश्न आहे. ह्याचाच अर्थ असा कीं पुरवठ्याचा प्रश्न आपण क्षणभर बाजूलाच ठेवला आणि मागणीच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित केलें. शास्त्रीय विश्लेषणांत असें नेहमींच करावें लागतें. आणि तसें पाहिलें तर कुठच्याही एक क्षणीं अगर थोडक्या कालावधींत पुरवठा हा ठराविक असतो. माल मागें ठेवून तो कमी करतां येतो पण तो झटकन् वाढवतां मात्र येत नाहीं. तेव्हां आपण जें गृहित धरलें तें कांहीं अगदींच चुकीचें नाहीं. पण पुरवठ्याची बाजू नीटपणें समजून घ्यायची म्हणजे त्याकडे दीर्घकालीन दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे.

निरनिराळया वस्तूचा पुरवठा किती प्रमाणांत करायचा हें योजक ठरवीत असतात. आपण सर्वजण स्वतः व स्वतःच्या मालकीच्या भांडवलाच्या सहाय्यानें उत्पादनाच्या कार्यांत भाग घेत असतोंच. पण काय उत्पादन करायचें याचा निर्णय आपण सर्वजण घेत नाहीं आणि उत्पादनाची जबाबदारी आपण घ्यायला तयार नसतों. हें कार्य योजकांचा वर्ग करीत असतो. (अर्थातच कोणालाही योजक होण्याची मुभा असते.) आपण आपल्या पदरची साधनें एक ठरीव मोबदला घेण्याच्या बोलीवर त्यांच्या स्वाधीन करतों.

उत्पादन करण्यामागें या योजकांचा हेतू फायदा मिळविण्याचा असतो. म्हणजे एकीकडे ग्राहक पराकोटीचें समाधान मिळविण्याच्या प्रयत्नांत असतो. तर दुसरीकडे योजकांची जास्तींत जास्त फायदा मिळावा अशी धडपड असते. दोघेही आपापलें हित साधण्याकरितां झटत असतात. (याचा अर्थ ते निव्वळ स्वार्थी असतात असा नव्हे. हिताच्या कल्पना कमीअधिक व्यापक असूं शकतात.) कुठचीही वस्तू कमी किंमतींत मिळविण्यांत ग्राहकांचें हित असतें. कारण त्यामुळें तो आपल्या उत्पन्नांतून अधिक वस्तू खरेदी करूं शकतो व समाधान वाढवूं शकतो. या उलट कुठचीही वस्तू जितकी महाग विकतां येईल, तितका योजकाला (इतर बाबींत फेरफार न झाल्यास) अधिक फायदा मिळतो. म्हणजे दोघांचें हित परस्पर विरोधी असतें. यामुळें स्वतंत्र अर्थरचनेंत गोंधळ उडत असेल असें वाटण्याचा संभव आहे; पण खरोखर किंमतयंत्राच्या सहाय्यानें दोघांच्या हितांची मोठी गमतीदार सांगड घातली जाते. आणि स्वतःचें हित साधतांना योजक अखेर ग्राहकांचेंच हित साधतो. हें कसें होतें तें आपण पाहूं.

कुठच्याही योजकापुढें अनेक वस्तू निर्माण करण्याची शक्यता असते. त्या निरनिराळया वस्तूंचें उत्पादन केल्यास काय किंमत मिळेल याबद्दल त्याची कांहीं अपेक्षा असते. त्याच प्रमाणें उत्पादनाकरितां वापरायच्या साधनांना काय मोबदला द्यावा लागेल, म्हणजेच आपल्याला उत्पादन खर्च किती करावा लागेल याचाही त्याच्या मनांत आडाखा तयार असतो. एकंदर विक्रीपासून होणारी प्राप्ती व एकंदर उत्पादन खर्च यांतला फरक म्हणजे फायदा. हा फायदा ज्या वस्तूच्या उत्पादनापासून जास्त प्रमाणांत मिळेल तिचेंच उत्पादन योजक करूं पहाणार.

पण कायद्याच्या वासानें एकच नव्हे तर अनेक योजना त्या वस्तूचें उत्पादन करायला धांवतील. म्हणजे त्या वस्तूच्या उत्पादनांत वाढ होईल. हें वाढलेलें उत्पादन विकायचें म्हणजे त्या वस्तूची किंमत कमी करावी लागेल. कारण आपण पाहिल्याप्रमाणें ग्राहकाला जसजशीं एकादी गोष्ट अधिकाधिक प्रमाणांत मिळूं लागते तसेतसें तिच्या अखेरच्या एककाच्या सेवनापासून त्याला मिळणारें समाधान कमी कमी होतें. आणि किंमत व कडेचें समाधान (marginl satisfaction) ह्यांची बरोबरी करण्याचा त्याचा प्रयत्न असल्यामुळें जास्त पुरवठा तो कमी किंमतीला विकत घेतो. उत्पादनाच्या वाढीमुळें किंमत घटते इतकेंच नव्हे तर उत्पादन खर्चही वाढतो. अशा रीतीनें दोन्हीं बाजूंनीं फायदा कमी होत असतो पण जोपर्यंत फायदा मिळत असतो, तोपर्यंत अधिक फायदा मिळावा म्हणून योजक उत्पादन वाढवीत असतात. आणि नवे योजक त्या उद्योगांत प्रवेश करीत असतात. अशा रीतीनें उत्पादन वाढतच रहातें. आणि अखेर जेव्हां अजिबात फायदा मिळेनासा होतो तेव्हांच उत्पादनांत होणारी वाढ थांबते. अशा रीतीनें फायदा मिळविण्याच्या धडपडीमुळें फायदाच नष्ट होतो. आणि ग्राहकाला वस्तू उत्पादन खर्चाइतक्यांच किंमतीला मिळते. एका वस्तूच्या बाबतींत जें होतें, तेंच सर्व वस्तूंच्या बाबतींत होतें, आणि ग्राहकाला सर्व वस्तू शक्य तितक्या स्वस्त मिळतात.

योजकांमधील स्पर्धेचे आणखी दोन परिणाम होतात. त्या स्पर्धेमुळें कुठचीही वस्तू बाजारांत, सर्वांना एका किंमतीलाच विकावी लागते. कारण इतरांहून कोणी जास्त किंमत सांगितली तर त्याच्याकडून ती कोणीच विकत घेणार नाहीं. दुसरा परिणाम अधिक महत्वाचा आहे. ह्या स्पर्धेमुळें जास्तींत जास्त कार्यक्षम असलेले योजकच उत्पादनाच्या क्षेत्रांत टिकाव धरून राहूं शकतात. ज्यांचा उत्पादनखर्च जास्त, त्यांना अधिक कार्यक्षम योजकांइतक्या स्वस्त दरानें आपला माल विकतां येत नाहीं व त्यांना त्या उद्योगांतून निवृत्त व्हावें लागतें. अशा रीतीनें किंमत यंत्राच्याद्वारें साधनांचा जास्तींत जास्त कार्यक्षम उपयोग साधला जातो.

किंमतयंत्र अशा रीतीनें अनेक गोष्टी साधतें. एक तर त्याच्या योगें मागणी आणि पुरवठा ह्यांची बरोबरी होते. मागणी जास्त असली म्हणजे किंमत वाढते. त्यामुळें मागणी कमी होते, आणि पुरवठा वाढतो; व अखेर दोहोंची बरोबरी

होते. पुरवठा जास्त असला तर किंमत घटते व उलटे फेरबदल होऊन मागणी आणि पुरवठा ह्यांची बरोबरी होते. शिवाय कुठच्याही वस्तूची बाजारांत एकच किंमत असते. वस्तू ग्राहकाला कमींत कमी किंमतीला मिळते आणि त्याकरितां उत्पादनाच्या साधनांचा जास्तींत जास्त कार्यक्षमतेनें उपयोग केला जातो. ही कामगिरी कांहीं थोडथोडकी नव्हे. पण तेवढ्यावरच कांहीं भागत नाहीं. किंमत यंत्राच्या द्वारें आणखी एक महत्वाचें कार्य घडत असतें.

उत्पादनाच्या साधनांना मोबदला देऊन योजक त्यांना कामाला लावतो. आणि त्याकरितां त्याचा जो खर्च होतो तो उत्पादन खर्च होय. हा उत्पादन खर्च म्हणजे साधनांच्या किंमतींची गोळाबेरीज ! निरनिराळ्या उद्योगधंद्यांत साधनांची विभागणी कशी व्हायची हें साधनांच्या किंमतीच्या द्वारा ठरत असतें. आपल्या मालकीच्या साधनांना जास्तींत जास्त किंमत मिळावी हा प्रत्येकाचा हेतू असतो. आणि ही जास्तींत जास्त किंमत मिळविण्याकरितां साधनांत स्पर्धा चालू असते. निरनिराळे योजक आपल्या उत्पादनकार्याकरितां हीं साधनें आपल्याकडे आकर्षून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. म्हणजेच तीं साधनें मिळविण्याकरितां योजकांची परस्परांत स्पर्धा चालू असते. अशा रीतीनें साधनांचे ग्राहक व विक्रेते ह्यांची आपापसांत स्पर्धा असते.

ह्या स्पर्धेत जे योजक जास्त किंमत देऊं करतात त्यांच्याकडे कोणतेंही साधन ( उदाहरणादाखल आपण एकच साधन घेऊं ) आकर्षिले जातें. पण ही जास्त किंमत देणारे योजक जर त्या साधनाचा सर्व पुरवठा वापरूं शकले नाहींत तर मात्र साधनांच्या मालकांत चढाओढ सुरू होते. ज्यांची साधनें कामावर घेतलीं नाहींत असे मालक थोड्या कमी किंमतीला आपलीं साधनें योजकांना देऊं करतात. हेतू हा कीं आपल्याकरितां साधनांनीं बेकार राहूं नये. अशा रीतीनें किंमत उतरून अखेर त्या साधनाचीं सर्व एककें कामावर घेतलीं जातात. म्हणजेच किंमतयंत्राच्या द्वारें कुठच्याही साधनाचा उत्पादनाकरितां संपूर्णपणें उपयोग केला जातो. व साधनें बेकार राहूं नयेत अशी तरतूद केली जाते.

साधनांची प्रत्येक उद्योगांतील मागणी आणि पुरवठा ह्यांची अशाप्रकारें बरोबरी होतेच. आणि शिवाय साधनांची एकंदर मागणी आणि एकंदर पुरवठा ह्यांचीही

बरोबरी होते. अर्थात्‌ कुठच्याही साधनाला प्रत्येक उद्योगांत सारखीच किंमत मिळते. कारण कुठच्याहि उद्योगांतील योजकांनीं कमी किंमत देऊं केली तर साधनें दुसऱ्या उद्योगांकडे धांव घेतील. ह्याचा परिणाम एक तर असा होईल कीं त्या साधनांची दुसऱ्या उद्योगांतील किंमत कमी होईल किंवा त्या उद्योगांतील योजकांना अधिक किंमत देऊं करावी लागेल. ह्यापैकीं कुठचा प्रकार किती प्रमाणांत घडेल तें त्या उद्योगांत एकंदर साधनाच्या पुरवठ्यापैकीं किती भाग वापरला जातो त्यावर अवलंबून राहील.

योजकाची साधनांकरितां मागणी आणि ग्राहकाची वस्तूकरितां मागणी ह्यांत एक महत्वाचा फरक असतो. ग्राहकाची मागणी ही आपल्या गरजा पुरवण्याकरितां असते. त्यामुळें ती मागणी किती असेल आणि तो किती किंमत देऊं करील ह्याबद्दल नियम प्रस्थापित करणें कठीण असतें. तें सर्वस्वीं त्याच्या आवडीनिवडीवर अवलंबून असतें. पण योजकाची जी साधनांकरितां मागणी असते ती मात्र परावलंबी असते. ग्राहकांच्या मागणीवर ती मागणी अवलंबून असते. ग्राहकांनीं एखादी गोष्ट जास्त प्रमाणांत मागितली म्हणजे त्या वस्तूचें उत्पादन करणारे योजक आपली साधनांची मागणी देखील वाढवितात. आणि ग्राहकांची मागणी कमी झाली म्हणजे त्यांचीही मागणी कमी होते. त्याचप्रमाणें एखाद्या उद्योगधंद्यांतील योजक साधनांना किती किंमत देऊं करतात तें त्यांनीं उत्पादन केलेल्या वस्तूला किती किंमत मिळते ह्यावर अवलंबून असतें. ह्याबाबतींत योजकांचा दृष्टिकोण पुढीलप्रमाणें असतो. कुठच्याही एका विशिष्ट परिस्थितींत एखाद्या साधनाचें एक जादा एकक कामावर घेतलें तर उत्पादनांत कांहीं एक वाढ होते व त्या जादा उत्पादनाची कांहीं एक जादा किंमत योजकाच्या हातांत येते. ह्या किंमतीहून कमी किंमत देऊन त्या साधनाचें जादा एकक कामावर घ्यायला योजक तयार असतो. कारण त्यामध्यें त्याचा फायदा असतो. अशा परिस्थितींत योजक साधनाची मागणी वाढवतो. त्याची अधिकाधिक एककें कामावर घेतो. असें तो करूं लागला कीं दोन गोष्टी होतात. जसजसें त्याचें उत्पादन वाढतें तसतसें तो तें कमी किंमतीला विकूं शकतो. म्हणजे त्याला साधनांचीं अधिक एककें कामावर घेतल्यामुळें मिळणारें जादा उत्पन्न घटत जातें.

शिवाय तांत्रिक कारणांमुळें देखील एका विशिष्ट मर्यादेनंतर साधनांची अधिक एककें सारख्याच प्रमाणांत उत्पादनवाढ करूं शकत नाहींत. जसजशीं जास्त एककें कामावर घ्यावीं तसतशी उत्पादनांत कमी प्रमाणांत वाढ होते. ह्या कारणामुळें देखील साधनांची अधिक एककें कामावर घेतल्यामुळें मिळणारें जादा उत्पन्न घटत जातें; आणि अनेक योजक जर जास्त प्रमाणांत साधनें कामावर घेत असतील तर प्रत्येक साधनाची किंमत देखील वाढत जाते. पण जोंपर्यंत जादा उत्पन्न आणि जादा खर्च ह्यांमध्यें फरक असतो तोपर्यंत साधनांचीं अधिक एककें कामावर घेणें योजकांस फायद्याचें असतें. पण अखेर एक वेळ अशी येते कीं ज्यावेळीं जादा उत्पन्न हें जादा खर्चाहून अधिक असत नाहीं. अशा वेळीं आणखी एक एकक कामावर घेतलें काय अगर न घेतलें काय, योजकाच्या दृष्टीनें तें सारखेंच असतें. त्यामुळें त्याच्या नफ्यांत कांहीं फरक पडण्यासारखा नसतो. ह्या ठिकाणीं योजक अधिक साधनें कामावर घेण्याचा थांबतो. असा तो थांबला आणि जर कांहीं साधनें बेकार राहिलीं तर त्यांचे मालक तीं कमी किंमतीला देऊं करतात. त्यामुळें त्यांना कामावर घेणें योजकांना फायदेशीर ठरतें. आणि अखेर हीं सर्व साधनें कामावर घेतलीं जातात.

तेव्हां साधनांच्या किंमती, त्यांची मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ तर घालतातच पण त्याचवेळीं त्यांची उत्पादनशक्ती (marginal productivity) आणि किंमत ह्यांचीही बरोबरी होते. आणि साधनांच्या निरनिराळ्या एककांत भिन्नता नसल्यामुळें आधींच्या एककांचें उत्पादन जरी अधिक असलें तरी अंत्य उत्पादनाइतकाच मोबदला सर्व एककांना मिळतो. ह्याच कारणामुळें कुठच्याही साधनाला निरनिराळ्या उद्योगांकडून तोच मोबदला मिळतो. आणि म्हणून त्यांचें दर उद्योगांतील अंत्य उत्पादन सारखेंच असतें. मात्र त्यांची निरनिराळ्या उद्योगांत सारख्या प्रमाणांत विभागणी होते असें मात्र नव्हे. कारण प्रत्येक उद्योगांत साधनांचीं किती एककें वापरलीं असतां त्यांचें अंत्य उत्पादन त्यांच्या किंमतीइतकें होईल, तें प्रत्येक उद्योगाच्या उत्पादनाची किंमत, उत्पादनाचें प्रमाण आणि तांत्रिक परिस्थिती ह्यांवर अवलंबून असतें. एखाद्या उद्योगाच्या उत्पादनाला जर मागणी जास्त असेल आणि किंमत चांगली येत असेल तर त्यांत साधनें अधिक

प्रमाणांत कामावर घेतलीं जातील आणि एखाद्या उद्योगाच्या उत्पादनाला मागणी कमी असेल आणि किंमत तितकीशी चांगली नसेल तर त्यांत साधनें कमी प्रमाणांत कामावर घेतलीं जातील.

अशा रीतीनें ग्राहक व योजक ह्यांचे बेत, आपापसांतील स्पर्धा आणि परस्परसंबंध ह्यांच्या योगानें बाजारांत मागणी, पुरवठा व किंमती ह्यांत सारखा फरक होत असतो. उत्पादन व सेवन ह्यांचा मेळ बसत असतो. स्वयंचलित किंमतयंत्राचें काम हें असें चालू असतें. त्यामुळें उत्पादनाचे व सेवनाचे गुंतागुंतीचे प्रश्न समाधानकारकपणें सुटतात. जो तो आपल्या मनाप्रमाणें वागत असतांना सगळ्यांचेंच हित साधलें जातें. आर्थिक जीवनाचें केंद्रित असें नियमन नसतांना देखील तें सुरळीतपणें चालू शकतें. ह्यामुळेंच एकोणिसाव्या शतकांतील अर्थशास्त्रज्ञांनीं या किंमत यंत्राचीं स्तुतिस्तोत्रें गाईलीं.

पण हें किंमतयंत्र ज्याप्रकारें चालतें त्यावर पहिल्यापासून टीका देखील होत आलेली आहे. नुसत्या समाजवादी विचारसरणीच्या लोकांनींच नव्हे तर अर्थशास्त्राच्या निःपक्षपाती अभ्यासकांनीं देखील त्यांतील दोष दाखवून दिले आहेत. ह्या सर्व दोषांचें विवेचन स्थलाभावी येथें करणें शक्य नाहीं. पण त्यांतील कांहीं ठळक दोषांचा मात्र येथें निर्देश करणें आवश्यक आहे. त्या आधीं हें सांगितलें पाहिजे कीं वर जें ह्या किंमत यंत्राच्या कार्याचें वर्णन दिलेलें आहे तें फार सोपें व स्थूल स्वरूपाचें आहे. मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ बसणें, कार्यक्षमतेची पराकोटी गाठणें आणि साधनांची निरनिराळ्या उद्योगांत योग्य विभागणी होणें ह्या गोष्टींचा मेळ बसेपर्यंत सहाजिकच पुन्हां परिस्थिती बदलते ( उदा : मागणींत फेरफार होतात ), आणि पुन्हां नवीन मेळ बसावा लागतो. म्हणजे किंमत यंत्र जो मेळ बसवतें तो मेळ नीट असा कधीं बसलेला नसतोच. शिवाय आजकालच्या उत्पादनाच्या तांत्रिक पद्धतीमुळें साधनें अधिकाधिक एकमार्गी (specialized) झालेलीं आहेत. त्यांचा प्रवाहीपणा (mobility) कमी झाली आहे. त्यामुळें साधनें एका उद्योगांतून दुसऱ्या उद्योगांत बदलत्या परिस्थितीनुरूप चटकन् जाऊं शकत नाहींत. त्यामुळें देखील हा मेळ नीटसा बसत नाहीं. त्याचप्रमाणें आजकाल उत्पादनाला बराच वेळ लागतो त्यामुळें पुढें किती मागणी असेल ह्याचा अंदाज

बांधून उत्पादन करावें लागतें आणि हे अंदाज चुकले कीं हा मेळ बिघडतो. तेव्हां किंमतयंत्र वाटतें तितक्या सुरळीतपणें आपलें काम करीत नाहीं. शिवाय अज्ञान, धडपडेपणाचा अभाव वगैरे गोष्टींमुळें देखील ह्या यंत्राचें कार्य मंदावतें.

किंमत यंत्र नीटपणें चालायचें म्हणजे ग्राहकांत व योजकांत स्पर्धा चालावी लागते. ग्राहकांतील स्पर्धा सर्वसाधारणपणें नेहेमीं चालू असली तरी योजकांतील स्पर्धा मात्र पुष्कळदा बंद पडते अलीकडे तांत्रिक कारणांमुळें पुष्कळदां थोडेसे योजकच एखाद्या वस्तूचा पुरवठा करूं शकतात. या थोड्या योजकांना असें दिसून येतें कीं आपसांतील स्पर्धेमुळें किंमत घटते व ग्राहकाचा फायदा होतो. तेव्हां ते एकत्र येऊन आपसांतील स्पर्धा थांबवतात व पुरवठा मर्यादित करून किंमती वाढवतात (ज्या उद्योगांत असंख्य योजक असतात त्यांत हें जमत नाहीं). त्यामुळें किंमत यंत्राच्याद्वारें ग्राहकांचें हित साधलें जात नाहीं. अशा मक्तेदाऱ्या ( monopolies ) जाहिरातीच्याद्वारा आपल्या मालाची खास गोडी निर्माण करून अगर अन्य प्रकारेंही निर्माण होऊं शकतात. अलीकडे अशा मक्तेदाऱ्यांचें प्रमाण वाढत आहे. आणि त्यांचें आर्थिक सामर्थ्य इतकें मोठें असतें कीं त्या सरकारवर देखील दडपण आणूं शकतात.

किंमतयंत्राचा मोठा गुण असा समजला जातो कीं त्याद्वारा सगळया साधनांना कामावर घेतलें जातें. पण खरोखर हें कार्य किंमतयंत्राकडून नीटपणानें होत नाहीं. पुन्हां पुन्हां स्वतंत्र अर्थरचना आर्थिक भोंवऱ्यांच्या कचाट्यांत सांपडत असते आणि त्यामुळें कांहीं काळ आर्थिक भरभराट होत असली तरी त्यानंतर अपरिहार्यपणें विपन्नावस्था येते. आधीं तेजी आणि मग मंदी असें हें रहाट गाडगें सदैव चालू असतें. आणि विपन्नावस्था आली कीं साधनें फार मोठ्या प्रमाणावर बेकार होतात, देशाचें उत्पन्न घटतें आणि अनेकांचें जीवन दारिद्र्यानें व निराशेनें काळवंडून जातें. हें कसें घडतें त्याचें सविस्तर विवेचन करणें फार उपयुक्त असलें तरी ते तेथें शक्य नाहीं. इतकेंच म्हणतां येईल कीं या ना त्या कारणानें मागणी घटते. त्यामुळें उत्पादन कमी करावें लागतें. उत्पादन कमी झालें कीं साधनें बेकार होतात व त्यापासून होणारें उत्पन्न ( म्हणजेच एकंदर पैशाचें उत्पन्न ) घटतें. त्यामुळें मागणी आणखी घटते. आणि अशा आर्थिक भावऱ्यांत

आर्थिक जीवन सारखें गटंगळ्या खात रहातें. कांहींचें मत असें आहे कीं ह्या आर्थिक भोंवऱ्यावर उपाय नाहीं. स्वतंत्र अर्थरचना मोडून टाकणें व नियोजित अर्थरचना स्थापित करणें हाच त्यावरचा उपाय. पण इतर पुष्कळांचें मत असें नाहीं. मात्र त्यांचेंही मत असें आहे कीं निव्वळ किंमत यंत्राच्या द्वारा अर्थरचना चालवणें शक्य नाहीं. इतर उपाय योजले तरच या आर्थिक धोक्यांतून सुटका होणें शक्य आहे.

किंमत यंत्राच्या मदतीनें चालणाऱ्या स्वतंत्र अर्थरचनेचा आणखी एक महत्वाचा दोष असा कीं तींत होणारी संपत्तीची विभागणी विषम असते. हें जर खरें असेल तर त्याची कारणें पहाणें महत्त्वाचें आहे. आणि तेवढेंच आपण पाहूं.

स्वतंत्र अर्थरचनेंत उत्पादनाच्या साधनांची खाजगी मालकी असते. माणसाचे श्रम देखील खाजगी मालकीचे असतात. पण ते मात्र ज्याचे त्याच्याच मालकीचे असतात. एकाच्या श्रमांवर दुसऱ्याची मालकी गुलामगिरीच्या काळांत जरी होती तरी आतां नाहीं. श्रम हे सगळ्यांच्याच मालकीचे असल्यामुळें त्यांच्यापासून सगळ्यांनाच उत्पन्न मिळतें. पण त्यांत देखील पुष्कळेच विषमता असते. ह्या विषमतेचीं कारणें आपण आधीं पाहूं. कांहीं कांहीं वेळां ही विषमता दुसऱ्या एका विषमतेला काट देणारी असते. सगळींच कामें कांहीं सारखीं त्रासदायक अगर धोकादायक असत नाहींत. गिरणीच्या मजूरांना मिळतें त्याहून खाणींत काम करणाऱ्या कामगारांना सर्वसामान्यपणें जास्त उत्पन्न मिळतें. पण ह्याचें कारण असें कीं गिरणीतलें काम हें तुलनेनें कमी कष्टांचें असतें व त्यांत धोकाही कमी असतो. त्यामुळें खाणकामगारांचा पगार जास्त असूनही पुरेसे लोक गिरण्यांतून काम करायला तयार असतात. आणि जास्त वेतन दिल्याशिवाय मात्र पुरेसे खाणकामगार मिळत नाहींत. ही विषमता दिखाऊच असते. कारण सोपें व बिनधोक काम करण्यापासून होणारा फायदा गिरणी कामगारांच्या वेतनांत मिळवला कीं तो खाणकामगाराच्या वेतनाइतकाच होतो. ह्याच कारणानें कमी पगार मिळाला तरी सामाजिक प्रतिष्ठा मिळावी म्हणून लोक मजूरी न करतां कारकुनी करतात. वकीली करून मिळणारे हजारों रुपये सोडून पार्लमेंटचे अल्प वेतनावर सभासद होतात. श्रमापासून मिळणाऱ्या उत्पन्नांतील विषमतेचें दुसरें एक कारण म्हणजे कौशल्यांतील फरक. कांहीं माणसें कांहीं कामांत कुशल असतात तर कांहीं माणसें इतर कामांत कुशल असतात. आणि

कांहीं माणसें तर सर्व बाबतींतच इतरांहून अधिक कुशल असतात. ज्याचें कौशल्य अधिक त्याला पगार अधिक आणि ज्या प्रकारच्या कौशल्याला मागणी अधिक तें कौशल्य ज्याच्या अंगीं असेल त्याला पगार अधिक. असा हा आर्थिक न्याय आहे. ह्यामुळें पुष्कळदां असेंही होतें कीं संगीताचें मामुली ज्ञान असणाऱ्या पण लचकदार गाणाऱ्या गायिकेला हजारों रुपये मिळतात आणि संगीतसम्राट भुकेकंगाल रहातात. कांहींवेळेला असें होतें कीं एखाद्या उद्योगांतील कामगार संघटित होतात. आपसांतील स्पर्धा बंद करतात. आणि इतर कामगरांना देखील आपल्या उद्योगांत प्रवेश करूं देत नाहींत. अशा रीतीनें स्पर्धा बंद पाडून मक्तेदारांच्या प्रमाणेंच ते कामगार इतर कामगारांहून जास्त पगार मिळवूं शकतात. कधीं निव्वळ सामाजिक संकेतांमुळेंच देखील वेतनांत विषमता येते. पुष्कळदां स्त्री मजूर पुरुष मजूराइतकेंच काम करतात. पण त्यांची कार्यक्षमता कमी ह्या कल्पनेनें त्यांना कमी पगार दिला जातो आणि त्या तो घेतातही. वेतनांत जी फार मोठी विषमता असते, ती पुष्कळदां शिक्षणांतील फरकामुळें निर्माण होते अलीकडे पुष्कळशीं कामें करायची म्हणजे त्यांकरितां शिक्षणानें ज्ञान मिळवावें लागतें. शिक्षणावर खर्च करावा लागतो. अशा शिक्षित मनुष्याला मिळणाऱ्या पगारांत शिक्षणावर खर्च केलेल्या पैशावरील व्याजाचाही अंतर्भाव होतो. परंतु निव्वळ व्याजानें ह्या फरकाचा उलगडा होत नाहीं. खरी गोष्ट अशी कीं शिक्षण-विशेषतः उच्च शिक्षण-घेण्याकरितां लागणारा पैसा बहुसंख्य लोकांच्याजवळ नसतो. त्यामुळें ज्या थोड्यांजवळ तें घेण्याकरितां पैसा असतो, त्याना शिक्षण घेतल्यावर इतरांच्या मानानें फारच अधिक पैसा मिळतो. सर्वांना जर फुकट शिक्षण मिळालें तर इंजिनिअर व झाडूवाला ह्यांच्या पगारांतली आजची तफावत पुष्कळच कमी होईल आणि समाजाचाही पुष्कळ फायदा होईल.

उत्पन्नांतील विषमतेचें अधिक महत्वाचें कारण म्हणजे श्रमाशिवाय इतर साधनांची खाजगी मालकी. स्वतंत्र अर्थरचनेंत जरी सर्वांनाच भांडवल साठविण्याचा अधिकार असला तरी वस्तुतः भांडवल थोड्याच माणसांजवळ असतें. आणि सर्वांजवळ जरी कदाचित् तें असलें तरी कांहींच्या जवळ फारच अधिक प्रमाणांत असतें. ज्यांच्याजवळ भांडवल असतें, त्यांना

इतरांहून पुष्कळच अधिक उत्पन्न मिळतें. मागासलेल्या देशांत भांडवलाची कमतरता असल्यामुळें तर तें कामीं लावल्याचा मोबदला पुष्कळच मिळतो. मक्तेदाऱ्या, राजकीय दडपण वगैरे साधनांचा उपयोग करतां आला तर हें उत्पन्न अधिकच वाढूं शकतें. हें भांडवल वंशपरंपरेनें वारसांना मिळत जातें. म्हणजे कांहीं लोकांजवळ जमलेलें भांडवल पुष्कळांत विभागलें जाण्याची व्यवस्थाच नसते. त्यामुळें ही विषमता टिकून रहाते. इतकेंच नव्हे तर ती वाढते. कारण ज्यांचें उत्पन्न अधिक त्यांची बचतही अधिक. त्यामुळें ते आपल्या भांडवलांत भर घालूं शकतात आणि त्यांचें उत्पन्न वाढतें. शिवाय ते आपल्या मुलाबाळांना शिक्षण देऊं शकतात आणि त्यामुळें ही त्यांचें उत्पन्न वाढतें. यापैकीं कुठल्याच प्रकारानें गरीबांचें उत्पन्न वाढूं शकत नाहीं. त्यामुळें तें कमीच रहाण्याचा संभव फार. मात्र त्याबरोबर हेंही खरें कीं देशांतलें भांडवल जसें वाढतें तसें देशाचें एकंदर उत्पादनही वाढतें. त्यांत गरीबांचाही वाटा असतोच. त्याशिवाय देशाची लोकसंख्या जर भांडवलापेक्षां अधिक प्रमाणांत वाढत नसेल तर भांडवलाच्या वाढीमुळें गरिबांचें उत्पन्न नुसतें वाढतें इतकेंच नव्हें तर भांडवलाच्या मालकीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाहून अधिक प्रमाणांत वाढतें. या गोष्टी वेगानें आर्थिक प्रगती करणाऱ्या देशासंबंधीं विचार करतांना विशेष लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत.

संपत्तीच्या विभागणींतील ही विषमता कांही प्रमाणांत कमी करणें हें स्वतंत्र अर्थरचनेच्या चौकटींत देखील शक्य असतें. श्रीमंतांवर अधिक कर लादून आणि गरिबांवर अधिक खर्च करून सरकारला असें करतां येतें. पण पुढच्या प्रकरणाच्या विषयाला इथें हात घालणें इष्ट होणार नाहीं. म्हणून हें प्रकरण येथेंच पुरें करतों.

# सरकारी हस्तक्षेप

स्वतंत्र अर्थरचनेंत आर्थिक जीवनाचीं चक्रें खाजगी प्रयत्नांनींच फिरत असतात. त्यामुळें सरकारनें आर्थिक जीवन नियंत्रित करण्याचा अगर त्याला गती देण्याचा प्रश्नच उद्भवूं नये. आर्थिक जीवनाशीं सरकारचा संबंध अप्रत्यक्ष व दूरचाच असावा. वस्तुत: पुष्कळ काळपर्यंत जवळ जवळ अशीच परिस्थिती होती. सरकार आर्थिक जीवनांत विशेष असा हस्तक्षेप करीतच नसे. स्वतंत्र अर्थव्यवस्था सुरळितपणें चालण्याकरितां जेवढ्या गोष्टी अवश्य होत्या, तेवढ्याच सरकार करीत असे. कायदा व सुव्यवस्था ह्यांची अंमलबजावणी करणें हें सरकारचें प्रमुख कर्तव्य असे. आणि आज देखील सरकारचें हेंच मूलभूत कर्तव्य आहे. स्वतंत्र अर्थरचनेंत प्रत्येकाला उद्योग स्वातंत्र्य असतें. ह्याचाच अर्थ असा कीं एकाचें स्वातंत्र्य दुसऱ्याच्या स्वातंत्र्याआड येऊन चालत नाहीं. शिवाय उत्पादनाचा व देवघेवीचा व्यवहार व्यवस्थित चालावा लागतो. करार अंमलांत आणण्याची सोय असावी लागते या गोष्टी साधण्याकरितां कायदा व सुव्यवस्था यांची जरूरी नाहीं.

कायदा व सुव्यवस्था ह्यांची ही गरज पुरविण्याकरितां सरकारला राज्य यंत्र उभारावें लागतें. आपल्या पदरीं मोठें सैन्य बाळगावें लागतें आणि प्रसंगीं युद्धही करावें लागतें. अलीकडच्या काळांत युद्धाकरितां केवढी तयारी करावी लागते तें सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. त्याचप्रमाणें अंतर्गत सुरक्षिततेसाठीं देखील पोलिसांचीं दलें ठेवावीं लागतात, कायद्याच्या अंमलबजावणीकरितां अधिकारी नेमावे लागतात आणि न्यायालयें चालवावीं लागतात. विकसित व गुंतागुंतीच्या अर्थरचनांत हें मोठ्या प्रमाणावर करावें लागतें.

ह्याचाच अर्थ असा कीं आपलें कार्य करण्याकरितां सरकारला उत्पादनाचीं साधनें वापरावीं लागतात. आणि सर्वसाधारणपणें हीं साधनें स्वतंत्र अर्थरचनेच्या चौकटींत प्राप्त करून घ्यावीं लागतात. अर्थव्यवस्थेतील योजकांशीं स्पर्धा करून म्हणजेच योग्य ती किंमत देऊन मगच सरकारला ही साधनें मिळूं शकतात. आपलें कर्तव्य बजावण्याकरितां सरकारला प्रतिवर्षी पुष्कळ पैसा खर्च करावा लागतो. हा पैसा मिळविण्याकरितां सरकारला कांहीं निराळे व विशेष मार्ग योजावे लागतात. योजक जो पैसा साधनांवर खर्च करतात तो त्यांना आपलें उत्पादन विकून मिळत असतो. त्यामुळें त्यांना साधनांना देण्याकरितां पैसा मिळविण्याचा खास असा प्रयत्न मिळत नाहीं. मात्र सरकारची अशी परिस्थिती नसते. कायदा व सुव्यवस्था वगैरे सुखसोई सरकार, लोकांना उपलब्ध करून देतें त्यांची विक्री करणें पुष्कळदां शक्य नसतें, सोईचें नसतें वा योग्य नसतें. सहाजिकच सरकारला आपल्या खर्चाकरितां लागणारा पैसा अन्य मार्गांनीं उभा करावा लागतो. हे मार्ग मुख्यतः दोन आहेत. एक म्हणजे लोकांच्यावर कर लादून पैसा गोळा करणें. आणि दुसरा म्हणजे लोकांच्या कडून कर्ज काढणें. पण आज कर्ज काढून खर्च भागवला तरी उद्यां तें कर्ज परत द्यावें लागतें. शिवाय कर्जावर व्याज द्यावें लागतें तें निराळेंच. अशा स्थितींत कर्ज काढणें हा कांहीं खर्च भागविण्याचा नेहेमींचा मार्ग असूं शकणार नाहीं. करांच्या द्वारेंच सामान्यपणें नेहेमींचा खर्च भागवावा लागतो. फार मोठा आणि कधींतरी उद्भवणारा खर्च करायचा असला म्हणजेच बहुधा कर्ज काढलें जातें. कर अनेक प्रकारचे असतात. त्यांची प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर अशी विभागणी केली जाते. प्राप्तीवरचा कर हा प्रत्यक्ष कर. कारण जो मनुष्य तो देतो त्याच्यावरच तो लादला जातो. विक्रीकर हा अप्रत्यक्ष कर; कारण तो लादला जातो विक्रेत्यांवर पण विक्रेते तो ग्राहकांकडून अंशतः अगर पूर्णपणें वसूल करतात. अशा रीतीनें तो अप्रत्यक्षपणें ग्राहकांकडून घेतला जातो.

कायदा व सुव्यवस्था ह्यांची सरकार अशा प्रकारें अंमलबजावणी करतें. एकेकाळीं हेंच सरकारचें महत्वाचें कर्तव्य असें. पण आतां मात्र ही परिस्थिती साफ पालटली आहे. सरकारच्या कर्तव्यांत फार प्रचंड

प्रमाणांत वाढ झालेली आहे. आज सरकार आर्थिक जीवनांत प्रत्यक्ष भाग घेत असतें. तें नियंत्रित करीत असतें. अगर त्यावर परिणाम तरी घडवून आणीत असतें. संपत्तीचें उत्पादन व तिची विभागणी ह्या दोन्ही बाबतींत सरकार हस्तक्षेप करीत असतें. स्वतंत्र अर्थरचनेंतल्या ज्या दोषांचा मीं गेल्या प्रकरणांत निर्देश केला तेच बहुधा ह्या फरकाला जबाबदार आहेत. शिवाय लोकशाहीची वाढ झाल्यामुळें एकतंत्री राजसत्तेच्या कालांत सरकारी हस्तक्षेपाविषयीं जी धास्ती वाटे ती आतां वाटेनाशीं झाली आहे. त्याचप्रमाणें राज्यकारभाराच्या तंत्रांत आतां सुधारणा झाल्या असल्याकारणानें देखील सरकारला आर्थिक जीवनांत फायदेशीर रीत्या हस्तक्षेप करणें सहजसाध्य झालें आहे

कायदा व सुव्यवस्था ह्यांची विक्री करणें जसें अशक्य आहे, त्याचप्रमाणें अशा इतर अनेक सुखसोयी आहेत कीं त्यांची विक्री करणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ नगरांची जर योजनापूर्वक वाढ झाली तर तें सर्वांच्याच दृष्टीनें फायद्याचें ठरेल. पण म्हणून नगरवाढीची योजना तयार करून ती लोकांना विकणें शक्य होणार नाहीं. तेव्हां अशा योजना तयार करणें व त्या गळीं उतरवणें हें काम सरकारलाच अंगावर घ्यावें लागतें. तसेंच देशांत अधिक झाडें लावलीं व बागा केल्या तर नागरिकांची प्रकृती सुधारेल व त्यांना अधिक प्रसन्न वाटेल. पण झाडें व बागबगिचे यांपासून होणाऱ्या या फायद्याची विक्री करणें अशक्य आहे. त्यामुळें खाजगीरित्या अशा प्रकारचें उत्पादन होणार नाहीं. तें सरकारलाच करावें लागेल. अशारितीनें, कांहीं सार्वजनिक स्वरूपाच्या मागण्यांचें समाधान किंमतयंत्राच्या द्वारें होऊं शकत नाहीं. आणि तरी पण त्यांचें समाधान होणें जनहिताच्या दृष्टीनें फार आवश्यक असतें. म्हणून त्यांचें समाधान करण्याचें कार्य सरकार आपल्या अंगावर घेतें.

किंमतयंत्र ज्या प्रमाणें कांहीं मागण्या पुरवूं शकत नाहीं. त्याप्रमाणें किंमत-यंत्राला इतर कांहीं मागण्या पुरवूं देणें योग्य नसतें. अफू, गांजा वगैरे पदार्थांची मागणी किंमत यंत्राच्या द्वारें भागवली गेली, तर त्यांचा फार मोठ्या प्रमाणावर खप होईल. व तें जनहिताच्या दृष्टीनें अपायकारक ठरेल. तेव्हां किंमतयंत्राचें कार्य कांहीं बाबतींत थांबवावें लागतें--नियंत्रित करावें लागतें. उद्योगस्वातंत्र्याला मुरड

घालावी लागते. कांहीं अपायकारक वस्तूंच्या उत्पादनावर व विक्रीवर मुळीं बंदीच घालण्यांत येते इतर कांहीं वस्तूंचे उत्पादन प्रत्यक्षपणें अगर अप्रत्यक्षपणे ( म्हणजे कर लादून ) नियंत्रित केलें जातें. पुष्कळ देशांत दारूवर जबर कर बसवून तिची किंमत वाढविण्यांत येते. हेतू हा कीं लोकांनीं दारू कमी प्रमाणांत प्यावी.

आदर्श स्पर्धा असेल तेव्हांच किंमतयंत्र व्यवस्थितपणें काम करतें. व साधनांची निरनिराळया उद्योगधंद्यांत योग्य प्रमाणांत विभागणी होते. असें झालें म्हणजे ग्राहकांना माल कमींत कमी किंमतीला मिळतो. पण पुष्कळ वेळां अशी आदर्श स्पर्धा अस्तित्वांत असत नाहीं आजकाल तर मक्तेदाऱ्यांची वाढ फार मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. ह्या मक्तेदाऱ्यांच्यामुळें ग्राहक लुबाडला (Exploited) जातो, उत्पादनाच्या खर्चाहून त्यास मालाला जास्त किंमत द्यावी लागते. आणि ही जास्त किंमत घेतां यावी म्हणून मक्तेदार उत्पादन मुद्दाम कमी करतो. अशा परिस्थितींत ग्राहकाचें संरक्षण होणें अवश्य असतें. ह्याकरितां अनेक उपाय योजले जातात. सरकार अनेक प्रकारें हस्तक्षेप करीत असतें. कांहीं वेळां सरकार मक्तेदारांनीं कांहीं विशिष्ट प्रकारची माहिती जनतेला पुरवावी असें त्यांच्यावर बंधन घालतें. ही माहिती मिळाली म्हणजे मक्तेदार आपली किती प्रमाणांत व कशी लुबाडणूक करीत आहेत हें जनतेला समजेल. आणि मग जनता मक्तेदाराच्या मालावर बहिष्कार घालील अगर त्याच्याशीं स्पर्धा करणाऱ्यांना उत्तेजन देईल अशी अपेक्षा असते. ग्राहकांचा आपल्यावर असा रोष होऊं नये, म्हणून मक्तेदार देखील आपल्या लुबाडणुकीला आळा घालतील. अर्थात् जनमत किती जोरदार आहे त्यावरच ह्या उपायाचा परिणाम अवलंबून राहील. मक्तेदारांनीं आपल्याशीं स्पर्धा करणाऱ्या योजकांना अयोग्य प्रकारें हुसकून लावूं नये म्हणूनही त्यांच्यावर निर्बंध घालण्यांत येतात. उदाहरणार्थ पुष्कळदां आपल्या प्रतिस्पर्ध्यांना हुसकून लावण्याकरितां मक्तेदार आपल्या मालाची किंमत तात्पुरती उत्पादनखर्चाहून कमी करतात. अशी गैरवाजवी स्पर्धा मक्तेदारांनीं करूं नये असे त्यांच्यावर निर्बंध घालावे लागतात. मात्र स्पर्धा गैरवाजवी केव्हां होते तें ठरवणें फार कठीण आहे. वाजवी स्पर्धेतून देखील मक्तेदाऱ्या निर्माण होऊं शकतात. आणि लोकमताच्या दडपणानें त्यांच्याकडून होणारी लुबाडणूक थांबवली जात नाहीं. अशा वेळीं त्यांच्यावर निरनिराळे निर्बंध घालावे

लागतात. मक्तेदारांच्या किंमतींवर अगर नफ्यावर बहुधा हे निर्बंध घातले जातात. मक्तेदाऱ्या बहुधा एखाद्या उद्योगांतील निरनिराळ्या कारखान्यांच्या एकीकरणांतून निर्माण होतात. हीं एकत्रीकरणेंच बंद पाडलीं तर मक्तेदाऱ्या निर्माण होणार नाहींत असें वाटल्यामुळें, कांहीं देशांत हीं एकत्रीकरणें बेकायदा ठरविण्यांत आलीं आहेत. पण ह्या बाबतींत देखील पुष्कळ अडचणी उपस्थित होऊं शकतात ह्या गोष्टीची नोंद केली पाहिजे.

मक्तेदाऱ्यांचें नियंत्रण करण्याकरितां सरकार जसें हस्तक्षेप करतें, त्याच प्रमाणें मक्तेदाऱ्या निर्माण करण्याकरितां देखील सरकारला हस्तक्षेप करावा लागतो. हें अर्थातच चमत्कारिक दिसतें. पण कांहीं परिस्थितींत मक्तेदाऱ्या निर्माण करणें हे जनतेच्या दृष्टीनें फायद्याचें असतें. विजेचा अगर पाण्याचा पुरवठा करायचा म्हणजे अनेकांच्या मालकीच्या जागांतून नळ अगर तारा न्याव्या लागतात. आणि ह्या बाबतींत अडवणूक होऊं नये म्हणून सरकार कंपन्यांना कुठूनही आपले नळ वा तारा नेण्याची परवानगी देतें. पण असें अधिकार अनेक कंपन्यांना दिले तर तें जागांच्या मालकांना फार अडचणीचें होईल म्हणून असे अधिकार एकाच कंपनीला दिले जातात व त्या विशिष्ट विभागांत त्या कंपनीची मक्तेदारी निर्माण होते. मात्र ह्या मक्तेदारीचा दुरूपयोग होऊं नये म्हणून अवश्य ते निर्बंध घालण्यांत येतात. त्याचप्रमाणें एकाच विभागांत दोन निरनिराळे रेल्वे कंपन्या असणें हें अयोग्य वाटतें. एकाच भागांत दोन निरनिराळे रेल्वे मार्ग बांधण्यांत पैसा खर्च करणें हें पुष्कळदां उधळपट्टीचें असतें. असें होऊं नये म्हणून देखील कायद्यानें मक्तेदारी निर्माण करण्यांत येतें. कधीं कधीं भांडवल गुंतविण्यास उत्तेजन म्हणून मक्तेदारी निर्माण करावी लागते. सरकारला एखाद्या उद्योगाचें जर नियंत्रण करायचें असेल तर त्यांतील निरनिराळ्या कंपन्यांचें एकत्रीकरण करणें अवश्यक ठरतें. मग नियंत्रण व्यवस्थितपणें करतां येतें. पण ह्या सर्व बाबतींत मक्तेदारीचा दुरूपयोग होऊं नये अशी शक्य ती काळजी घेतली जाते.

मक्तेदाऱ्यांचें नियंत्रण करणें जर जड जाऊं लागलें तर सरकार त्यांचा मालकी हक्क आपल्याकडे घेतें व उद्योग आपण स्वत:च चालवतें. सरकार मक्तेदार असलें तर मक्तेदारीचे दुष्परिणाम टळतात. कारण नफा मिळविणें ही सरकारची

वृत्ती नसते. आणि समजा सरकारनें नफा मिळवला तरी तो अखेर जनहिताकरितांच खर्च होत असतो. इथें हेंही नमूद केलें पाहिजे कीं कधीं कधीं निव्वळ नफा मिळविण्याच्या हेतूनेंच सरकार स्वतःकडे एखाद्या वस्तूची मक्तेदारी घेतें. उदाः फ्रेंच सरकारकडे काडेपेट्या व तंबाखू ह्या वस्तूंच्या विक्रीची मक्तेदारी आहे. अशा मक्तेदाऱ्यांतून सरकार जो फायदा मिळवितें, तो एक प्रकारचा करच असतो.

किंमत यंत्राच्या कार्यांत आणखी देखील एक दोष असतो. सर्वसाधारणपणें किंमतयंत्राच्या द्वारें प्रत्येक योजक आपलें हित साधण्याच्या प्रयत्नांत असतांना, सगळ्या समाजाचेंही हित साधलें जातें. उत्पादन खर्च व किंमत ह्यांत कांहींच फरक रहात नाहीं इतक्या मर्यादेपर्यंत उत्पादनाचें प्रमाण ढकललें जातें. उत्पादनावर होणारा साधनांचा व्यय व त्यापासून मिळणारें समाधान ह्यांचा बरोबर मेळ बसतो. पण असें नेहमींच मात्र होत नाहीं. ह्याला मक्तेदारीशिवाय इतर कारणें देखील आहेत. कधीं कधीं उत्पादन खर्चांत एखाद्या वस्तूच्या उत्पादनाकरितां समाजाला सोसाव्या लागणाऱ्या सर्व झीजेचा समावेश होत नाहीं. म्हणजे उत्पादनाकरितां योजक जेवढा खर्च करतो त्याहून समाजाचा अधिक खर्च होत असतो. ह्या बाबतींत आपण एखाद्या कोळशावर चालणाऱ्या गिरणीचें उदाहरण घेऊं. कोळशावर गिरण चालवली म्हणजे तिचा धूर व धुरळा आसपास पसरतो. त्यामुळें आसपासच्या इमारतींची खराबी होते. आसपास रहाणाऱ्या लोकांना कपडे धुण्याकरितां जास्त खर्च करावा लागतो. आणि मुख्य म्हणजे त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो. समाजाच्या दृष्टीनें हें सर्व उत्पादन खर्चांतच जमा झालें पाहिजे. पण खरोखर योजकाला मात्र ह्याबाबींवर कांहींच खर्च करावा लागत नाहीं. त्याला आसपासच्या लोकांचीं धोब्याची आणि डॉक्टरचीं बिलें खात्रीनें द्यावीं लागत नाहींत. त्यामुळें त्याचें उत्पादन त्याला फायद्याचें ठरतें. पण समाजाच्या दृष्टीनें ते फायदेशीर असणार नाहीं. निदान तितकें फायदेशीर तरी असणार नाहीं. समाजाच्या दृष्टीनें कोळशाऐवजीं विजेवर गिरण चालविणें अधिक योग्य असेल. पण हा इतर खर्च योजकावर पडत नसल्यामुळें त्याला तें फायद्याचें वाटणार नाहीं. अशा रीतीनें जनहित व योजकाचें हित ह्यामध्यें फारकत होईल. असें इतर अनेक बाबतींत होणें शक्य आहे. अशा परिस्थितींत योजकाच्या नफा

मिळविण्याच्या प्रयत्नांत समाजाच्या हितास धोका पोहोंचू नये अशी सोय करणें अवश्य ठरतें आणि त्याकरितां सरकाला नियंत्रणें बसवावीं लागतात अगर अन्य प्रकारें हस्तक्षेप करावा लागतो.

विशेषतः मागासलेल्या देशांत उत्पादनाच्या व एकंदर आर्थिक प्रगतीच्या मार्गांत अनेक अडचणी असतात. आणि मागणी व पुरवठा ह्यांच्या जोरावर चाललेलें किंमतयंत्र ह्या अडचणी दूर करूं शकत नाहीं–निदान त्वरितपणें तरी दूर करूं शकत नाहीं. अशावेळीं आर्थिक प्रगती व्हावी म्हणून सरकारला अनेक प्रकारें हस्तक्षेप करावा लागतो. किंमतयंत्राच्या मार्गांतल्या आडचणी तरी दूर कराव्या लागतात अगर उत्पादनवाढीला प्रत्यक्षपणें सहाय्य करावें लागतें.

कामगार वर्गाचें हित साधणें हा देखील सरकारी हस्तक्षेपामागचा महत्वाचा हेतू असतो. औद्योगिक क्रांती होऊन मोठ्या प्रमाणावर जेव्हां उत्पादनाला सुरवात झाली. तेव्हां कामगारांना अतिशय वाईट परिस्थितींत काम करावें लागत असे. कामाचे तास फार असत व वेळा गैरसोईच्या असत. कारखान्यांच्या इमारती गैरसोईच्या असत व तेथें काम केल्यामुळें प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होत असे. अपघात होण्याची फार धास्ती असे. ह्या सर्व गोष्टींपासून कामगारांचें संरक्षण करण्याकरितां सरकारला कामगार विषयक कायदे करणें भाग पडलें. आतां बहुतेक देशांत कामाचे तास, कारखान्यांची रचना वगैरे बाबतींत कायद्यानें नियंत्रण करण्यांत आलेलें आहे.

कामगार वर्गाला अपघात, आजारीपण, बेकारी वगैरे संकटांना वारंवार तोंड द्यावें लागतें. पण त्याकरितां लागणारा पैसा बहुधा त्यांच्याजवळ नसतो. ह्यामुळें त्यांना अनेक हाल अपेष्टा सहन कराव्या लागतात. त्यांच्यांत असंतोष माजतो. आणि त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होऊन त्यामुळें समाजाचेंही नुकसान होतें. असें होऊं नये म्हणून सरकार कायदे करीत असतें. कारखान्यांत काम करीत असतां जर मजूराला अपघात झाला तर सामान्यपणें त्याला नुकसान भरपाई मिळावी अशी कायद्यानें सोय केलेली असतें. त्याचप्रमाणें कामगार आजारी पडला तर त्याला औषधोपचार व्हावे व खर्चाला कांहीं पैसे मिळावें अशीही सोय

अनेक देशांत केलेली असते. बेकारीच्या काळांत देखील कामगाराला मदत करण्यांत येते. ही मदत किती व किती काळ पर्यंत मिळायची ह्याबद्दल निरनिराळ्या देशांत निरनिराळे नियम असतात. ही जी निरनिराळ्या प्रसंगीं मदत करण्याची सोय असते तिला सामाजिक विमा पद्धती असें म्हणतात. कारण ह्याकरितां मजूर, कारखानदार व कधीं कधीं सरकार असे तीन पक्ष पैसा देत असतात. हें विम्याचेंच तत्व आहे. कारण दर कामगारामागें ह्या तिन्ही पक्षांकडून लहानशीं रक्कम गोळा होते आणि मग एकंदर रकमेंतून जे कोणी वरील अडचणींत सांपडतात त्यांना मदत केली जाते. ही पद्धत पहिल्यानें जर्मनींत सुरू करण्यांत आली आणि मग तिचा इतरत्र फैलाव झाला. आपल्या देशांत कामगाराना अपघाताबद्दल नुकसान भरपाई मिळावी अशी सोय करण्यांत आलेली आहे. पण इतर प्रकारचा सामाजिक विमा आपल्याकडे उतरण्यांत येत नाहीं. ह्याचें कारण आपल्या देशाचें दारिद्र्य. मात्र अशा प्रकारची विमा पद्धत निदान कांहीं मोठ्या उद्योगांत सुरू व्हावी अशा प्रकारची योजना सरकारपुढें अलीकडे मांडण्यांत आलेली आहे.

बेकार कामगारांना नोकरी मिळविण्यास मदत व्हावी म्हणून सरकारतर्फे काम केंद्रे ( employment exchanges ) चालविण्यांत येतात. ह्या केंद्रांतर्फे कामगारांना कुठें व कुठच्या प्रकारच्या नोकऱ्या मिळणें शक्य आहे ह्याबद्दल माहिती पुरवली जाते. आपल्या देशांतही अशाप्रकारचीं काम केंद्रें सरकार चालवितें.

कामगारांना कमी मजूरी देऊन त्यांची पिळणूक करण्यांत येते म्हणून कांहीं देशांत मजूरीबद्दल कायदे करण्यांत आलेले आहेत. प्रत्येक उद्योगांत अगर एकंदर सर्व उद्योगांत एका किमान मजूरीहून कमी मजूरी देण्यांत येऊं नये असें कायद्यानें ठरविण्यांत येतें. आपल्या देशांत असा किमान मजूरी विषयींचा कायदा करावा असा विचार होता. पण अनेक तांत्रिक व इतर अडचणींमुळें तो बेत सोडून द्यावा लागला. किमान मजूरी ठरविण्याबाबत एक अडचण अशी कीं मालाच्या किंमती व कामगारांचा जीवन खर्च कमी जास्त होत असतो. त्यानुसार किमान वेतनांतही फरक करणें अवश्य ठरतें आणि असा पुन्हां पुन्हां फरक करणें त्रासाचें ठरतें. त्याचप्रमाणें निरनिराळ्या प्रदेशांत व उद्योगांत निरनिराळ्या मजुऱ्या ठरवून त्यांत

सारखा फेरबदल बदलत्या परिस्थितीनुरूप करावा लागतो. किमान वेतन ठरवून कामगारांची मजूरी वाढवली कीं तावडतोब किंमतींत वाढ होऊन त्या वाढलेल्या मजूरीपासून होणारा फायदा नष्ट होण्याचा संभव असतो. ह्याकरितां पुन्हां मजूरी वाढवली तर पुन्हां तोच परिणाम होणें शक्य असतें. बरें, किंमतींत वाढ झाली नाहीं अगर होऊं दिली नाहीं तर उत्पादन तोट्याचें ठरून योजक कामगारांना काढून टाकण्याचीही शक्यता असते. अशा रीतीनें जास्त वेतन मिळून कामगारांचा एका बाजूनें फायदा झाला तर दुसऱ्या बाजूनें बेकारी वाढून त्यांचें नुकसान होतें कांहीं विशिष्ट परिस्थिती सोडल्यास कायद्यानें मजुरांचा पगार वाढविणें अशक्य आहे व अयोग्यही आहे असें अर्थशास्त्रज्ञांचें मत आहे.

कामगारांच्या हिताची जपणूक व्हावी म्हणून बहुतेक देशांत कामगार संघटना अस्तित्वांत आलेल्या आहेत. ह्या संघटना अनेक प्रकारें कामगारांना मदत करीत असत. पण ह्यांचें मुख्य कर्तव्य म्हणजे संप करून अगर अन्य प्रकारें मालकवर्गाशीं लढा द्यायचा आणि कामगारांना अधिक सुखसोयी व पगार मिळवून द्यायचा. ह्या कामगार संघटनांचें स्वरूप, त्यांचे हक्क व त्यांचीं कर्तव्यें ह्याबाबत नियंत्रण घालणें हें कामगारांच्या व देशाच्याही हिताच्या दृष्टीनें अवश्य असतें. म्हणून सरकार ह्याबावतींत कायदे करीत असतें. कांहीं आवश्यक उद्योग ( उदा. रेल्वे ) सोडले तर इतर उद्योगांत संप करण्याचा कामगारांचा हक्क अनेक देशांत मान्य करण्यांत आलेला आहे. मात्र फॅसिस्ट व कम्युनिस्ट राजवटींत हा संपाचा हक्क निरनिराळ्या कारणाकरितां मानला जात नाहीं. राजकीय हेतूनें करण्यांत आलेले संप आणि सार्वत्रिक संप ह्यांना सगळ्याच देशांत बंदी असते आणि संप करण्याची इतरांवर जबरदस्ती करण्याचा कामगारांना अधिकार नसतो. संप करण्याचा हक्क जरी मान्य करण्यांत आला असला तरी कामगार व मालक ह्यांचे झगडे सामोपचारानें मिटावे म्हणून निरनिराळ्या योजना सरकारनें केलेल्या असतात. कामगारांचे प्रतिनिधि व मालक ह्यांनीं एकत्र येऊन बोलणीं करावीं म्हणून त्यांच्या समित्या निर्माण केलेल्या असतात. ह्या समित्यांच्या द्वारें जर समझोता झाला नाहीं तर लवादातर्फे वाद तोडला जावा अशीही सोय करण्यांत येते. ह्या झगड्यांचा निकाल लावण्याकरितां औद्योगिक न्यायालयें देखील

स्थापन केलेलीं असतात. असें अनेक मार्गांनीं सरकार कामगारांच्या हिताचें संरक्षण करीत असतें, आणि कामगार चळवळींचें नियंत्रण करीत असतें.

देशांतील चलनाच्या पुरवठ्याचें नियंत्रण करण्याचें कार्य मध्यवर्ती बँक करीत असते. ही बॅंक सरकारच्या मालकीची तरी असते किंवा सरकारचें तिच्यावर नियंत्रण तरी असतें. पैसा हें निव्वळ देवघेवीचें निरुपद्रवी साधन नाहीं तर आर्थिक जीवनांतील ती एक महत्वाची शक्ती आहे. देशांतील पैशाचा पुरवठा आणि देशांतील किंमती ह्यांचा घनिष्ठ संबंध आहे. सर्वसाधारणपणें चलनाच्या पुरवठ्यांत विशेष वाढ झाली कीं किंमती वाढूं लागतात आणि तो पुरवठा कमी झाला कीं किंमती घसरूं लागतात. युद्धकाळांत आपल्या देशांतील चलनांत पुष्कळ वाढ झाल्यामुळें, आपल्या देशांतील किंमतीही कशा वाढल्या आहेत तें आपण सर्वांनीं पाहिलेलेंच आहे. पण चलनाच्या पुरवठ्याचा नुसत्या किंमतीवरच परिणाम होत असता तर त्याला इतकें महत्व प्राप्त झालें नसतें. किंमतींतील फरकामुळें उत्पन्नाच्या विभागणींत फेरबदल झाला असता. ( ह्याचें कारण असें कीं सगळ्या किंमती म्हणजे पारिणामत: सगळीं उत्पन्नें सारख्या प्रमाणांत बदलत नाहींत. ) पण किंमतींत फरक होऊं लागला कीं त्याचा देशांतील उत्पादनावर परिणाम होतो. स्थूल मानाने असें म्हणतां येईल कीं किंमती वाढत चालल्या म्हणजे उत्पादन वाढतें, जास्त साधनें कामावर घेतलीं जातात. ह्या उलट किंमतींत घट होत असली म्हणजे उत्पादनाचा संकोच होतो व साधनें बेकार होऊं लागतात. हें अर्थात कांहीं विशिष्ट परिस्थितीच खरें असतें असें असल्या-कारणानें चलन पुरवठ्याचें नियंत्रण ही फार महत्वाची गोष्ट होऊन बसली आहे आणि देशांत जेव्हां बेकारी असेल तेव्हां चलन पुरवठ्यांत इष्ट ते फरक करून उत्पादन वाढवणें हें सरकार नियंत्रित मध्यवर्ती बँकेचे कर्तव्य समजलें जातें. अर्थचक्र हें आर्थिक जीवनावरचें एक फार मोठें संकट आहे. अर्थचक्राच्या फेऱ्यामुळें देशांत बेकारी माजली कीं साधनें निरुपयोगी होऊन पडून राहतात. जीवनमान खालीं येतें आणि बेकारीमुळें फार हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. ह्या फेऱ्यांतून चलन नियंत्रणामुळें सुटका करून घेतां येते. चलन व व्याजाचा दर ह्यांचा फार निकटचा संबंध आहे. स्थूलपणें असें

म्हणतां येईल कीं चलनवाढ झाल्यावर व्याजाचे दर खालीं येतात आणि चलनांत घट झाली कीं ते वाढतात. चलनवाढीमुळें जे आर्थिक जीवनावर परिणाम होतात. तेच व्याजाचा दर खालीं नेल्यामुळें होतात आणि व्याजाचा दर वाढला कीं त्याचे परिणाम चलनांतल्या घटीच्या परिणामांसारखेच असतात. त्यामुळें व्याजाचा दर व चलन ह्या दोन्हीं गोष्टींचें निमंत्रण करून मध्यवर्ती बँक आर्थिक जीवनांत इष्ट ते फरक घडवून आणते. हें निमंत्रण म्हणजे सरकारच्या हातांतील दोन पात्यांची कुऱ्हाड ( double headed axe ) आहे असें एका अर्थशास्त्रज्ञानें म्हटलेलें आहे.

एवढ्या नियंत्रणानें भागतेंच असें मात्र नाहीं. आणि मग इतर उपाय योजावे लागतात. देशांतील भांडवलाचा कशा प्रकारें उपयोग होतो ह्यावरही नियंत्रण घालावें लागतें ( qualitative control of credit ). कांहीं क्षेत्रांत भांडवलानें प्रवेश करूं नये असे निर्बंध घालावे लागतात तर कांहीं क्षेत्रांत भांडवलाचा प्रवाह मोठ्या प्रमाणावर वहावा म्हणून उत्तेजन द्यावें लागतें.

चलनवाढ केली व व्याजाचे दर कमी झाले कीं योजकांना हुरूप येतो. कमी खर्चांत उत्पादन करणें त्यांना शक्य होतें आणि म्हणून ते बेकार साधनें कामावर घेतात व उत्पादन करूं लागतात. ह्या वाढत्या उत्पादनाकरितां लागणारा पैसा चलनवाढीमुळें उपलब्ध झालेला असतोच. असें उत्पादन वाढलें कीं लोकांच्या हातांतलें पैशाचें उत्पन्न वाढतें. एकंदर मागणी वाढते. आणि मागणी वाढली कीं उत्पादन अधिक वाढतें. अशा प्रकारें बेकारी व आर्थिक विपत्ती नष्ट होतात. पण कधीं कधीं व्याजाचे दर कमी करून देखील योजकांना हुरूप येत नाहीं. मागणी इतकी कमी झालेली असते आणि त्यांच्याकडे इतका तयार माल साठलेला असतो कीं व्याजाचे दर कमी होऊन उत्पादनखर्च घटला तरी त्यांना अधिक उत्पादन करावें असें वाटत नाहीं आणि मग चलनवाढ निष्फळ ठरते.

अशा परिस्थितींत इतर उपाय योजावे लागतात. मागणी वाढेल असें कांहीं तरी करावें लागतें. अशा वेळीं सरकार स्वतः मोठमोठ्या आर्थिक योजना हातीं घेतें. रेल्वे मार्ग व रस्ते बांधले जातात. कालवे खणले जातात. आणि अशा इतर अनेक योजनांवर सरकार खर्च करूं लागतें. ह्या योजना पुऱ्या करण्याकरितां

सरकारला साधनें कामावर घ्यावीं लागतात. अशा रीतीनें बेकारी अंशतः कमी होते. पण सरकारी खर्चाचा बेकारी वर होणारा हा परिणाम कमी महत्वाचा आहे. सरकारनें कामावर घेतलेल्या साधनांच्या मालकांना जें पैशाचें उत्पन्न मिळतें तें बाजारांत खर्च होतें. म्हणजेच एकंदर मागणीत वाढ होते. अशी वाढ झाली कीं योजकांना हुरूप येतो व ते उत्पादन वाढवतात. त्यांना उत्पादन वाढविणें सोईचें जावें म्हणून व्याजाचे दर कमी केलेले असतातच. अशाप्रकारें उत्पादन वाढलें कीं जास्त साधनें कामावर घेतली जाऊन लोकांचें पैशाचें उत्पन्न वाढतें. त्यामुळें एकंदर मागणींत अधिक वाढ होते. आणि पुन: उत्पादन वाढतें. उत्पन्न अशा रीतीनें पुन्हां पुन्हां गुणलें जाऊन (Multiplier effiect) वाढतें. ही वाढ अर्थात् सारखी चालू रहात नाहीं. कांहीं कारणांमुळें ती एका विशिष्ट मर्यादेनंतर थांबते. ती कां थांबते त्याची चर्चा स्थलाभावीं इथें करतां येणार नाहीं. ही वाढ सरकारनें केलेल्या मूळ खर्चाहून किती तरी अधिक अशी वाढ उत्पन्नांत करूं शकतें. ही गोष्ट केन्स् (Keynes) ह्या अर्थशास्त्रज्ञानें ठळकपणें नजरेस आणली. आणि तेव्हांपासून बेकारीच्या काळांत, अशा प्रकारें खर्च करणें हें सरकारचें कर्तव्य समजलें जातें.

स्वतंत्र अर्थव्यवस्थत उत्पन्नाची विषम विभागणी असते हें आपण पाहिलें आहे. ही विषमता कमी व्हावी ह्याकरितां देखील सरकार उपाय योजीत असतें. किमान मजूरी कायद्यानें ठरविल्यामुळें मजूरांच्या उत्पन्नांत वाढ होते व त्याच-प्रमाणांत मालक वर्गाचें उत्पन्न कमी होतें. पण सरकार उत्पन्नांतील विषमता दूर करतें तें बहुधा कर व आपला खर्च ह्यांच्या द्वारां. सरकारी कर बहुधा चढतें (Progressive) असतात म्हणजे असें कीं सरकार सधन माणसांकडून अधिक प्रमाणांत कर घेतें. सरकार ज्याचें उत्पन्न रु. १०० आहे अशा माणसा-कडून जर पांच रुपये करांच्या द्वारें घेत असेल तर रु. २०० उत्पन्न असलेल्या माणसाकडून दहा रुपयांहून अधिक कर तें वसूल करतें. असें केलें म्हणजे त्या दोघांच्या उत्पन्नांतील फरक कमी होतो. अलीकडच्या काळांत हे कर फारच चढत असतात. आपल्या देशांतील नुसता प्राप्तीवरचा करच पाहिला तरी रु. ३६०० पर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कांहींच कर द्यावा लागत

नाहीं. उलट एक लाख रुपयांवरच्या वार्षिक उत्पन्नांतून रुपयामागें चौदा आणे इतका कर द्यावा लागतो प्राप्तीकराशिवायचे इतर कर देखील असेच चढते असतात. उदाहरणार्थ श्रीमंत लोक ज्या वस्तू सर्वसाधारणपणें घेतात त्यांच्या-वर अधिक दरानें कर लादलेला असतो. आणि एखादा कर जरी चढता नसला तरी एकंदर कराचा बोजा प्रमाणांतच लादलेला असतो. अशा प्रकारें उत्पन्नाच्या विभा-गणींतील विषमता कमी करण्याच्या मार्गांत एक अडचण आहे. कर जसे चढते होत जातात, तसतशी अधिक उत्पन्न मिळविण्याची इच्छा कमी तीव्र होत जाते तासभर अधिक काम करून जर मला रुपया मिळणार असेल तर मला काम करण्याला जो उत्साह वाटेल, तो जर त्या रुपयांतून आठ आणे सरकार कराच्या द्वारें काढून घेणार असेल तर मला वाटणार नाहीं. उत्पादन करणें अगर न करणें हें बहुतांशीं सधन वर्गाच्या हातांत असतें. आणि चढत्या दरांमुळें त्या वर्गालाच अधिक उत्पन्न मिळविण्याविषयीं औदासिन्य वाटूं लागलें तर उत्पादन अपरिहार्यपणें कमी होईल आणि मग गरीब वर्गाची काम करायची इच्छा असून देखलि त्याला काम मिळणार नाहीं. अशा रीतीनें उत्पादनावर अनिष्ट परिणाम होईल. चढत्या करांचा जसा उत्पन्न कमाविण्याच्या इच्छेवर परिणाम होतो तसाच बचत करण्याच्या ऐपतीवर व इच्छेवरही परिणाम होतो. बरीचशी बचत श्रीमंत वर्ग करीत असतो. पण त्यांचे उत्पन्न जर करांच्याद्वारें शोषून घेतलें तर त्यांची बचत करायची ऐपत कमी होते व इच्छाही कमी होते. बचतीवर मिळणाऱ्या व्याजांतला जर मोठा हिस्सा कर म्हणून भरावा लागणार असेल तर ती बचत हवी तरी कशाला असें श्रीमंतांना वाटूं लागतें. चढत्या कराचे असे अनिष्ट परिणाम होत असल्या कारणानें, एका विशिष्ट मर्यादेहून ते अधिक चढते करणें शक्य नसतें. म्हणजेच करांच्याद्वारा संपत्तीच्या विभागणींतील विषमता काहीं एका मर्यादेपर्यंतच कमी करतां येते.

करांच्या द्वारें जशी विषमता कमी करतां येते तशी सरकारी खर्चाच्या द्वारें देखील करतां येते. गरिबांना उच्च शिक्षण घेतां येत नाहीं हें विषमतेचें एक महत्वाचें कारण आहे हें आपण वर पाहिलेंच. सरकारनें मोफत शिक्षण दिलें तर गरीबांनाही तें घेतां येतें आणि मग विषमता कमी होते. गरीबांना लागणाऱ्या

सुखसोयी जर सरकारनें पुरवल्या तर त्या प्रमाणांत त्यांचें उत्पन्न वाढतें व विषमता कमी होते. गरीबांकरितां घरें बांधणें, मुलांना शाळेंत फुकट दूध पाजणें वगैरे अनेक प्रकारें गरीबांवर खर्च करून विषमता कमी करतां येते व आजकालची सर्व सरकारें कमी अधिक प्रमाणांत हें करीत असतात.

शांततेच्या काळांत अशा प्रकारें सरकार आर्थिक जीवनांत हस्तक्षेप करीत असतें. पण युद्धकाळांत सरकार फारच अधिक प्रमाणावर आर्थिक जीवनांत हस्तक्षेप करीत असतें. युद्धकाळांत साधनांचा उपयोग युद्धोपयोगी वस्तूंच्या उत्पादनाकरितां जास्तींत जास्त प्रमाणांत व्हावा अशी सरकारी मनीषा असतें. हीं साधनें ह्या कार्याकरितां खेचून घेण्याकरितां सरकारला पैशाची फार मोठ्या प्रमाणावर गरज लागते. ती मिळविण्याकरितां सरकार जबर कर बसवतें, लोकांच्याकडून मोठ्या प्रमाणावर कर्जें काढतें, त्यांना सक्तीनें बचत करायला लावून ती सरकारी कर्जरोख्यांत गुंतवायला भाग पाडतें, परदेशांकडून कर्जें काढतें आणि अखेर नवीन चलन निर्माण करून आपली गरज भागवतें. ह्यापैकी शेवटल्या मार्गाचा फार प्रमाणांत उपयोग केला तर चलनाचा सुकाळ ( Inflation ) होतो. आणि मग आपल्याकडे आज आहे तशी अगर त्याहूनही अधिक महागाई होते. पण नुसता पुष्कळ पैसा उभा करून सरकारचें भागत नाहीं. साधनें सुलभपणें आपल्या हातीं यावीं म्हणून सरकार साधनांच्या कांहीं प्रकारच्या उपयोगावर बंदी घालतें. आणि इतर उपयोगांना उत्तेजन देते. युद्धकाळांत किंमती वाढतात व त्यामुळें सरकारचा खर्चही वाढतो. असें होऊं नये म्हणून सरकार किंमतीवर नियंत्रण घालतें व नियंत्रित किंमतींत आपल्याला अमूक इतका माल पुरवला पाहिजे अशी योजकांवर सक्ती करतें. आपल्याला अवश्य तो माल मिळावा म्हणूनच नव्हे तर ग्राहकांना देखील योग्य किंमतींत माल मिळावा म्हणून सरकार किंमतीवर नियंत्रण घालतें. असें न केलें तर ज्यांची उत्पन्नें वाढूं शकत नाहींत अशा ग्राहकांचे फार हाल होतात. किंमतींवर नियंत्रण घातलें कीं किंमत यंत्राच्या कार्याला मुरड पडते आणि मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ बसत नाहीं. किंमती नियंत्रित झाल्या कीं मागणी पुरवठ्याहून अधिक असते. त्यामुळें दुकानांसमोर मोठमोठ्या रांगा

लागतात; जो तो अनेक प्रकारें माल मिळविण्याची खटपट करतो. आणि काळा बाजार निर्माण होतो तो देखील ह्याच कारणामुळें. ह्या अडचणी दूर व्हाव्या म्हणून किंमत नियंत्रणाच्या जोडीला वांटप पद्धती सुरू करण्यांत येते. मागणीवर मर्यादा घालण्यांत येतात. आणि एकंदर मागणी एकंदर पुरवठ्याहून जास्त असूं नये अशी सोय होते. उपलब्ध असलेला पुरवठा न्याय्य प्रकारें सर्वांत वाटला जावा, म्हणून प्रत्येकाला किती माल द्यावयाचा हें कांहीं तत्वानुसार ठरविण्यांत येतें. उदा. अंगमेहनत करणाऱ्यांना जास्त अन्न मिळावें असें तत्व जर मान्य झालें तर त्यानुसार प्रत्येकाचा अन्नांतील वांटा ठरविण्यांत येतो. किंमत नियंत्रण व वांटप पद्धती ह्यामुळें अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवतात; त्याप्रमाणें युद्धांकरितां अवश्य असलेला पैसा व माल मिळविण्याच्या सरकारी प्रयत्नांमुळें देखील विशेष प्रश्न निर्माण होतात. ह्या सर्व प्रश्नांचा विचार येथें स्थलाभावीं करतां येणें शक्य नाहीं. लक्षांत इतकेंच ठेवायचें कीं युद्धकाळांत सरकार फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक जीवनांत हस्तक्षेप करतें त्यामुळें किंमत यंत्राच्या कार्याला मुरड पडते आणि कांहीं बाबतींत तें बंदही पडतें.

परराष्ट्रीय व्यापार आणि त्यांतून निर्माण होणारी चलनाची देवघेव ह्यांच्यावर सरकारें पहिल्यापासूनच नियंत्रणें घालीत आलेलीं आहेत. जकाती, आयाती निर्याती वरचे निर्बंध व व्यापारी करार ह्यांच्या द्वारा परराष्ट्रीय व्यापाराचें नियंत्रण करण्यांत येतें. अलीकडे चलनांच्या किंमतींच्या प्रमाणांत (exchange ratio) फरक करून व चलनांच्या देवघेवीवर नियंत्रण घालून व्यापारावर नियंत्रण घातलें जातें. परराष्ट्रीय व्यापारामुळें आंतरराष्ट्रीय श्रम विभागणीचा फायदा मिळूं शकतो म्हणून त्यावर नियंत्रण घालणें इष्ट नाहीं हें खरें. परंतु आयात निर्यातीची बरोबरी करण्याच्या, देशी उद्योगधंद्यांची वाढ करण्याच्या, आर्थिक बाबतींत स्वयंसिद्ध होण्याच्या, देवघेव आपल्याला अधिक फायदेशीर करून घेण्याच्या व अशा इतर हेतूंनीं अलीकडे व्यापाराचें फार मोठ्या प्रमाणावर नियंत्रण करण्यांत येतें. हें नियंत्रण कमी व्हावें म्हणून आंतरराष्ट्रीय चलन निधी (International Monetary Fund) वगैरे संस्थांच्याद्वारें, प्रयत्न करण्यांत आले आहेत पण ते तितकेसे यशस्वी झालेले नाहींत.

# नियोजित अर्थव्यवस्था

नियोजित अर्थव्यवस्था ही स्वतंत्र अर्थव्यवस्थेहून मूलतःच निराळी आहे. त्या अर्थव्यवस्थेंत उत्पादनाच्या साधनांची खाजगी मालकी नसते. सारीं साधनें एका मध्यवर्ती सरकारी संघटनेच्या ताब्यांत असतात. ह्या साधनांचा उपयोग काय करावयाचा तें ही संघटनाच ठरवीत असते. ही संघटना आर्थिक नियोजन करीत असल्यामुळें आपण तिला नियोजन समिती म्हणूं या. आर्थिक नियोजन करतांना ह्या समितीचा उद्देश जास्तींत जास्त नफा मिळविण्याचा अर्थातच नसतो. आपल्या कांहीं कल्पनांनुसार राष्ट्राचें आर्थिक दृष्ट्या जास्तींत जास्त हित साधणें हाच तिचा उद्देश असतो. स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत स्पर्धेमुळें योजकांच्या कडून अखेर समाजाचें हितच साधलें जातें हें खरें, पण तें आड वळणानें आणि अभावितपणें. नियोजित अर्थव्यवस्थेंत तें सरळपणें घडतें. स्वतंत्र अर्थ व्यवस्थेंत ग्राहकांना हव्या त्या वस्तूंची निर्मिती करणें योजकांना भाग पडतें. नियोजित अर्थव्यवस्थेंत देखील ग्राहकांना हव्या त्या वस्तू निर्माण करण्याचा नियोजन समितीचा बहुतांशी प्रयत्न असतो. पण त्या वस्तूंचेंच समितीनें उत्पादन करावें असें समितीवर आर्थिक बंधन नसतें. उलट आपण निर्माण केलेल्या वस्तूच ग्राहकांनीं घेतल्या पाहिजेत अशा प्रकारची व्यवस्था करणें नियोजन समितीला शक्य असतें. ह्यामुळें उत्पादक व ग्राहक ह्यांचें नातें नियोजित अर्थव्यवस्थेंत निराळ्या स्वरूपाचें असतें. त्याचप्रमाणें स्वतंत्र अर्थ-व्यवस्थेंत निरनिराळ्या योजकांमध्यें स्पर्धा असते. पण सर्व उत्पादन एकाच

संघटनेच्या ताब्यांत असल्याकारणानें नियोजित अर्थव्यवस्थेंत हा प्रश्न उद्भवतच नाहीं. ह्याचाच अर्थ असा कीं स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत उत्पादनाची व्यवस्था जशी किंमत यंत्राच्या द्वारें होते तशी नियोजित अर्थव्यवस्थेंत होत नाहीं. किंमत यंत्राचें काम तेथें नियोजन समिती करीत असते. ह्याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं नियोजित अर्थव्यवस्थेंत विक्री व खरेदी होतच नाहींत. त्या अर्थव्यवस्थेंत ह्या गोष्टी घडतातच आणि त्याकरितां किंमती व पैसा ह्या गोष्टींची गरजही लागतेच. पण किंमती असल्या म्हणजे किंमत यंत्र असतें असें मात्र नव्हे.

नियोजित अर्थव्यवस्थेचें स्वरूप समजून घेण्याकरितां आपण नियोजन समितीच्या कार्याची माहिती करून घेतली पाहिजे. नियोजन समितीच्या कार्याचे तीन भाग पडतात. पहिल्या प्रथम समितीला देशांतील उत्पादनाचीं साधनें व ग्राहकांच्या गरजा ह्यांबद्दल माहिती गोळा करावी लागते. ही माहिती फार गुंतागुंतीची असते. देशांत असंख्य प्रकारचीं निरनिराळीं साधनें असतात. तीं निरनिराळ्या ठिकाणीं विखुरलेलीं असतात. त्यांतलीं कांहीं साधनें एकोपयोगी असतात तर कांहींचे अनेक उपयोग असू शकतात. शिवाय एक प्रकारचीं सगळीं साधनें देखील सारखींच कार्यक्षम असतात अशांतला भाग नाहीं. ह्या साधनांचा किती प्रमाणांत संयोग करणें शक्य असतें तें देखील ठरलेलें असतें. त्याच प्रमाणें ह्या साधनांचा किती व कसा उपयोग करून घेतां येईल तें तांत्रिक ज्ञानावर अवलंबून असतें. तांत्रिक ज्ञानांत वाढ झाली कीं कांहीं निरुपयोगी गोष्टी उपयुक्त बनतात आणि ह्याच्या उलटही प्रकार होतो. त्याचप्रमाणें साधनांचे निराळ्या प्रकारें उपयोग करणें देखील शक्य होतें. तेव्हां तांत्रिक ज्ञानांत वाढ झाली कीं साधन विषयक माहितींत फेरफार करावा लागतो.

साधनांच्या विषयीं माहिती गोळा करणें जितकें गुंतागुंतीचें असतें तितकेंच ग्राहकांच्या गरजा जाणून घेणेंही असतें. असंख्य वस्तू ग्राहकांना हव्या असतात आणि देशांतील निरनिराळ्या भागांतील लोकांच्या गरजा पुन्हा भिन्न असतातच. गरजा नुसत्या भिन्न असतात इतकेंच नव्हे तर त्यांत सारखे फरक पडत असतात. लोकसंख्येची जशी वाढ होते आणि निरनिराळ्या वयांचे गट,

स्त्री आणि पुरुष, ह्यांच्या परस्पर प्रमाणांत जसा फरक पडतो, त्याप्रमाणें त्यांच्या गरजांत देखील अपरिहार्यपणें फरक पडतो. रहाणीचें मान वाढलें कीं लोक नेहमींच्या वापरांतील गोष्टीचें अधिक प्रमाणांत घेतात असें नव्हे तर नव्या गोष्टी देखील विकत घेऊं लागतात आणि नेहमींच्या वापरांतल्या गोष्टींच्या मागणींत देखील कमी अधिक प्रमाणांत वाढ होते. उत्पन्नाची विभागणी विषम असली कीं कांहीं लोक फार श्रीमंत असतात. आणि त्यांना लागणाऱ्या मोटारी इत्यादी चैनीच्या गोष्टीकरितां मागणी निर्माण होते. पण तीच विभागणी जर सम असली तर अशा चैनीच्या वस्तूंना मागणी नसते. लोकांच्या गरजा ह्या अशा अनेक गोष्टींवर अवलंबून असतात. ह्यापैकीं कांहीं गोष्टींवर नियोजन समितीचें नियंत्रण असतें. उदा. उत्पन्नाची विभागणी. ह्या उलट कांहीं गोष्टींच्या बाबतींत असें नसतें. ह्या सर्व गोष्टींत आपण करणार असलेले आणि आपोआप घडणारे फरक लक्षांत घेऊन त्यानुसार गरजांचा आढावा घेणें मोठें कठीण असतें.

वर निर्देश केलेली माहिती कोणत्या स्वरूपांत गोळा करावयाची आणि कोणत्या परिमाणांनीं ती मोजावयाची हे देखील स्वतंत्र प्रश्न असतात. त्याची येथें विस्तारानें चर्चा करणें जरी शक्य नसलें तरी त्याचा निर्देश करणें अवश्य आहे.

ही सर्व माहिती गोळा केल्यानंतर तिच्या अनुरोधानें योजना आंखावयाची असते. पहिल्यानें ह्या योजनेचा काळ निश्चित करावा लागतो. आर्थिक प्रश्नांच्या स्वरूपांत सारखा फरक पडत असल्याकारणानें फार दीर्घकालीन योजना आंखणें योग्य नसतें. कारण योजना कांहीं अंशीं पुढील परिस्थितीविषयींच्या अंदाजावरच आधारलेली असते. हे अंदाज जर चुकले तर योजना देखील त्याप्रमाणांत अयशस्वी होण्याचा संभव असतो. आणि योजना जितकी दीर्घकालीन तितका हे अंदाज चुकण्याचा संभवदेखील अधिक असतो. असें असल्यामुळें योजनेचा काल जितका कमी असेल तितकें चांगलें असतें. ह्या उलट हें देखील खरें कीं, व्यापक स्वरूपाचे आर्थिक बेत पार पाडायला वेळ लागतो. उत्पादनाला वेळ लागतो हें एक प्राथमिक तांत्रिक सत्य आहे. तेव्हां

आर्थिक क्षेत्रांत कांहीं व्यापक व भरीव कामगिरी करावयाची असेल तर त्याला वेळ लागतो. म्हणून योजनेचा काळ सामान्यतः कांहीं एका मर्यादेहून कमी असणें इष्ट नसतें. आर्थिक नियोजन करणाऱ्या देशांच्या अनुभवावरून असें दिसून येतें कीं चार ते पांच वर्षांचा काल हा दोन्ही दृष्टीनीं सोईचा ठरतो.

देशाचा विस्तार जर फार मोठा असेल तर सर्व देशाकरितां एक योजना करणें व एका मध्यवर्ती समितीनें देशांतील आर्थिक जीवनाचें नियंत्रण करणें हें त्रासदायक ठरतें. त्यामुळें कार्यक्षमतेला बाध येतो. अशावेळीं देशाचे निरनिराळे भाग पाडण्यांत येतात. हे भाग अर्थातच मूलतः आर्थिक दृष्टीनें पाडतां येतात. पण नियोजन ही एक सामाजिक बाब असल्याकारणानें इतर गोष्टी देखील विचारांत घ्याव्या लागतात. आणि ह्या प्रत्येक भागाकरितां निराळें नियोजन करण्यांत येतें. ह्याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं मध्यवर्ती नियोजन समितीकडे कांहींच काम रहात नाहीं. कारण कांहीं मूलभूत आर्थिक निर्णय ही नियोजन समिती घेत असते आणि निरनिराळ्या विभागांतील नियोजन हें त्या निर्णयानुसार व्हावें लागतें. असें न केलें तर देशाच्या आर्थिक जीवनांतील एकसूत्रीपणा नष्ट होईल. शिवाय हे निरनिराळे विभाग कांहीं आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण नसतात आणि त्यांना तसें करतां येणें शक्य असलें तरी श्रमविभागणीचा फायदा घ्यायचा असेल तर इष्ट नसतें. तेव्हां ह्या निरनिराळ्या विभागांचे आर्थिक संबंध कशा प्रकारचे असावे तें ठरविण्याचें महत्त्वाचें काम देखील मध्यवर्ती नियोजनसमितीला हातीं घ्यावें लागतें. शिवाय कांहीं आर्थिक प्रश्न असे असतात कीं ते कुठच्याहि एका विभागाचे नसून सर्व विभागाचें असतात अगर निदान एकाहून अधिक विभागाचे असतात. असे प्रश्न अर्थातच मध्यवर्ती नियोजन समितीच समाधानकारकपणें सोडवूं शकते.

नियोजन समितीला आणखी एक मूलभूत निर्णय घ्यायचा असतो तो भांडवलाच्या वाढीविषयीं असतो. भांडवलाची वाढ किती वेगानें व्हावी हें प्रथम ठरवावें लागतें. आर्थिक नियोजनाचा हा निर्णय म्हणजे जणु आंसच असतो. हा निर्णय घेतल्याशिवाय इतर कोठलेच निर्णय घेतां येत नाहींत. कुठच्या वस्तूंचें उत्पादन करायचें, लोकांचें राहणीमान किती ठेवायचें, उत्पन्नांची विभागणी

कशी करायची ह्या सर्व गोष्टी ह्या मूलभूत निर्णयावर अवलंबून असतात. स्वतंत्र अर्थरचनेंत हा निर्णय प्रत्येक माणूस वा पेढी स्वतंत्रपणें घेत असते आणि तो प्रत्येकाच्या खाजगी गरजांच्या अनुरोधानें घेतला जातो. शिवाय बचत करण्याचा निर्णय आणि भांडवल निर्माण करण्याचा निर्णय हे दोन्ही भिन्न रहातात आणि पुष्कळदां त्या दोघांचा मेळ न बसल्याकारणानें घोटाळे माजतात. नियोजित अर्थरचनेंत मात्र हा निर्णय एकंदर देशाच्या हिताच्या दृष्टीनें घेतला जातो. शिवाय बचत करायचा निर्णय व भांडवल निर्माण करण्याचा निर्णय हे वेगवेगळे असत नाहींत. त्यामुळें घोटाळे माजण्याचें टळतें. मात्र भांडवल निर्माण करण्याचा निर्णय लोक घेत नसल्यामुळें तो लोकांच्या इच्छेच्या विरुद्ध असण्याचा पुष्कळसा संभव असतो. जितकें भांडवल जास्त निर्माण करावें तितकें नित्योपयोगी वस्तूंचें उत्पादन कमी प्रमाणांत होतें आणि त्यामुळें लोकांचें राहणीचें मान खालीं घसरतें निदान त्यांत वाढ होत नाहीं. अर्थात हा भांडवलवाढीचा तात्कालिक परिणाम असतो. भांडवल वाढलें म्हणजे मग एकंदर उत्पादन व राहणीचें मानही वाढतेंच. कांहीं लोकांचें मत असें कीं स्वतंत्र अर्थरचनेंत भांडवलाची वाढ कमी प्रमाणांत होते. कारण ती खाजगी निर्णयांनीं ठरत असते. आणि खाजगी रीत्या माणूस भविष्यकाळांत फारसा दूर व्यापकपणें पहात नाहीं. फार तर आपल्या आयुष्याच्या व गरजांच्या दृष्टीनें तो पहातो. त्यामुळें तो भविष्यकाळाला कमी महत्त्व देतो व म्हणून भांडवलाची वाढ कमी होते. शिवाय केलेली बचत भांडवलाच्या वाढीच्या कारणीं लागतेच असेंही नाहीं. उलट नियोजित अर्थरचनेंत सबंध समाजाच्या दृष्टीनें विचार केला जातो. त्यामुळें भविष्यकाळाला वाजवी महत्त्व दिलें जावें ( माणूस मर्त्य आहे, समाज अमर आहे ) म्हणून भांडवलाची वाढ मोठ्या प्रमाणावर होते. पण ह्यावर कोणी असेंही म्हणतात कीं नियोजित अर्थरचनेंत कामगारांच्या हातीं सत्ता असते. त्यांचें रहाणीचें मान फार खालचें असतें. त्यांत वाढ व्हावी म्हणून ते उत्सुक असतात व नियोजित अर्थरचनेंत ही उत्सुकता अधिकच वाढते म्हणून ते भांडवलाची वाढ होऊं द्यायला नाकबूल असतात. आतांच अधिक नित्योपयोगी वस्तू हव्यात असें त्यांना वाटणें शक्य असतें. ह्यावर कोणी म्हणतील

कीं रशियांत भांडवलाची दर वाढ मोठ्या प्रमाणांत होत आहे. त्यावर उत्तर असें कीं रशियांत हुकूमशाही आहे व मजूरांच्या इच्छा योग्य प्रकारें व्यक्त होत नाहींत. एकंदरींत भांडवलाची वाढ हा असा मतभेदाचा मुद्दा आहे.

भांडवलाविषयींचा निर्णय घेतल्यानंतर त्याच्या अनुषंगानें इतर निर्णय घ्यायचे असतात. औद्योगिक उत्पादन व शेतीचें उत्पादन ह्यांत साधनांची विभागणी कशी करायची हा देखील एक स्वतंत्र व महत्वाचा निर्णय आहे. रशियांत हा निर्णय घेण्याच्या बाबतींत आलेल्या अडचणींचा व झालेल्या वाद-विवादांचा अभ्यास करणें मनोरंजक आहे. ह्या व इतर दृष्टीनें देखील Maurice Dobb यांचें Soviet Economic Development after 1917 हें पुस्तक जरूर अभ्यासावें. निरनिराळ्या उद्योगधंद्यांत साधनांची कशी विभागणी करावी ह्या बाबत असे इतर अनेक लहानमोठे निर्णय घ्यावे लागतात. ह्या सर्व निर्णयानुसार उत्पादनाचीं लक्ष्यें (targets) ठरवावीं लागतात. आणि ह्या लक्ष्यांपासून योजना तयार होते. अर्थात योजना म्हणजे नुसतीं लक्ष्यें नव्हेत. त्या लक्ष्यांकडे कसें पोहोंचायचें हा देखील योजनेचाच भाग असतो. सर्व साधारणपणें योजनेच्या मागें ग्राहकांच्या गरजा पुरविण्याचा हेतू असतो. पण कांहीं गरजा पुरवायच्या नाहींत आणि कांहीं कमी प्रमाणांत पुरवायच्या असें नियोजन समिती ठरवूं शकते. त्याचप्रमाणें एकंदर गरजा किती प्रमाणांत पुरवायच्या हें ग्राहकांच्या मर्जीवर नसून नियोजन समितीच्या निर्णयावर अवलंबून असतें. समाजांतल्या निरनिराळ्या वर्गाच्या गरजा किती प्रमाणांत पुरवायच्या ह्या बाबत देखील नियोजन करतांना निर्णय घेतला जातो. प्रत्येक वस्तूच्या अनेक परी (varieties) असतात. स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत स्पर्धेमुळें जास्त परी काढण्याकडे प्रवृत्ती असते. पण जितक्या परी कमी तितका उत्पादन खर्च कमी असें असल्यामुळें नियोजित अर्थव्यवस्थेंत मर्यादित प्रमाणांत वस्तूंच्या परी काढण्याकडे कल असतो.

नियोजन समिती अनेक प्रकारें निर्णय घेऊं शकते. आणि त्यानुसार अनेक प्रकारच्या आर्थिक योजना तयार होऊं शकतात. पण कुठच्याही आर्थिक योजनेंत एक गुणविशेष मात्र हटकून असावा लागतो. तो म्हणजे अंतर्गत

सुसंगती. ती नसेल तर आर्थिक योजना यशस्वी होऊं शकणारच नाहीं. जर योजनेंत कापडाचें उत्पादन वाढवायचें असा निर्णय असेल तर त्याला जोडून कापसाचें देखील अधिक उत्पादन करण्याचा अगर आयात करण्याचा निर्णय हा तिचा भाग असलाच पाहिजे. पोलादाचें उत्पादन एके ठिकाणीं करायचें आणि मग तें देशभर पुरवायचें अशी योजना असेल तर त्याच्या जोडीला वाहतुकीच्या साधनांची अवश्य ती वाढ करण्याची देखील योजना पाहिजे. नाहींतर पोलादाचें उत्पादन वाढेल पण तें अवश्य तेथें पुरवणें मात्र शक्य होणार नाहीं.

संपत्तीचें उत्पादन व विभागणी ह्याबद्दलच्या योजना देखील सुसंगत असल्या पाहिजेत. संपत्तीची विभागणी जर विषम असेल तर चैनीच्या वस्तूंचें उत्पादन केलें पाहिजे. तसें नसेल तर ज्यांना जास्त उत्पन्न मिळेल त्यांना त्याचा योग्य असा उपयोग करतां येणार नाहीं. व तें असून नसून सारखेंच होईल. नियोजित अर्थव्यवस्थेंत संपत्तीची विभागणी ही अधिक सम असते—निदान असावी. अशा प्रकारची अर्थव्यवस्था निर्माण करण्यामागें मुख्यतः हा हेतू असतो. जगांतल्या कामगारांनीं एकत्र येऊन समाजवाद स्थापन करावा असें जें मार्क्सनें म्हटलें, त्यामागें संपत्तीच्या विभागणींतील विषमता नष्ट करणें हा प्रधान हेतू होता. साधनांची खाजगी आणि वंशपरंपरा मालकी हें विषमतेचें मुख्य कारण. पण नियोजित अर्थव्यवस्थेंत साधनेंच मुळीं सार्वजनिक मालकीचीं असतात. शिवाय ह्या अर्थव्यवस्थेंत शिक्षणाची फुकट सोय बहुधा केली जाते. अर्थात ज्याची इच्छा असेल त्या प्रत्येकाला कांहीं उच्च शिक्षण मिळणें शक्य नाहीं. निदान जगांतील आजचें रहाणीचें मान लक्षांत घेतां तें शक्य दिसत नाहीं. तरी पण एकंदरींत नियोजित अर्थव्यवस्थेंत शिक्षणाचा प्रसार जास्त असण्याची शक्यता अधिक आहे. ह्यामुळें देखील विषमता कमीच होणार. कुठच्याही व्यवसायांत पडण्यावर अकारण बंधनें घालण्याची प्रवृत्ती देखील त्या अर्थव्यवस्थेंत असणार नाहीं. शिवाय तज्ञ माणसांना जास्त पगार देऊन आपल्याकडे ओढण्याची स्पर्धा देखील तेथें असणार नाहीं. किती कामगारांनीं कुठच्या कारखान्यांत काम करायचें तें नियोजन समिती ठरवील.

आणि त्याप्रमाणें कामगारांना काम करावें लागेल. त्याकरितां जास्त पगाराच्या लालुचीचा उपयोग करावा लागणार नाहीं. ह्यामुळें निरनिराळ्या माणसांच्या पगारांत फार मोठाले फरक असण्याचें कारण रहाणार नाहीं. पण असें जरी असलें तरी नियोजित अर्थव्यवस्थेंत एकदम पूर्णपणें आर्थिक समता प्रस्थापित होणार नाहीं. जास्त मेहनतीच्या व जास्त कौशल्याच्या कामांना जास्त पगार देणें अवश्य ठरतें. पुष्कळदां तें कौशल्यपूर्ण काम नीट होण्याच्या दृष्टीनें आवश्यक असतें आणि नियोजित अर्थरचनेंत देखील मनुष्यस्वभाव कांहीं बदलत नाहीं आणि म्हणून जास्त काम अगर जास्त कौशल्याचें काम असलें म्हणजे जास्त पगार द्यावा लागतो. आज रशियांत देखील संपत्तीची पूर्णपणें समविभागणी नाहीं. रशियन सैनिकाचा व सेनापतीचा पगार ह्यांत पुष्कळच अंतर असतें. नियोजित अर्थव्यवस्थेंत देखील ज्यांचा पगार जास्त असेल त्यांच्यावर कर लादून, अगर ते ज्या वस्तू विकत घेतात त्यांच्या किंमती फार जास्त ठेवून आणि अशा इतर मार्गांनीं ही विषमता कमी करतां येते. मात्र प्रत्येकाकडून कुवतीप्रमाणें व प्रत्येकाच्या गरजेप्रमाणें ह्या ध्येयापासून आपण सगळेच अजून फार दूर आहोंत.

नियोजित अर्थव्यवस्थेंत पैशाला कांहीं स्थान नसणारच; पैशाशिवायही अर्थव्यवस्था चालू शकेल असें कांहीं समाजवादी लोकांना पूर्वी वाटलें होतें. पण अनुभवांतीं ती कल्पना चुकीची आहे असें आढळून आलें आहे. पैसा हें एक साधन आहे. आणि स्वतंत्र अर्थव्यवस्थेंतच तें उपयोगांत आणतां येतें असें नव्हे तर नियोजित अर्थव्यवस्थेंत देखील त्याचा उपयोग करून घेतां येतो. पैसा आणि भांडवलशाही ह्यांचा कांहीं खास व अविभाज्य संबंध आहे, ही कल्पना चुकीची आहे. कुठल्याहि विकसित अर्थव्यवस्थेंत पैसा हा असलाच पाहिजे. नियोजन समितीला व ग्राहकांनादेखील पैशाचा उपयोग मूल्य मोजण्याकरितां करणें अतिशय सोईचें पडतें. पैसा असला कीं तो कुठचीहि गोष्ट विकत घेण्यास उपयोगी पडतो. त्यामुळें ग्राहकाला वस्तू विकत घेण्याच्या बाबतींत पुष्कळसें स्वातंत्र्य मिळतें. त्याचप्रमाणे योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या घटकांना जर कांहीं ठराविक कर्जे अगर रकमा दिल्या तर त्यांचें काम फारच

सोपें होतें. रशियांत उत्पादनाच्या योजनेवर आधारलेली एक पैशाची योजना असते. उत्पादनाच्या लक्ष्यांनुसार कारखान्यांना वगैरे कांहीं रकमा कर्जाऊ दिल्या जातात. त्यांचा उपयोग करून कारखान्यांना साधनें मिळवावीं लागतात. ह्यामुळें कारखान्यांच्या उत्पादनावर अगदीं सोप्या मार्गानें म्हणजे कर्ज कमी जास्त करून नियंत्रण ठेवतां येतें व कारखान्याच्या चालकांना देखील उत्पादनाच्या बाबतींत पुष्कळसें स्वातंत्र्य मिळूं शकतें.

नियोजित अर्थव्यवस्थेंत जसा पैशाचा उपयोग होत असतो त्याचप्रमाणें किंमतींचा देखील उपयोग करण्यांत येतो. आर्थिक योजनेप्रमाणें देशांत निरनिराळ्या वस्तूंचें विशिष्ट प्रमाणांत उत्पादन होत असतें. हें एकंदर उत्पादन व एकंदर मागणी ह्यांची सांगड जमावी लागते. ह्याचाच अर्थ असा कीं एकंदर खर्च होणारें पैशाच्या स्वरूपांतलें उत्पन्न व एकंदर नित्योपयोगी वस्तूंचें मूल्य ह्यांची बरोबरी व्हावी लागते. हें किंमती वर खालीं करूनच केलें जातें. देशांतील नित्योपयोगी वस्तूंचें उत्पादन जर १०० असेल व त्यावर रु. ५०० जर खर्च केले जात असतील तर दर वस्तूची किंमत रु. ५ ठेऊन मागणी व पुरवठा ह्यांची बरोबरी करतां येईल. हीच किंमत जर रु. ३ असेल तर पुरवठा अपुरा पडेल व मागणी भागविली जाणार नाहीं. ह्या उलट जर किंमत रु. ६ असेल तर मागणी तोकडी पडेल व माल शिल्लक राहील. किंमतींच्या द्वारें जशी एकंदर मागणी व एकंदर पुरवठा ह्यांची बरोबर करावी लागते. त्याप्रमाणें प्रत्येक वस्तूची मागणी व पुरवठा ह्यांचीही बरोबरी करावी लागते. ह्याकरितां निरनिराळ्या किंमतींचे परस्पर संबंध कांहीं विशिष्ट प्रकारचे असावे लागतात. मागणी आणि पुरवठा ह्यांची बरोबरी वाटप पद्धतीनें देखील करतां येते. पण किंमतींच्या द्वारा ती करणें हें अधिक सोईस्कर असतें. कारण त्यामुळें एकंदर मागणी किती असावी हें ठरलें जात असलें तरी प्रत्येक ग्राहकानें किती खरेदी करावी हें ठरलें जात नाहीं. त्यामुळे प्रत्येक ग्राहकाला आपल्या खुशीप्रमाणें कमी अधिक खरेदी करण्याची मुभा मिळते. मात्र वस्तू आवश्यक असली आणि तिचा पुरवठा अपुरा असला तर मात्र वांटप पद्धती ही प्रत्येक ग्राहकाला न्याय्य वांटा मिळण्याच्या दृष्टीनें सोईची

असते. स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत स्पर्धेमुळें व नफ्याच्या इच्छेमुळें किंमती आपोआप वर खालीं होत असतात व त्यामुळें मागणी व पुरवठा ह्यांची बरोबरी होत असते. नियोजित अर्थव्यवस्थेंत स्पर्धा नसते व फायदा मिळविण्याचा. हेतू ी नसतो. तेथें किंमती नियोजन समितीनें ठरविलेल्या असतात आणि त्यांत वध-घट करणें हें समितीच्याच हातांत असतें. त्यामुळें नियोजन समितीलाच अगर तिच्यातर्फे इतर कोणाला बदलत्या परीस्थितीप्रमाणें किंमतींत फेरफार करून मागणी व पुरवठा ह्याची बरोबरी करावी लागते.

नियोजित अर्थव्यवस्थेंत किंमतीचा असा उपयोग केला जातो ह्याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं तेथें किंमत यंत्रहि असतें. किंमती असणें आणि किंमतयंत्र असणें ह्यांत फार भेद आहे. किंमत यंत्राच्या द्वारें साधनांचा उपयोग कसा व्हायचा तें ठरलें जातें. ग्राहकांच्या गरजा जास्तींत जास्त समाधानकारकपणें पुरवल्या जाव्या अशा प्रकारें तें निरनिराळ्या उद्योगधंद्यांत साधनांची विभाग ी करीत असतें. किंमतयंत्राच्या द्वारें उत्पादन खर्च व किंमती ह्यांची बरोबरी होते— निदान होऊं पहाते. पण नियोजित अर्थव्यवस्थेंतील किंमती अशा प्रकारें कार्य करीत नाहींत. त्या मागणी व पुरवठा ह्यांची बरोबरी करतात खरी पण ती उत्पादन कमी जास्त करून नव्हे. उत्पादन कसलें व किती व्हायचें हें योजने-नुसार ठरलेलें असतें. किंमतींच्या द्वारें फेरफार होतो तो मागणींत. म्हणजे एक प्रकारे नियोजित अर्थव्यवस्थेंतील किंमतींचें काम स्वतंत्र अर्थव्यवस्थेंतील त्यांच्या कार्याच्या विरुद्ध स्वरूपाचें असतें. स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत एकंदर कल मागणी नुसार पुरवठ्यांत फरक होण्याकडे अधिक असतो नियोजित अर्थव्यवस्थेंत मागणींत अवश्य तो फेरफार घडवून आणायचा असतो. नियोजित अर्थव्यवस्थेंत देखील साधनांच्या किंमतींचा त्यांची निरनिराळ्या क्षेत्रांत विभागणी करण्या-करितां उपयोग केला जातो. पण ह्या किंमतीच मुळीं योजनेच्या पायावर आधारलेल्या असतात. तेव्हां योजनेप्रमाणें उत्पादनाचें कार्य चालावें असाच त्यांचा परिणाम होतो. स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत साधनांच्या किंमतीमुळें निरनिराळ्या योजकांच्या योजनांचें स्वरूप ठरलें जातें. त्याचप्रमाणें उत्पादन खर्च व तयार मालाच्या किंमती ह्यांचा जो संबंध स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत असतो, तसा नियोजित

अर्थव्यवस्थेंत नसतो. किंमतीहून उत्पादनखर्च कमी आहे म्हणून उत्पादन वाढत नाहीं अगर किंमतीहून तो जास्त आहे म्हणून तें कमी होत नाहीं. उत्पादनखर्च व तयार मालाच्या किंमती हीं येथें निरनिराळ्या तत्वांनुसार ठरत असतात. उत्पादन खर्च योजनेवर आधारलेला असतो आणि तयार मालाच्या किंमती मागणीवर अवलंबून असतात. त्यामुळें ह्या दोहोंची बरोबरी व्हावी अशी काहीं खास जरुरी नसते व त्या दोहोंच्या संबंधावरून उत्पादनांत फेरफारही होत नसतात.

नियोजित अर्थरचनेंत किंमत यंत्राचा उपयोग केला जात नाहीं हा कांहीं अर्थशास्त्रज्ञांना तरी दोष वाटतो. त्यांना असें वाटतें कीं साधनांचा योग्य व कार्यक्षम उपयोग किंमतयंत्र नसेल तर होऊंच शकणार नाहीं. आर्थिक परिस्थिती सारखी बदलत असते व त्या बदलण्यानुरूप उत्पादनांत देखील सारखे बदल व्हावे लागतात. एका योजनेनुसार जर उत्पादन केलें तर हे फेरबदल होऊं शकणार नाहींत. आणि-झाले तरी अवश्य तितक्या लवकर व योग्य प्रकारें होणार नाहींत. शिवाय योजनेवरच जर किंमती आधारल्या असल्या तर योजनेतील चुका त्या दाखवूं शकणार नाहींत. योजना बरोबर आहे हें मुळीं त्या किंमतींच्या मागचें गृहिततत्व! त्यामुळें योजनेबरहुकूम काम चाललेलें आहे कीं नाहीं एवढेंच त्या किंमतींच्या द्वारा समजूं शकेल. पण येथें देखील हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं किंमती व उत्पादनखर्च ह्यांचा स्वतंत्र अर्थव्यवस्थेंतील निश्चित संबंध एकदां नष्ट झाला म्हणजे उत्पादनाची कार्यक्षमता देखील नीटपणें मोजतां येणार नाहीं. अशा रीतीनें किंमत यंत्र नसल्यामुळें नियोजित अर्थरचनेंत साधनांचा योग्य व कार्यक्षम उपयोग करणें अशक्य होईल. शिवाय किंमत—यंत्र ज्या अनेक व गुंतागुंतीच्या गोष्टी आपोआप करीत असतें, त्या एका नियोजन समितीनें व्यवस्थित करणें अशक्य आहे असें देखील त्या अर्थशास्त्रज्ञांना वाटतें

नियोजित अर्थव्यवस्थेचे पक्षपाती असलेल्या अर्थशास्त्रज्ञांना अर्थात् ही भूमिका पटत नाहीं. त्यांना असें वाटतें कीं किंमतयंत्राची जी स्तुति इतर अर्थशास्त्रज्ञ करतात ती योग्य नाहीं. किंमतयंत्रांत अनेक दोष आहेत. मक्तेदाऱ्या,

समाजाचें हित व योजकांचें हित ह्यामध्यें पुष्कळदां असलेला विरोध, संपत्तीची विषम विभागणी, अर्थचक्र वगैरे गोष्टी किंमतयंत्रांतूनच निर्माण होतात. त्यांत एक प्रकारची अमानुषता आहे. तें मागणी पुरवतें, गरजा नव्हे. अशा किंमत-यंत्रावर अवलंबून रहाणें त्यांना अयोग्य वाटतें. त्यापेक्षां नियोजन अनेक पटीनें बरें. त्यांत वर निर्देश केलेले दोष नसतात. ह्यांत मागणीनुसार पुरवठा ठरत नाहीं असें म्हणणें चुकीचें आहे. तें किंमतीच्या द्वारें होत नाहीं इतकेंच. नियोजन समिती ग्राहकांच्या गरजा लक्षांत घेऊनच आपली योजना आंखीत असते. आणि बदलत्या परिस्थितीनुसार तींत फेरबदल करतां येण्याइतकी ती योजना लवचिक असते.

कांहीं समाजवादी अर्थशास्त्रज्ञांना मात्र हें समर्थन पुरेसें वाटत नाहीं. किंमत यंत्र ज्याप्रकारें स्वतंत्र अर्थ रचनेंत कार्य करतें त्यांतले दोष त्यांना अर्थातच मान्य आहेत. तरी पण ग्राहकांच्या गरजा यथायोग्य प्रकारें पुरविणें व साधनांचा कार्यक्षम उपयोग करून घेणें ह्या दृष्टीनें त्यांना किंमत यंत्राचें महत्व वाटतें म्हणून त्यांनीं नियोजित अर्थव्यवस्थेविषयीं एक निराळीच कल्पना पुढें मांडली आहे. त्यांचें म्हणणें असें कीं नियोजित अर्थव्यवस्थेंत साधनें सार्वजनिक मालकीचीं असावीं व उत्पादनावर एका मध्यवर्ती नियोजन समितीचें स्थूल स्वरूपाचें नियंत्रण असावें. पण ह्या नियोजन समितीनें मात्र एक विशिष्ट योजना तयार करून तिची अंमलबजावणी करूं नये. उलट तिनें किंमत यंत्राचा उपयोग चालू ठेवावा. आणि त्यांत जेथें दोष असतील अगर अपुरेपणा असेल तेथें हस्तक्षेप करून उत्पादनांतील कार्यक्षमता व त्याची उपयुक्तता वाढवावी. हें कसें करायचें व कितपत शक्य आहे ह्याबद्दल बरीच चर्चा करतां येण्याजोगी आहे व तेथें मतभेदाला देखील जागा आहे. पण स्थलाभावी तें येथें करणें शक्य नाहीं. पण अर्थिक नियोजनाविषयींची ही मूलतः निराळी अशी कल्पना आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे येथें भागण्यासारखें आहे.

नियोजित अर्थव्यवस्थेविषयीं एक महत्वाची अडचण निर्माण होते. कांहींचें म्हणणें असें कीं तिच्यांत उत्पादन करण्याकरितां अवश्य तेवढें आमीष नसत. ह्या उलट स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत हें आमीष भरपूर प्रमाणांत असतें. असें

असल्यामुळें नियोजित अर्थव्यवस्थेत उत्पादनाचें कार्य तितक्या कार्यक्षमतेनें होणार नाहीं असा ते निष्कर्ष काढतात. ह्या आमीषाच्या प्रश्नाचा विचार करतांना उत्पादन करणाऱ्या माणसांचे दोन वर्ग पाडले पाहिजेत. एक वर्ग कामगारांचा व दुसरा योजकांचा. जास्ती काम केलें अगर अधिक कौशल्यानें काम केलें म्हणजे अधिक मजूरी मिळेल आणि आळशीपणा केला तर नोकरी जाईल असें दुहेरी आमीष स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत कामगारांना असतें. नियोजित अर्थव्यवस्थेंत देखील हेंच आमीष असायला कांहीं हरकत असूं नये. मात्र नियोजित अर्थव्यवस्थेत कुशल व अकुशल कामगार ह्यांच्या वेतनांत तितका मोठा फरक असणार नाहीं. कारण त्या अर्थवस्थेंत शिक्षण सर्वांनाच व बहुधा मोफत मिळूं शकेल. पण ह्या कारणामुळें काम करायची व अधिक उत्पन्न मिळविण्याची इच्छा कां कमी व्हावी तें कळत नाहीं. कोणाचीही अधिक उत्पन्न मिळण्याची इच्छा त्याच्या स्वतःच्या गरजांवर अधिक अवलंबून असते. दुसऱ्यांना किती उत्पन्न मिळतें ह्यावर ती फारशी अवलंबून नसतें. एकंदरीत कमी प्रमाणांत कां होईना पण अधिक पगाराचें आमीष नियोजित अर्थव्यवस्थेंत देखील असूं शकेल. नोकरी जाण्याची भीती देखील नियंत्रित अर्थव्यवस्थेंत कमी असेल. प्रत्येकाला काम मिळावें अशीच मुळीं त्या अर्थव्यवस्थेमागची भूमिका असते. आणि कामगारांचें राज्य निर्माण करण्याचा हेतू ती अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा असतो. त्यामुळें अर्थातच स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत जितक्या सहजासहजीं कामगारांची नोकरी जाते तशी त्या अर्थव्यवस्थेंत जाणार नाहीं. पण ती जाण्याची भीति अजिबात असणार नाही असें मात्र नव्हे. स्वतंत्र अर्थव्यवस्थेच्या मानानें हें आमीष देखील जरा कमीच ठरेल. पण इथें ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं भीतीपेक्षां आशेनेंच आणि धमकीपेक्षां उत्तेजनानेंच माणसें अधिक चांगल्या प्रकारें काम करतात. आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी कीं स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत कामगाराला मालकाविषयीं वैरभाव वाटत असतो. आपण जास्त काम केलें तर मालकाचा त्यापासून फायदा होईल असें वाटल्यामुळें तो अधिक काम करायला बहुधा तयार नसतो. पण नियोजित अर्थव्यवस्थेंत मात्र असें होणार नाहीं. तेथें मजुरानें जास्त काम केलें तर सग-

ल्याचच हित होईल आणि म्हणून तो काम करायला अधिक उत्सुक असेल. म्हणजे एकंदरींत पाहूं जातां कामगाराला नियोजित अर्थव्यवस्थेंत आमीष कमी असेल असें म्हणतां येणार नाहीं. उत्पादन करणारा दुसरा वर्ग योजकांचा. स्वतंत्र अर्थव्यवस्थेंत त्यांना नफा मिळविण्याचें आमीष असतें आणि तोटा होण्याची भीति पण असते. नियोजित अर्थव्यवस्थेंत हा नफ्यातोट्याचा प्रश्न येत नाहीं. आणि योजकाऐवजी जेथें कारखान्याचें चालक असतात, त्यांना देखील अधिक पगाराचें आमीष अगर नोकरी जाण्याची भीति असतेच. सोव्हिएट रशियासारख्या देशांत तर चालकांचें काम नीट केलें नाहीं तर नोकरीच नव्हे पण जीव जाण्याची देखील धास्ती असते. पण ही गोष्ट अलाहिदा म्हणून सोडून दिली तर नफ्याच्या आमीषाइतकें मोठें आमीष नियोजित अर्थरचनेंत असूं शकत नाहीं हें कबूल केलें पाहिजे. पण कोणालाच जर नफा मिळत नसेल तर जास्त पगार मिळविण्याच्या हेतूनें चालक जरूर कसोशीनें काम करतील आणि आपण समाजाचें हित केलें हा जो कामापासून आनंद मिळतो तो नियोजित अर्थव्यवस्थेंत खात्रीनें अधिक असेल. आणि त्यामुळें काम करायला एक वेगळाच हुरूप येत असेल.

नियोजित अर्थव्यवस्थेबद्दल आणखी एक शंका घेण्यांत येते तिचा विचार करून मी हें प्रकरण संपवितों. नियोजित अर्थव्यवस्थेंत उत्पादनाचें सर्व कार्य एका मोठ्या कारभाराच्या यंत्रातर्फे करण्यांत येईल. अशा मोठ्या कारभाराच्या यंत्राच्या हातीं कुठचेंही काम दिलें तर तें दिरंगाईनें व मेंगळटपणानें होण्याचा संभव असतो. ह्याला दोन कारणें देतां येतील. एक असें कीं सरकारी कारभाराच्या यंत्रांत काम करणाऱ्या माणसांची एक चमत्कारिक मनोवृत्ती बनते. त्यांना नियम फार महत्वाचे वाटूं लागतात. नवीन कांहीं करण्यापेक्षां, चुका न करणें हेंच त्यांना अधिक महत्वाचे वाटतें. त्यांची दृष्टी संकुचित होते व कामापेक्षां कामाच्या पद्धतीचें त्यांना जास्त महत्व वाटतें. त्यांची वृत्ती संशयी, संकुचित होते. प्रश्नांचें खरें स्वरूप समजून घेण्याची त्यांची कुवत कमी होते. अशा माणसांच्या हातांत जर उत्पादन करण्याचें महत्वाचें काम दिलें तर फार घोटाळे होतील यांत शंका नाहीं. पण कांहींना असे वाटतें कीं सरकारी

नोकरांचें हे स्वभाव धर्म ज्याप्रकारें त्यांची निवड होते व ज्या प्रकारचें त्यांना काम करायचें असतें त्यामुळें निर्माण होतात. ह्या बाबतींत जर फेरबदल केला तर त्यांचें हे दोष नष्ट होतील व त्यांची कार्यक्षमता वाढेल.

पण सरकारी नोकरांच्या कार्यक्षमतेंत जरी सुधारणा झाली तरी मोठ्या प्रमाणावर संघटना करण्याची आणि कारभार करायचा म्हणजे अपरिहार्यपणें गुंतागुंतीची कार्यपद्धती अस्तित्वांत येते व कामांत फार दिरंगाई होऊं लागते. नियोजित अर्थव्यवस्थेंत नुसतें कोळशाचें उत्पादन वाढवायचें म्हटलें तरी त्याचा अनेक बाजूंनीं विचार करावा लागतो. अनेक खात्यापुढें तो प्रश्न विचारासाठीं ठेवावा लागतो. कारण कोळशाच्या उत्पादनाच्या वाढीचा कामगार, आरोग्य, वहातूक, यंत्रसामुग्रीचें स्वरूप, पैशाचें चलन वगैरे अनेक गोष्टींवर परिणाम होत असतो. ते सर्व परिणाम विचारांत घ्यायचे म्हणजे गुंतागुंत व दिरंगाई आलीच. ह्यामुळें फार गंभीर अडचणी निर्माण होणें शक्य असतें. ह्यावर दोन इलाज सुचविले जातात. एक म्हणजे विकेंद्रीकरणाचा. सारी सत्ता एकत्रित न करतां अनेक ठिकाणीं विखुरलेली असली तर प्रत्येक बाबतींत मध्यवर्ती संघटनेच्या अधिकाऱ्यांकडे धांव घ्यावी लागत नाहीं व त्यामुळें वेळ वांचतो. कांहींचें म्हणणें असें कीं, नियोजित अर्थव्यवस्थेंतदेखील आपोआप चालणाऱ्या किंमतयंत्राचा उपयोग करावा. म्हणजे नियोजनाचें व नियंत्रणाचें काम बरेंच कमी होईल. लहान अधिकाऱ्यांना अधिक स्वातंत्र्य व मोकळेपणा मिळेल. असें विकेंद्रीकरण जरी झालें तरी किंमतयंत्राच्याद्वारें मध्यवर्ती सत्तेचें नियंत्रण राहीलच. आणि मग किंमतयंत्रांत जेथें दोष वा अपुरेपणा असेल तेथेंच फक्त मध्यवर्ती सत्तेला प्रत्यक्ष ढवळाढवळ करावी लागेल. अशा प्रकारें हा दिरंगाईचा व मेंगळटपणाचा प्रश्न सोडवितां येईल.

नियोजित अर्थव्यवस्था चांगली कीं स्वतंत्र अर्थव्यवस्था चांगली हा प्रश्न फार व्यापक आहे आणि तो कांहीं निव्वळ आर्थिक प्रश्न नव्हे. त्यामुळें त्याचा विचार आपण येथें केलेला नाहीं. येथें फक्त ह्या दोन प्रकारच्या अर्थव्यवस्थांच्या गुणविशेषांची स्थूल अशी चर्चा केली आहे. तिच्यावर त्यांच्या बरेवाईटपणाविषयीं अखेरचा निष्कर्ष काढणें धोक्याचें आहे.

---

७८०६

REFBK-0007906